क्र. ३
२०६

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

13.6

पुरुषार्थसिद्ध्युपाय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राही)........

....

लौटानेकी
तिथि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मोतीचन्द नानचन्द गांधी [illegible]

[illegible]

(श्री मोतीचन्द) नानचन्द हीराचन्द गांधी
[illegible]
[illegible] 803
सिकन्दराबाद

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म० १

जैनवाङ्मयकुसुममाला–पुष्प पांचवें.

पुरुषार्थसिद्ध्युपाय

मूल लेखक,

कलिकालगणधर–श्रीमदमृतचंद्रसूरि

अनुवादक

" अज्ञात "

... वर्णी दि० जैन (शोध) संस्थान
२०६
...

प्र. ता. १५।१२।२८] किंमत १० आणे. [आवृत्ति पहिली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकाशकः—

मोतीलाल हिराचंद गांधी,

मु. पो. उस्मानाबाद.

मुद्रकः—

श्री. लक्ष्मण भाऊराव कोकाटे,

हनुमान प्रेस, २०० सदाशिव पुणें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निवेदन

प्रस्तुतचें पुस्तक मालेचें पाचवें पुष्प होय. हा सुप्रसिद्ध ' पुरुषार्थ-सिध्युपाय ' नामक ग्रंथ श्रीमदमृतचंद्रसूरी यांनीं मूळ संस्कृत भाषेंत लिहिला आहे. यावर हिंदीभाषेंतून अनेक विद्वान पंडितांनीं टीका लिहिलेल्या आहेत. पण अद्यापपावेतों महाराष्ट्रभाषेंतून त्याचेवर कोणीही टीका लिहिलेली नाहीं. एवढेंच नव्हें तर हिंदींतून जें प्रसिद्ध झालें, त्याचें मराठी रूपांतरही कोणी केलेलें नाहीं. ही उणीव भरून काढावी असें माझ्या मनांत बरेंच दिवसां-पासून घोळत होतें. गेल्या दोन वर्षांखालीं कुंभोज मुक्कामीं श्री. १००८ आचार्य शांतिसागर महाराज यांच्या दर्शनासाठीं भाद्रपदमासीं गेलों होतों. तेथील रम्य, शांत व धर्ममय वातावरणामुळें माझ्या पूर्वीच्या विचारांना चालना मिळून तेथेंच कार्याला आरंभ केला. ह्या अत्यंत गहन व मौल्यवान ग्रंथाचा माझ्या सारख्या अल्पबुद्धिमानानें अनुवाद करणें म्हणजे ग्रंथाचा अपमान करणें होय. पण जेव्हां एखादें कार्य अत्यंत उत्कट आणि निष्काम भावनेनें हातीं घेतलें जातें, तेव्हां तें कार्य हातीं घेणारा आपल्या अथवा कार्याच्या उच्चनीचतेकडे कधींच लक्ष देत नसतो. परंतु तो तें कार्य सारखेंच करीत रहातो, व शेवटीं त्याला तें साध्य होतेंच. तद्वतच मी प्रयत्न केलें व मला जें साध्य झालें, तें आपणापुढें ठेवलेलें पद्यमय रूपांतर होय. हें कितपत योग्य वठलें आहे हें ठरविणें लेख-काचें काम नसून, वाचकांचेंच आहे. बहुतेक प्रस्तावनाकारानीं श्रीमदमृत-चंद्राचार्यासंबंधीं उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांच्या ग्रंथविवेचनासहित प्रस्तावनेंतून दिलेली आहे. याबद्दल अधिक लिहिण्यासारखें कांहीं उरलेलें नाहीं. असो. हा अनुवादात्मक ग्रंथ लिहितांना मला पंडितवर्य नाथुराम प्रेमी व पं. मक्खनलाल शास्त्री यांनीं लिहिलेल्या या ग्रंथावरील टीकात्मक ग्रंथांची अत्यंत मदत झाली; व विशेषतः अधिक मदत पं. नाथुराम प्रेमीजी यांच्याच ग्रंथाची झाली. याबद्दल वरील पंडितद्वयांना मी अनेक धन्यवाद देतों.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मराठी अनुवाद करतांना मूलार्थाशीं काव्य ताडून पहाण्याचे कामीं न्यायतीर्थ जिनदास शास्त्री यांनीं जी वेळोवेळीं मदत केली त्याबद्दल त्यांचा, व आपल्या व्यवसायांतून वेळ काढून पुस्तकास प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल श्री. रावजी नेमचंद शहा कुरुलकर वकील यांचा अत्यंत आभारी आहे. तसेंच माझे मित्र अनंतनाथ दोड्डणवर (बेळगांव) यांनीं शेवटीं प्रुफें तपासून दिल्याबद्दल व अर्पणपत्रिकेच्या श्लोकाच्या कल्पनेची पूर्ती करून दिल्याबद्दल 'मित्रप्रेम असेंच राहो' असा त्यांच्यावरच भार घालून आभार मानतों. पुस्तक वेळेवर व सुबक छापून दिल्याबद्दल हनुमान प्रेसचे मालक श्री. लक्ष्मणराव भाऊराव कोकाटे यांचाही आभारी आहे.

शेवटीं, पूर्वीप्रमाणें याहि पुस्तकाचा वाचकांनीं स्वीकार करावा व यांत अल्पबुद्धीमुळें व प्रमाददोषामुळें राहिलेल्या चुका सुधारून घेऊन त्याबद्दल क्षमा करावी; कारण 'न हि सर्वः सर्वं जानाति' अशी विनंति करून हें निवेदन पुरें करतों.

आश्विन वद्य १४
महावीर निर्वाण
वीर संवत २४५४

सर्वांचा नम्र,
"अज्ञात"

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ नमः सिद्धेभ्यः ।

प्रस्तावना.

पुरुषार्थसिद्ध्युपाय हें नांवच इतकें अर्थपूर्ण आहे कीं, त्यास निराळ्या प्रस्तावनेची जरूरी नाहीं. ग्रंथकार श्रीमद् अमृतचंद्राचार्य यांनीं स्वतः ग्रंथाचे प्रारंभीं या नांवाबद्दल जें विवरण केलें आहे, तें अत्यंत मननीय आहे. आचार्य म्हणतातः—

अस्ति पुरुषश्चिदात्मा विवर्जितःस्पर्शगन्धरसवर्णैः

अर्थात् पुरुष म्हणजे आत्मा हा चैतन्यस्वरूप असून, स्पर्श, रस, गन्ध आणि वर्ण यांनीं रहित असा आहे. येथें ' पुरुष ' या शब्दाची जी व्युत्पत्ति सांगितली आहे ती फारच उद्बोधक, व हृदयंगम आहे. ' पुरि (पुरुषु) शेते इति पुरुषः ' ' पुर ' म्हणजे उत्तम चैतन्यगुण त्यांत जो ' शेते ' म्हणजे स्वामि होऊन प्रवृत्ति करतो–वावरतो–त्यास ' पुरुष ' अशी संज्ञा दिली आहे. अर्थात् दर्शन व ज्ञानस्वरूपी जें चैतन्य त्याच्या अधिपतीला पुरुष असें म्हटलें आहे. पुरुषाचा जो अर्थ–तो पुरुषार्थ; येथें अर्थ म्हणजे कार्य–परमोच्च, परमश्रेष्ठ व परममंगल असें कर्तव्य–असें समजावें; व पुरुषाच्या अर्थाची–निजकार्याची–जी सिद्धि ती " पुरुषार्थ-सिद्धि " होय.

जेव्हां अशुद्ध असा हा आत्मा शरीरादिक परद्रव्यांना स्वतःहून निराळें समजतो, अर्थात् सर्व रागद्वेषादिक भावांचा त्याग करून तो शुद्धात्मस्वरूपामध्यें तल्लीन होतो तेव्हां त्याचे ठिकाणीं ध्याता व ध्येय हे विकल्पसुद्धां राहात नाहींत; त्यावेळीं ' मी शुद्धात्मस्वरूपाचें ध्यान करीत आहे ' ही भावनाही त्याची नाहींशी होऊन तो आत्मा तादात्म्यवृत्तीमुळें शुद्धात्म-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वरूप होतो म्हणजे अचल अशा चैतन्यस्वरूपाची त्याला प्राप्ति होते, व ही प्राप्ति झाली म्हणजे तो आत्मा 'कृतकृत्य' 'सिद्ध' या नांवांनीं संबोधिला जातो. अज्ञात कवीनें पुरुष 'कृतकृत्य' केव्हां होतो यावें मोठें हृदयंगम व हुबेहूब वर्णन अगदीं सोप्या व सुगम भाषेत खालीलप्रमाणें केलें आहे.

जेव्हां ध्रुवमोक्षसुखां पावे सगळी उपाधि जिंकून ।
हो तो 'कृतकृत्य' तदा सम्यक्पुरुषार्थसिद्धिसंपन्न ॥

जगांतील प्राणिमात्राचें परमश्रेष्ठ व आद्य कर्तव्य म्हटलें म्हणजे स्व-स्वरूपाची ओळख करून घेऊन अर्थात् आत्म्यालाच आत्मत्वानें जाणून व आत्म्याहून भिन्न अशा शरीरादि पदार्थांना अनात्मत्वेंकरून जाणून स्वतः 'सिद्धात्मा' 'परमात्मा' 'कृतकृत्य' होणें हें होय; येथें 'कृतकृत्य' हें विशेषण जें आत्म्याला दिलें आहे तें फारच योग्य, समर्पक व अर्थपूर्ण आहे. आत्म्याचे मूळ गुण हे अनादिकालापासून रागादिक परिणामांत किंवा परद्रव्यांत गुरफटून गेल्यामुळें लुप्त झाल्यासारखे दिसतात-अर्थात् प्रच्छन्न असतात-त्यांच्यावरील हें परद्रव्याचें अशुद्ध लिंपण काढून टाकणें-नाहींसें करणें-व मूळ गुणांना शुद्धस्वरूपांत म्हणजे स्व-स्वरूपांत प्रगट करणें हें पुरुषाचें खरें कर्तव्य आहे व हें कर्तव्य ज्यानें उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें तोच खरा 'कृतकृत्य' पुरुष समजावा. कृतकृत्य शब्दाचा अर्थच हा आहे कीं, आत्म्याचें-पुरुषाचें जें कांहीं कर्तव्य आहे तें सर्व तो करून चुकला आहे, कांहींही करण्यासारखें शिल्लक राहिलेलें नाहीं. आत्मा कृतकृत्य झाल्यावर त्याची कशी स्थिति होते याबद्दल आचार्य म्हणतातः—

कृतकृत्यः परमपदे परमात्मासकलविषयविषयात्मा ।
परमानन्दनिमग्नो ज्ञानमयो नन्दति सदैव ॥

ही स्थिति अज्ञात कवीच्या शब्दांत वर्णन करावयाची म्हणजेः —

निमग्नपरमानंदीं कृतकृत्याचि सकलविषयविषयात्मा ।
ज्ञानमयी स्थित राही नित्य परमपदिं मुदेंहि मुक्तात्मा ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि याच अवस्थेला पुरुषार्थसिद्धि असें म्हटलें आहे, व अशा उत्तम पुरुषार्थाची सिद्धि ज्यानें करून घेतली आहे तो खरा आप्त-जिन-वीतराग देव होय. कारण, यांतच जैनागमाप्रमाणें पुरुषाचा अर्थ म्हणजे त्याच्या कार्यांची खरी सिद्धि आहे. ही 'सिद्धि' कशी प्राप्त करून घ्यावी याचें या ग्रंथांत सांगोपांग, सोपपत्तिक, आगम व युक्ति याला धरून विवरण केलेलें आहे. यावरून या ग्रंथाची योग्यता सहज कळून येईल व हें नांवही किती सार्थ आहे याची वाचकांस चांगली कल्पना येईल. सारांश, हा ग्रंथ परमपुरुषार्थाची ओळख करून देणारा, आगमाचीं गूढ तत्त्वें स्पष्ट करून सांगणारा; दर्शन, ज्ञान व चारित्र यांची सांगड घालून खऱ्या कर्तव्याला प्रवृत्त करणारा व मनाला शांति मिळवून देणारा असा आहे.

या ग्रंथाचें नांव पुरुषार्थसिद्ध्युपाय अथवा जिनप्रवचनरहस्यकोश असेंहि आहे. पहिलें नांव इतकें अन्वर्थक असूनहि ' जिनप्रवचनरहस्यकोश ' हें दुसरें नांव देण्यांत कर्त्यानें फार बहार केली आहे. 'यथा नाम तथा गुणः ' या उक्तीप्रमाणें हा ग्रंथ खरोखरच जैनसिद्धांताच्या रहस्यांचा निधि—भांडार आहे. यांत षड्द्रव्यें, सप्त-तत्त्वें, सम्यग्दर्शन, ज्ञान व चारित्र यांचीं लक्षणें, प्रत्यक्ष व परोक्ष प्रमाण, द्वादश भावना आदि विषयांचें सोप्या व सुबोध भाषेत फार सोपपत्तिक विवेचन केलेलें आहे व चार पुरुषार्थांपैकीं सर्वांत श्रेष्ठ असा जो मोक्ष-पुरुषार्थ त्याची सिद्धि कशी करून घ्यावी याचें युक्तिपूर्ण व पायाशुद्ध विवेचनही केलेलें आहे.

सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः (उमास्वामी)

सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र यांची एकता-समुच्चय-हाच मोक्षमार्ग होय. अर्थात् मिथ्याश्रद्धान नाहींसें करून आत्मस्वरूपाला यथावत् जाणून-त्याचें यथार्थपणें ज्ञान करून घेऊन-आपल्या आत्म्याच्या स्वरूपा-

---

१ टीपः — स्यात्सम्यग्दर्शनज्ञानचारित्रत्रितयात्मकः ।
मार्गो मोक्षस्य भव्यानां युक्त्यागम सुनिश्चितः ॥
(अमृतचंद्रसूरिकृत तत्त्वार्थसार)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मध्यें स्थिर होणें हाच पुरुषार्थसिद्धीचा खरा उपाय होय, व हेंच तत्त्व आचार्यांनीं मुमुक्षुजनांच्या हृत्पटलावर बिंबविण्याचा या अमूल्य ग्रंथाद्वारें प्रयत्न केला आहे.

याप्रमाणें या ग्रंथांतील प्रतिपाद्य विषयासंबंधीं जरी एवढें विस्तारपूर्वक विवेचन केलें तरी याचें जें वैशिष्ट्य किंबहुना या ग्रंथाचा जो प्राणभूत विषय—अहिंसाधर्म—त्यासंबंधीं येथें चार शब्द सांगणें जरूरच आहे.

जगांत जेवढे म्हणून धर्म प्रचलित आहेत त्या सर्वांचे अनुयायी प्रायः हिंसेला पाप व अहिंसेला पुण्य मानणारे आहेत, व म्हणूनच ते ' हिंसा करूं नये ' व ' अहिंसाधर्माचें पालन करावें ' असा उपदेशहि करतात. परंतु यावरून हिंसेचें स्वरूप व लक्षण सर्वांनीं एकसारखेंच मानिलें आहे, असें जर कोणी मानीत असेल तर तें मात्र चुकीचें होईल ! उलट, जितके धर्म आहेत त्यांपैकीं प्रत्येकानें हिंसेचें लक्षण व व्याख्या हीं वेगवेगळीं सांगितल्याचेंच आढळून येतें ! !

प्राचीन काळाच्या (वैदिक काळच्या व अडीच हजार वर्षांपूर्वीच्या म्हणजे श्री महावीर—तीर्थंकराच्या वेळच्या) समाजाच्या—आचारांत यज्ञाचें मोठें प्राधान्य होतें. यज्ञ न करणाऱ्याला हा लोक मिळत नाहीं, मग परलोक कसा मिळणार ही समजूत तत्कालीन समाजांत प्रचलित होती; व या समजुतीमुळें त्याकाळीं हजारों पशूंचें हवन होत होतें; तत्कालिन राजेलोकांनींही यज्ञाचें विलक्षण स्तोम माजविलेलें होतें. राजांना आपल्या कीर्तीच्या वृद्धीचें तें एक साधन वाटत असे; त्यामुळें ते वारंवार यज्ञ करीत, व यज्ञांत पशुहनन केलें म्हणजे कीर्ति व पुण्य या दोहोंचीही जोड आपणांस होते अशी त्यांची समजूत होती. पण ही समजूत नाहींशी करून दुसऱ्याच्या हितासाठीं आपलें जीवित दान करणें हाच खरा यज्ञ होय, हें जगाला शिकविण्याचें काम जैनधर्मानें—जैनांच्या अहिंसाधर्मानें—त्यावेळीं केलें. त्यावेळीं महावीर भगवान व महात्मा गौतमबुध्द व त्यांचे उपदेशक ठिकठिकाणीं जाऊन करुणार्द्रकंठानें जनतेस असा उपदेश करीत होतेः—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

" प्राण ही इहलोकीची अमूल्य वस्तु आहे. तो घेण्याचा कोणासहि अधिकार नाहीं. असें असतां धर्माच्या मिषानें एकानें दुसऱ्याचा प्राण घेणें हें निःसंशय महत्पाप होय. अर्थात् यज्ञ हें पुण्याचे ऐवजीं पाप जोडून घेण्याचें एक साधन होय. तुमच्या स्वतःच्या प्राणापेक्षां कोणत्याहि प्राणिमात्राच्या प्राणाची किंमत कमी नाहीं, हें ध्यानांत ठेवा ! सृष्टीच्या रचनेंत एकदम बदल होऊन जर बकऱ्यांना नरयज्ञ करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें तर त्यावेळीं तुमच्या प्राणाची आहुती यज्ञांत देतांना तुमच्या मनाची स्थिति कशी होईल याची कल्पना करा ! त्यावेळीं तुम्हीं 'महत्पाप, महत्पाप' किंवा 'अधर्म, अधर्म' म्हणून ओरडाल यांत मुळींच संदेह नाहीं. यज्ञांत वाघ किंवा सिंह यांसारख्या सामर्थ्यवान् पशूंचा बळी न देतां निरुपद्रवी अशा शेळ्यामेंढरांचा वध करतां हेंहि आश्चर्यच नाहीं कां ? या बलाढ्य हिंस्रपशूंना बळी देण्यासाठीं आणतांना प्रथम तुम्हांलाच बळी जावें लागेल, याचें तुम्हांला भय वाटत असलें पाहिजे. पण पुण्योपार्जन करण्यांत भीति काय कामाची ? बकऱ्यामेंढ्यापेक्षां सिंह—व्याघ्राची किंमत खास अधिक आहे. त्यांच्या बळीनें तुम्हांस अधिक पुण्य लाभणार नाहीं काय ? यज्ञांत हवन केलेले प्राणी जर स्वर्गाला जातात तर मग सर्वांत अधिक प्रिय असे पिता, पुत्र, बंधु अगर पत्नी यांचें हवन करून यज्ञ कां करीत नाहीं ? किंबहुना स्वतःच्या देहाचा बळी कां देत नाहीं? प्रत्येकाला आपला जीव सारखाच प्यारा आहे. आपापल्या जीवाच्या संरक्षणार्थ प्रत्येक प्राणिमात्राचा प्रयत्न चाललेला असतो. भूतदया हा मुख्य सद्गुण आहे. पुण्योपार्जनाचा खरा मार्ग यज्ञ नसून भूतदया हा आहे. जगांत जेवढें म्हणून चांगलें आहे, तेवढें सर्व भूतदयेनें उत्पन्न झालेलें आहे. हिंसेचें प्रत्येक कार्य —मग तो महायज्ञ असो किंवा मांसाशन असो—पापमय असतें. यज्ञासाठीं वध करीत असलेल्या या पशूंना वाचा नाहीं हें खरें; पण यांच्या मूक-वृत्तींत केवढी करुणा भरलेली आहे ती पहा ! या पशूंच्या ओंठावर मनुष्याच्या निर्दयतेचें अक्षरान् अक्षर लिहिलें आहे. तीं वाचून पाहण्याचा तुम्हीं कधीं प्रयत्न केला आहे काय ? आपल्या मुलांना पाजण्याचें दूध व लोंकर तुम्हांला देऊन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्या पशूंनीं तुम्हांस उपकारबद्ध केलें त्याची फेड तुम्हीं त्यांच्या मानेवर सुरा फिरवून करणार काय ? तुमच्या या कृतघ्नपणाला कांहीं मर्यादा आहे काय ? रक्त हें देवपूजेचें साधन नाहीं, रक्तानें किंवा मांसानें देवता प्रसन्नही होत नाहींत. केवळ हत्येचें पाप मात्र पदरांत पडतें, आणि त्या पापाचें फळ इह-परलोकीं भोगावें लागतें. " (प्रभाकरकृत—गौतमचरित्र यांतील उतारा कांहीं फेरफार करून) या उपदेशाचा परिणाम अन्य धर्मांवर होऊन त्यावेळीं लाखों जीवांची हत्या बंद पडली. ही गोष्ट आम्हीं स्वधर्माभिमानानें सांगत आहोंत असें नसून विद्वान, संशोधक आणि वैदिक धर्माभिमानी कै० बा. गं. टिळक यांनींहि प्रांजलपणें कबूल केली आहे. ते म्हणतातः—

" जैन व वैदिक हे दोन्ही धर्म अत्यंत प्राचीन आहेत; पण यांत अहिंसा धर्माचा मुख्य संस्थापक जैनधर्म हाच होय. जैनधर्मानें आपल्या प्रभावानें वैदिक धर्मावर अहिंसाधर्माचा उत्तम पगडा बसविला. वैदिक धर्मांत अहिंसेला जें स्थान मिळालें तें जैनांच्या सहवासामुळेंच. अहिंसाधर्माचें सगळें श्रेय जैनांच्या वाट्यास जातें. अडीच हजार वर्षांपूर्वी वेदविहित यज्ञांमध्यें हजारों पशूंचा वध होत होता; परंतु महावीर तीर्थंकरांच्या उपदेशामुळें जन-तेचीं अंतःकरणें या घोर व निर्दय कृत्यापासून पराङ्मुख होऊं लागलीं; हळूं-हळूं त्यांचेवर अहिंसेचा प्रभाव पडूं लागला. तत्कालीन विचारी विद्वान् वैदि-कांनीं धर्माचें रक्षण करण्याकरितां पशुहिंसा सर्वथा बंद केली, व आपल्या धर्मांत अहिंसेला योग्य स्थान दिलें."

महाभारतकालींहि यज्ञांतील पशुहिंसेचा निषेध करून अहिंसाधर्माचेंच श्रेष्ठत्व मानण्यांत येत होतें हें खालीं दिलेल्या उताऱ्यावरून स्पष्ट होतें.

सर्व यज्ञेषु वा दानं सर्व तीर्थेषु चाप्लुतम् ।
सर्व दानफलं चापि नैतत्तुल्यमहिंसया ॥
अहिंस्रस्य तपोक्षय्यमहिंस्रो यजते सदा ।
(महाभारत अनुशासनपर्व)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अर्थः—सर्व यज्ञांत केलेलें दान, सर्व तीर्थांत केलेलें स्नान, सर्व प्रकारच्या दानांचें पुण्य या सर्वांनाही अहिंसेची योग्यता येणार नाहीं. हिंसेपासून अलिप्त राहिलेला पुरुष अक्षय्य तप करतो व नित्य यज्ञ करीत असतो असें समजावें.

याचप्रमाणें भगवद्गीतेंतही ज्ञानयज्ञाची व अहिंसेची थोरवी गायिली आहे. "यज्ञाचा मूळ उद्देश आत्मविकास करणें हाच होय; केवळ बाह्य विषयांच्या यज्ञानें मन पवित्र होणें कठीण असून, या यज्ञापेक्षां अंतःकरणाचा यज्ञच श्रेष्ठ होय. द्रव्यमय यज्ञापेक्षां ज्ञानयज्ञच अधिक श्रेयस्कर आहे. 'सर्व भूतांच्या हितामध्यें रत होऊन' स्वार्थाचा सर्वस्वी परार्थांत लय करणें व अशा आत्मौपम्य बुद्धीनें फलाशाविरहित कामें करणें हाच श्रेष्ठ यज्ञ होय.' तसेंच सर्वांच्यापेक्षां अहिंसा हाच श्रेष्ठ यज्ञ होय." (भ. गी. ४. ३३.)

श्रुतिकारांनीं आत्मज्ञानाची प्रशंसा करून यज्ञांतील हिंसेचा कडक व तीव्र असाच निषेध केलेला आहे. यासंबंधीं श्रुतींतील खालीं उध्दृत केलेला उतारा मननीय आहेः—

"आत्मा हा यजमान, श्रद्धा ही यजमान पत्नी, इंद्रियें हीं ऋत्विज, मन्यु (क्रोध) हा पशु इत्यादि प्रकारची यज्ञसामुग्री सांगितली आहे आणि हाच यज्ञ सर्वांत श्रेष्ठ होय, व हिंसा आणि इतर वस्तूंच्या साहाय्यानें होणारे यज्ञ म्हणजे फुटक्या होडया होत. त्यांच्या साहाय्यानें आत्मज्ञानाची प्राप्ति करून घेतां येणें शक्य नाहीं कारण ते पुनः जन्ममरणाचीच जोड करून देणारे होत."

सर्वे वेदा न तत्कुर्युः सर्वे यज्ञाश्च भारत ।
सर्वे तीर्थाभिषेकाश्च यत्कुर्यात्प्राणिनां दया ॥

या श्लोकांतील उपदेश तर सुवर्णाच्या अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे. दयाधर्माचें—अहिंसेचें सार या श्लोकांत उत्कृष्ट रीतीनें ग्रथित केलें आहे.

वैदिकधर्म ग्रंथांतील या उताऱ्यावरून हिंसेचा निषेध त्यांनींहि केल्याचें उघड उघड सिद्ध होतें; पण महावीर तीर्थंकरांच्या वेळीं या निषेधाकडे तत्कालीन समाजाचें मुळींच लक्ष्य गेलें नव्हतें, उलट यज्ञयागाच्या नांवा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

खालीं हिंसेचेंच फार बंड माजलें होतें, असेंच त्या वेळचा इतिहास सांगतो. श्री महावीरांनीं—जैनांच्या अंतिम चोविसाव्या तीर्थंकरांनीं—या अहिंसाधर्माचा प्रश्न जोरानें उचलून धरून त्यास चांगली चालना दिली, व यज्ञाचें वैय्यर्थ्य व असारता ही उत्कृष्ट रीतीनें जगाला पटविली, व आपल्या प्रासादिक उपदेशानें जनतेंत हिंसेचा भयंकर तिटकारा उत्पन्न केला. याचा इष्ट परिणाम वैदिक व अन्य धर्मानुयायी लोकांवर झाला, व हिंसेस मोठा आळा बसला. किंबहुना 'अहिंसा परमोधर्मः' अशी जी अहिंसाधर्माची विजयपताका आज फडकत आहे, व सर्व धर्मांवर या अहिंसाधर्माचें जें असामान्य प्रभुत्व जी अलौकिक छाप—दिसून येत आहे त्याचें खरें श्रेय सुप्रसिध्द आद्य समाजसुधारक श्री महावीर तीर्थंकर यांनाच दिलें पाहिजे. जैनधर्मानें यज्ञ—हिंसानिवारणार्थ जे प्रयत्न केले, अर्थात् अहिंसाधर्मानें जें कार्य केलें त्याचा इष्ट परिणाम गेल्या दोन अडीच हजार वर्षांच्या जैनेतर विद्वानांवर त्यांच्या वाङ्मयावर, किंबहुना तत्कालीन व त्यानंतरच्या सारस्वतांवरही झाल्याचें दिसून येतें ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. व्यास ऋषी म्हणतात—

प्राणीघातात्तु यो धर्ममीहते मूढमानसः ।
स वाञ्छति सुधावृष्टिं कृष्णाहिमुखकोटरात् ॥

अर्थ—जो मूर्ख प्राण्याचा घात करून त्यांपासून धर्माची इच्छा करतो तो कृष्णसर्पाच्या मुखांतून अमृताच्या वृष्टीची आशा करतो.

देवोपहारव्याजेन यज्ञव्याजेन येऽथवा ।
घ्नंति जंतून् गतघृणा घोरान्ते यान्ति दुर्गतिम् ।

अर्थात् देवासाठीं बळी देण्याच्या मिषानें किंवा यज्ञाच्या मिषानें जे निर्दय लोक जीवहिंसा करतात तें घोर दुर्गतीस प्राप्त होतात.

वैरिणोऽपि विमुच्यन्ते प्राणान्ते तृणभक्षणात् ।
तृणाहाराः सदैवेते हन्यन्ते पशवः कथम् ॥

भावार्थः— कट्टा हाडवैरी देखील जर क्षणभर दांतीं तृण धरून आला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तर त्याला सोडून देण्यांत येते; तेव्हां जे पशु नित्य दांतीं तृण धरतात अर्थात् ज्यांचा रोजचा आहार तृण आहे त्यांचें कां बरें हनन करण्यांत येतें ?

रसातलं यातु यदत्र पौरुषम् ।
क्व नीतिरेषाऽशरणोह्य दोषवान् ॥
निहन्यते यद् बलिनाऽति दुर्बलो
हा हा ! महाकष्टमराजकं जगत् ॥

अर्थः—ज्या अति दुर्बल, निर्दोष आणि अशरण जीवांना बलवान् पुरुष मारतात तो त्यांचा पुरुषार्थ (?) रसातळाला जावो ! व नीति तरी कोठली ? हे जगत् अराजक बनलें आहे ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे.

संत कबीर म्हणतात—

तिलभर मछली खाय के कोटी गौ दे दान ।
काशी करवट लै मरे तौ भी नरक निदान ॥

अर्थः—एकाद्यानें थोडा देखील मत्स्याहार करून मग कोट्यावधि गाईंचें दान केलें किंवा तो काशीस जाऊन करवतून घेऊन मेला तरी देखील नरकासच जातो.

भद्रायु नामक राजपुत्रास ऋषभ ऋषीनें जो उपदेश केला आहे त्याचें वर्णन मोरोपंतानीं ब्रह्मोत्तर खंडांत केलें आहे. हा उपदेश क्षत्रियास—राजपुत्रास—केलेला आहे ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ते म्हणतात.—

तूं क्षात्रधर्मरत जरि तरि बा हिंसा करूं नको स्वैर ।
बहु भाषणपरनिंदा वत्सा तैसेंच शुष्क जें वैर ॥

तसेंच, रामदास दासबोधांत म्हणतात—

शांति, क्षमा आणि दया । निश्चयें उपजे जया ।
सत्त्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥

तसेंचः—परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें मानी सुख ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वैराग्य देखोनि माने हरिख । तो सत्त्वगुण ॥

तुकाराम —आपल्या अभंगांत म्हणतातः—

भूतदया गाई पशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनांमाजीं ।

अथवा—

पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दूजा यासी ।
अंतरीं सब्राह्मसारिखें निर्मळ । हृदय कोमल गंगारूप ॥
तुका म्हणे काय्य कुरवंडीन तया । ठेवीन मी पायां मस्तक हें ।
ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूती लावूं नये ।

तुकाराम.

किंवा—

मुख बांधोनी मेंढा मारा । म्हणती सोमयाग करा ।
कोण जाणें खरें खोटें । भजन चालिलें उफराटें ॥

ज्ञानदेव म्हणतातः—जें अवृष्टीचेनि उपद्रवें । गांदलें विश्व आवघें ।
म्हणोनि पर्जनेष्टि[3] करावें । नाना याग ॥
तंव तयें इष्टिचियां बुडीं । पशुहिंसा तंव रोकडी ॥
मग अहिंसेची थडी । कैची दिसे ॥
पेरिजे नुसुधी हिंसा । तेथ उगवेल काय अ–हिंसा ।
परि नवल बापा धिंवसा । या याज्ञिकांचा ॥

भावार्थः—अवृष्टीनें हें सर्व जग पीडलेलें आहे; करितां पाऊस पडावा म्हणून किंवा स्वर्ग मिळेल या इच्छेनें यज्ञयागादि करणें हें जीवहिंसेची पेरणी करून त्यापासून अहिंसा फळाची अपेक्षा करण्याप्रमाणें आहे ! जेथें नुसतें हिंसेचें बीं पेरलें आहे तेथें त्याचा अहिंसावृक्ष कसा उगवेल ? पण या याज्ञिकांची ही उत्कट इच्छा पाहिली म्हणजे बापहो ! महद् आश्चर्य वाटतें !!!

प्राचीन कवींच्या या वर उध्दृत केलेल्या विचारावरून आमच्या विधा-

---

१ पवित्र. २ पीडलेलें. ३ पर्जन + इष्टि = पाऊस पाडावा म्हणून केलेले यज्ञयागादि. ४ नुसती. ५ उत्साह, फार इच्छा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाची सत्यता सहज पटण्यासारखी आहे. प्राचीन कवींनींच अहिंसेविषयीं असे उद्गार काढले आहेत असें नव्हे; तर आधुनिक कवींनींहि याच तत्त्वाचा पुरस्कार केलेला आहे हें वाचकांना पुढील उताऱ्यांवरून समजून येईल.

ज्यांच्या चित्तीं संतत ही बंधुप्रेमभावना वसलीं।
टाळी ब्रह्मानंदीं त्या पुरुषांची खरोखरी बसली ॥

विश्वबंधुत्त्वाची (universal brotherhood) ही भावना ज्यांच्या अंतः-करणांत वास करते त्यांची टाळी ब्रह्मानंदीं लागली, असें सुप्रसिध्द कवि श्री. मोगरे म्हणतात.

ख्रिस्तवासी रेव्हरंड नारायण वामन टिळक यांनीं 'केवढें हें क्रौर्य!' या कवितेंत शिकारी माणसाचा उपहास करून दया, धर्म, व नीतीची जी पर्यायानें थोरवी गायिली आहे ती पुढील उताऱ्यावरून दिसून येईलः —

निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय।
म्हणून वधिलें मला, किती दया कसा हा नय ॥
उदार बहु शूर हा नर खरोखरीं जाहला।
वधून मज पांखरा निरपराध कीं दुर्बला ॥

यज्ञांतील हिंसेचा निषेध डॉ. भांडारकर, कै० टिळक व आंग्ल विदूषी सुप्रसिद्ध थिऑसॉफिस्ट डॉ. ॲनी बेझंट या सारख्या आधुनिक जगद्वंद्य पंडितांनींहि केलेला आहे.

जैनागमाची उज्वलता अतिशय मोठी असल्याचे जे अनेक प्रशंसोद्गार महान् महान् पाश्चात्य व पौर्वात्य पंडितांनीं काढिले आहेत त्यांचें कारणही महावीराचें विश्वबंधुत्वाचें तत्त्व universal brotherhood 'सत्त्वेषु मैत्री' हेंच होय. या अहिंसाधर्माचें निरूपण जैनधर्मांखेरीज दुसऱ्या कोण-त्याही धर्मपंथानें इतक्या बारकाईनें व कुशलतेनें केलेलें नाहीं. त्याचें सुंदर, मार्मिक, सोपपत्तिक व तात्त्विक विवेचन पाहावयाचें असल्यास जैनागम व मुख्यतः हा अमृतचंद्रसूरीचा पुरुषार्थसिध्द्युपाय ह्या ग्रंथांतील अमृततुल्य व मधुर अमृतालपाचेंच पान करावें लागेल. श्रीमान् अमृतचंद्रसूरि हे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

"अन्तर्मुखकवींद्र" या अभिधेला पात्र आहेत. अंतःकरणांत प्राणिमात्रां-विषयीं वाटत असलेली भूतदया व हिंसानिवारणार्थ चाललेली धडपड व्यक्त करण्याची या आचार्यांची हातोटी अत्यंत रमणीय व प्रशंसनीय आहे. हिंसा असत्य, चोरी, अब्रह्म व परिग्रह, हीं पांच पापें केवळ हिंसेचेच प्रकार आहेत. या पांच पापांमुळें आत्म्याच्या शुद्ध परिणामाचा घात होतो; सबब हीं पंच–महापापें हिंसागर्भित समजावींत, ही गोष्ट या कवींद्रानें अनुपमेय चातुर्यानें व कुशलतेनें सिद्ध केली आहे. सम्यक्चारित्र व्याख्यानांतील अहिं-सेचें हें निरूपण वाचीत असतां वाचक अगदीं वर्ण्यविषयांशीं तल्लीन होऊन जातो, व त्याचे मनाचे परिणाम दयामय होऊन अंतःकरण नवनीताहूनहि मृदु होतें. आचार्य पुरुषार्थसिध्द्युपाय या ग्रंथांतीं सम्यक्चारित्र या अधि-कारांत म्हणतातः—

आत्म्याचे परिणाम कषाययुक्त होऊन, प्राणिमात्रांच्या इंद्रियादि दश-प्राणांचा वियोग करणें यास 'हिंसा' म्हणतात. आपल्या आत्म्याच्या कषायत्वामुळें एखाद्या जीवाची प्रत्यक्ष हिंसा घडो वा न घडो, परंतु आत्म्याचे परिणाम गढूळ झाले कीं, हिंसारूपी–पापरूपी–प्रवाहास सुरुवात होते. सारांश, हिंसा म्हणजे घात करणें. हा घात दोन प्रकारचा;–स्वहिंसा व परहिंसा. ज्यावेळीं आत्म्यांमध्यें कषायांची उत्पत्ति होते त्याच क्षणीं स्वहिंसा अर्थात् आत्मघात होतो. पुढें जर दुसऱ्या प्राण्यांची आयुर्मर्यादा संपली असेल तर त्याचाहि घात होतो. आयुष्य संपलें नसेल तर त्याला कांहीं होणार नाहीं. कारण त्याचा घात ज्याच्या त्याच्या कर्माच्या स्वाधीन आहे. पण आत्मघात मात्र कषायांची उत्पत्ति होता क्षणींच होतो. जैनागमांत आत्मघात व परघात या दोन्हींस 'हिंसा' असेंच म्हटलें आहे. हिंसा व तिचे भेद व पोटभेद यांचें स्पष्टीकरण हें खालील वृक्षावरून वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



या हिंसेचा सर्वथैव त्याग कसा करावा याबद्दल आचार्यप्रवर म्हणतात--

अवबुध्य हिंस्यहिंसकहिंसाहिंसाफलानि तत्त्वेन ।
नित्यमवगूहमानैर्निजशक्त्या त्यज्यताम् हिंसा ॥

अर्थात् हिंस्य, हिंसक, हिंसा व हिंसेचें फळ या चार गोष्टी समजल्या-शिवाय हिंसेचा खरा त्याग केल्यासारखें होत नाहीं. या श्लोकांत त्यांनीं आपलें हृद्गत ग्रथित केलेलें आहे.

वर हिंसेची व्याख्या सांगतांना 'प्राणिमात्र' असा जो शब्द आचार्योनीं योजिला आहे तोहि मनुष्यप्राणि अशा संकुचित अर्थानें नसून मोठा व्यापक आहे. यच्चयावत् प्राणिमात्रांच्या जीवनांची उन्नति हें या कवीच्या काव्यस्फूर्तीचें केंद्र होय. सर्वांत जड म्हणून मानलेली कोटी ती धातु, मृत्तिका, दगड यांत आढळून येते. जीव हा प्राणि, वनस्पति यांतहि आढळून येतो, हें आधुनिक रसायनशास्त्रवेत्त्यांनीं आज शोधून काढलेलें तत्त्व जैनधर्माला अत्यंत प्राचीनकाळापासून माहीत असून मान्यही होतें. परंतु ही गोष्ट जगापुढें सप्रयोग सिद्ध करण्याचें श्रेय कलकत्त्याचे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस यांनाच देणें उचित आहे. डॉक्टरसाहेबांनीं "Response in the Living and the Non-Living" नामक इंग्रजी ग्रंथांत म्हटलें आहे:--' क्रियेला प्रतिक्रिया करणें ही गोष्ट सजीव प्राणी व वनस्पति आणि धातु या सर्वांत सारखीच आढळून येते. मनुष्याच्या स्नायूंस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुईनें टोचल्यानें, किंवा विषानें किंवा अति त्रास झाल्यानें त्याच्यावर जसा परिणाम होतो, तसाच परिणाम हुबेहूब वनस्पतीचा देंठ किंवा धातूची तार यांवरही होतो. व अति त्रासाच्या योगानें वनस्पति व धातु यांतील ही प्रति-क्रियात्मक शक्ति नष्ट होते.' डॉ० बोस यानीं या सर्व गोष्टी आधुनिक जगास प्रयोगद्वारां सिद्ध करून दाखविल्यामुळें 'हा एक अपूर्व व नवीन शोध' लावण्याचा मान हिंदमातेच्या या सुपुत्रास मिळाला. डॉ० बोस यानीं जर्मनीमध्यें नुकतेंच व्याख्यान दिलें त्यांत ते म्हणतात—"ज्ञानतंतू, रक्तवाहिन्या, हृदय वगैरे इंद्रियें फक्त प्राण्यांत–मनुष्यांत–आहेत व वन-स्पतींत नाहींत हा आतांपर्यंतचा समज साफ चुकीचा आहे 'Resonant Recorder" या यंत्रानें बरोबर रीतीनें झाडांमधील इरिटॅबिलिटी व इतर क्रिया दाखवितां येतात. वस्तुतः डॉ० बोसच्या सदर पुस्तकांत नवे म्हणून लावलेले शोध जैनाचार्यांनीं यापूर्वींच मान्य करून त्यावर प्रमाणभूत असे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. येथें थोडेसें विषयांतर करूनही ही गोष्ट सांगण्याचें कारण हेंच कीं, एकेंद्रियजीवापासून तों पचेंद्रियसंज्ञीजीवापर्यंतच्या कोणत्याही प्राण्याचा घात करणें यास 'हिंसा' हे नांव जैनागमांत दिलें आहे; अर्थात् हिंसेची व्याख्या एवढी व्यापक करून तिचें सर्व दृष्टीनें निरूपण करण्यांत व अहिंसा धर्माचें यथातथ्य व सोपपत्तिक वर्णन करण्यांत जैनागमाचें–विशेषतः श्रीमान् अमृतचंद्रसूरि यांचें व त्यांच्या पुरुषार्थसिद्ध्युपाय या ग्रंथाचें श्रेष्ठत्व, महत्व व वैशिष्ट्य आहे. "अहिंसा प्रथमोधर्मः सर्व शास्त्रेषु विश्रुतः । यत्र जीवदया नास्ति तत्सर्वं परिवर्जयेत् ॥ आचार्यांचा हा कळकळीचा उपदेश हेंच या ग्रंथाचें परम तात्पर्य आहे. एक अहिंसाधर्म पाळल्या;" धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारी पुरुषार्थांची सिद्धि होते, असें या ग्रंथांत सिद्ध केलें आहे. पुरुषार्थसिद्ध्युपायांत दयाधर्म हा एक प्रधान हेतु एकसूत्रासारखा सर्व ग्रंथांत गोंवला गेला आहे, व त्यानें या काव्याचा एकजीव झाला आहे. कोण-त्याही व्रताचें–धर्माचें वर्णन करतांना दयाधर्म हा एक व्यापक हेतु आचा-र्यांच्या डोळ्यासमोर नेहमीं उभा होता हें हा ग्रंथ वरवर वाचणाऱ्याच्याही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सहज ध्यानांत येतें. आणि याचमुळें या ग्रंथाचें सर्व जगांतील ग्रंथांत श्रेष्ठत्व आहे. याच तत्वामुळें जैनधर्म हा विश्वधर्म—सार्वधर्म होण्याच्या योग्यतेचा आहे, असें आम्हांस वाटतें. तौलनिक पद्धतीनें व चिकित्सक बुद्धीनें निरनिराळ्या धर्मांचा व त्यांच्या तत्वज्ञानांचा अभ्यास केल्यास मुख्यतः या दयामय धर्मामुळेंच—या विश्वबंधुत्वामुळेंच—या सर्वभूतात्मैक्यबुद्धीमुळेंच—या अहिंसातत्वामुळेंच—जैनधर्म हा जगांतील एक विश्वव्यापी, सर्वश्रेष्ठ धर्म आहे असें कोणाही निःपक्षपाती विद्वानास कबूल करावें लागेल. अहिंसेचें निरूपण किती व्यापक, सोपपत्तिक आणि तर्कशास्त्राला व न्यायाला धरून आहे हें पुढें आम्ही अज्ञात कवीचे या ग्रंथांतील उतारे उध्दृत करून दाखविणार आहोंत त्यावेळीं दिसेल. येथें अशा प्रकारचा हा अपूर्व ग्रंथ ज्या आचार्यश्रेष्ठांच्या लेखणींतून बाहेर पडला त्यांचा थोडासा वाचकांस परिचय करून देणें जरूर व योग्य आहे, असें वाटल्यावरून तिकडे आम्ही वळतों.

श्रीमदमृतचंद्रसूरि यांचा कालनिर्णय व परिचय

श्रीमद् अमृतचंद्रसूरि हे विक्रम संवत ९६२ म्हणजे इसवी सन ९०६ मध्यें विद्यमान होते ही गोष्ट आचार्यांची पट्टावली व पाश्चात्य विद्वानांचे रिपोर्टींवरून दिसून येते. यावरून सुमारें एक हजार वर्षांपूर्वी ह्या आचार्योंनीं या अवनीतलास अलंकृत केलें होतें ही गोष्ट सिद्ध होते. या महात्म्याचा जन्म कोणत्या जातींमध्यें अथवा कुलांमध्यें झाला हें सांगण्याला आम्हांपाशीं आज मितीस कांहीं साधन उपलब्ध नाहीं. आचार्योनीं स्वतः आपल्या ग्रंथांमध्यें कोठेंहि याबद्दल अवाक्षर काढलेलें नाहीं. व हें एका दृष्टीनें योग्यही आहे. मध स्वतःची गोडी सांगतां तर भ्रमर इतकें अनुरक्त होतेना ! यासंबंधीं एक आंग्ल कवि म्हणतो Heard melodies are sweet and unheard are sweeter still." यांतील बीज तरी हेंच होय; पण त्यामुळें त्याच्या प्रापंचिक कर्तृत्वाबद्दल कांहींही सांगतां येण्यासारखें नाहीं त्यांचें पारमार्थिक

---

१ X L I X A Volume नं. १८ रायल एशियाटिक सोसायटी बॉंबे ब्रॅंच पिटर्सनचा रिपोर्ट.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्तृत्व म्हणजे त्यांचे ग्रंथ, त्यांत कर्त्याच्या गृहस्थावस्थेच्या वंशाचा जसा पत्ता लागत नाहीं त्याचप्रमाणें ते त्यांच्या मुनिवंशाचा परिचय करून देण्याच्या बाबतींतही तितकेंच मुग्ध आहेत. ही गोष्ट खेदाची होय. पण या दुसऱ्या बाबतींत इतरत्र थोडासा उल्लेख आढळतो हीं त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे.

भगवान महावीर मोक्षास गेल्यानंतर—श्वेतांबर पंथाची उत्पत्ती होईतोंपर्यंत ह्या सनातन जैन-धर्मांत संघभेद वगैरे मुळींच नव्हतें. आर्हत्, अनेकांत, जैन इत्यादि-नांवांनीं हा धर्म प्रसिद्ध होता. विक्रमाच्या मृत्युनंतर १३६ वर्षांनीं म्हणजे इ. स. ८० चे सुमारास श्वेतांबर पंथ निर्माण झाल्यावर दिगंबर पंथ 'मूल संघ' या नांवानें संबोधिला जाऊं लागला. महावीर निर्वाणानंतर सुमारें ७०० वर्षांनीं म्हणजे इ. स. २२८ च्या सुमारास अर्हद्बलि आचार्यांच्या वेळीं मूलसंघांमध्यें १ नंदिसंघ. २ देवसंघ. ३ सेनसंघ. ४ सिंहसंघ असे चार भेद झाले. या संघांतहि बलात्कार, पुन्नाट, काणूर आदि गण; तसेंच पारिजात, सरस्वत्यादि गच्छ स्थापन झाले. या मुनिसंघामध्यें कोणत्याही प्रकारचा मतभेद नसून, फक्त मुनिजनांमध्यें संघाबद्दलची निजत्वबुद्धि व संघवात्सल्य मात्र दिसून येत असे. श्वेतांबर व दिगंबर या पंथांत ज्याप्रमाणें कित्येक गोष्टींसंबंधीं मतभेद आढळतो तसा या संघांमध्यें किंवा गणगच्छांमध्यें कसलाही विरोध नसून सर्वजण एकाच मार्गाचे अविभक्त उपासक होते. समयभूषण ग्रंथांत श्रीइंद्रनंदीसूरींनीं या संघ, गण, गच्छ, याविषयीं जो अभिप्राय दिला आहे तो येथें उध्दृत करतो. त्यावरून या आमच्या विधानाची खात्री पटेल.

तदेव यतिराजोऽपि सर्वनैमित्तिकाग्रणी ।
अर्हद्बलि गुरूश्चक्रे संघसंघट्टनं परम् ॥
सिंहसंघो नंदिसंघः सेनसंघो महाप्रभः ।
देवसंघ इति स्पष्टः स्थानास्थिति विशेषतः ॥
गणगच्छादयस्तेभ्यो जाताः स्वपरसौख्यदाः ।
न तत्र भेदः कोप्यस्ति प्रव्रज्यादिषु कर्मसु ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या चार संघांपैकीं नंदिसंघ नांवाच्या वंशामध्यें अमृतचंद्रसूरि यांनीं दिक्षा घेतली होती. नंदिसंघाची पट्टावली उपलब्ध नसल्यामुळें त्या संघाच्या स्थापनेपासून तों अमृतचंद्रसूरिपर्यंतची आचार्यपरंपरा देतां आली नाहीं. तथापि या संघांत परमभट्टारक कुंदकुंदाचार्य स्वामीनंतर अमृतचंद्र यांच्या एवढा महान् तपस्वी, अतुल विद्यावाचस्पति व अधिकारी असा आचार्य सांपडणें विरळा. याशिवाय अमृतचंद्र हे नंदिसंघाचेच आचार्य होते ह्यास दुसरा पुरावा म्हटला म्हणजे नंदि, चंद्र, कीर्ति अथवा भूषण हे चार शब्द प्रायः नंदिसंघाच्या आचार्यांच्या नांवाबरोबरच आढळून येतात हा होय. पहिल्या नंदिसंघाच्या परंपरेंत 'समाधिशतक' वगैरे ग्रंथाचे कर्ते श्री पूज्यपादस्वामी यांनींही दीक्षा घेतली होती; ते या संघांतले दहावे मुनि होत अशीहि माहिती उपलब्ध आहे. श्रीपूज्यपादस्वामी हे इ. सनाच्या पांचव्या शतकांत होऊन गेले हें आम्हीं समाधिशतकाच्या प्रस्तावनेंत सिध्द केलें आहे. अर्थात् श्री पूज्यपादस्वामीच्या पाठीमागून सुमारें चारपांचशें वर्षांनीं अमृतचंद्र हे नंदिसंघाच्या पीठावर आरूढ झाले असावेत असे दिसते. यावरून आमचें चरित्रनायक हे इ. सनाच्या नवव्या शतकांत होते असें म्हणावयास हरकत नाहीं.

पुरुषार्थसिध्द्युपाय या ग्रंथाचे संस्कृत टीकाकार यांनीं आमच्या या चरित्रनायकाची बुध्दि चोहोंकडे अकुंठीत झालेली पाहून त्यांना 'कलिकालगणधर' या परम विद्वत्तासूचक पदवीनें विभूषित केलें आहे. यावरून त्यांची विद्वत्ता व अधिकार केवढा मोठा असला पाहिजे व त्यांच्या अगाध ज्ञानाबद्दल व अचाट बुध्दिमत्तेबद्दल तत्कालिन विद्वज्जनसमूहामध्यें केवढी दांडगी आदरबुद्धि वसत असली पाहिजे याची सहज कोणासहि कल्पना करतां येईल. ज्या नंदिसंघाच्या आचार्यपरंपरेंत प्रातःस्मरणीय परमभट्टारक श्री. कुंदकुंदस्वामि होऊन गेले त्याच संघांस श्रीमदमृतचंद्रसूरि यांनीं भूषविलें होतें असें पट्टावलीवरून दिसून येतें. जगतांतील महान् साधूंमध्यें गणना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होण्याइतकें अमृतचंद्रांचें विभूतिमत्व आहे. कुंदकुंदस्वामींचे जेवढे ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांपैकीं प्रायः सर्वांवर यांनीं परमोत्तम टीका लिहिल्या आहेत; या टीका ग्रंथांवरून आचार्यांचें संघवात्सल्य व श्रध्दाभाव हीं चांगलीं व्यक्त होतात. यांचे सर्व टीकाग्रंथ अतिशय सोपे व भावव्यंजक—मूळ आचार्यांचा भाव व हेतु अगदीं यथातथ्य दाखविणारे—असे आहेत. यांचे-सारखे महान् विद्वान्, निस्पृह, नीतिमान् व उपदेश करण्यास अधिकारी असे आचार्य विरळे. कुंदकुंदाचार्यांच्या ग्रंथांचा यांनीं सूक्ष्म व मार्मिक-रीतीनें अभ्यास केला असल्यामुळें ते त्या ग्रंथांचे पूर्ण ज्ञाते झाले होते. त्यामुळें त्यावरील त्यांचें विद्वत्ताप्रचूर भाष्य (टीका) सर्वत्र प्रमाणभूत मानण्यांत येते. अमृतचंद्रसूरींनीं या टीकाग्रंथांत मूळांतील अर्थ विशद रीतीनें समजावून सांगितला आहे. यांची विषय प्रतिपादनशैली साधीच पण चित्ता-कर्षक आहे; न्याय, व्याकरण, काव्य, सिध्दांत वगैरे सर्व विषयांत ते पारंगत होते. त्यांच्या ग्रंथामुळें त्यांना अमरत्व प्राप्त झालें आहे. त्यांना होऊन गेल्यास अनेक वर्षे लोटलीं; पण त्यांच्या नांवाचा विसर जगास अजून पडला नाहीं, व पुढेंही पडेल असें वाटत नाहीं; कीर्तिरूपानें हें नरपुंगव निरंतर राहणार.

आचार्यप्रवर श्री अमृतचंद्रसुरींचे ग्रंथ.

१ आत्मख्याति समयसार टीका. (समयप्राभृत.)
२ प्रवचनसार टीका.
३ पंचास्तिकायसमयसार टीका.
४ तत्वार्थसार. (तत्वार्थसूत्राचें सुबोध अनुकरण.)
४ तत्त्वदीपीका.

---

१ टीपः—प्रवचनसार या ग्रंथांवरील संस्कृत टीका ' तत्वदीपिका ' नांवानें प्रसिध्द आहे. तत्वदीपिका नांवाचा दुसरा स्वतंत्र ग्रंथ नाहीं. ' प्रवचनसार टीका ' व तत्त्वदीपिका हे दोन निरनिराळे ग्रंथ आहेत असें सम-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६ पुरुषार्थसिध्द्युपाय.

या सहा ग्रंथांपैकीं समयसारकलश (अध्यात्मतरंगिणी), तत्त्वार्थसार व पुरुषार्थसिध्द्युपाय हे तीन ग्रंथ सनातनजैनग्रंथमालेच्या प्रथम गुच्छकांत छापून प्रसिध्द झाले आहेत.

नाट्यसमयसारकलशः—श्रीमद् कुंदकुंदाचार्यांनीं प्राकृत गाथाबद्ध हा ग्रंथ लिहिला आहे. त्यावर ही टीका श्रीमदमृतचंद्रसूरींनीं लिहिली आहे. कुंदकुंदाचार्यांच्या काव्याचे आपले चरित्रनायक हे चांगले मुरब्बी होते याचें प्रत्यंतर या टीका ग्रंथांत ठिकठिकाणीं पहावयास सांपडेल. हा द्रव्यानुयोगावरील ग्रंथ आहे. निश्चय व व्यवहारनयद्वारें पदार्थांचें स्वरूप समजून घेऊं इच्छिणाऱ्यांना हा चांगला मार्गदर्शक होईल. अशा या अपूर्व व उपयुक्त ग्रंथाचें मराठी भाषांतर धर्मभूषण विदूषी ब्र. कंकुबाई यांनीं केलें असून तें सन १९२३ सालीं प्रसिद्ध झालें आहे. समय म्हणजे जीव, सार म्हणजे- शुद्ध. या ग्रंथांत काय आहे याबद्दल आचार्य म्हणतात, 'अयमिह परमार्थ श्चेत्यतां नित्यमेकः ।' 'ह्या अध्यात्मिक ग्रंथांत हा परमार्थ आहे' तोच निरंतर अनुभवण्यास योग्य आहे, ज्ञानमय असा जो समयसार—शुद्धात्मा— त्याच्याशिवाय दुसरा कोणताहि निश्चयानें सारभूत पदार्थ नाहीं. या परमार्थ्याचें अनुभवात्मक ज्ञान होऊन बुद्धि आत्मनिष्ठ म्हणजे सर्वांभूतीं सम व शांत होणें हाच खरा मोक्ष होय. हा ग्रंथ पूर्णतेला प्राप्त झाला आहे. जगास पाहणाऱ्या नेत्रांप्रमाणें आहे व अगाध ज्ञानी असा जो शुद्ध आनंदरूप परमात्मा त्यास प्रत्यक्षपणें प्राप्त करून देणारा आहे. या ग्रंथांत जीवाजीवाधिकार, कर्तृकर्माधिकार, पुण्यपापाधिकार, आस्रव ते मोक्ष यांवर पांच अधिकार, व सर्व विशुद्ध ज्ञानाधिकार वगैरे मिळून एकंदर बारा अधिकार आहेत.

जणें चुकीचें आहे. हा अध्यात्मविषयावरील अपूर्व ग्रंथ मुंबई युनिव्हर्सिटीनें एम्. ए. च्या शिक्षणक्रमांत (course) नेमिला आहे. ही फार समाधानाची गोष्ट आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या अधिकारांत अमृतचंद्राचें हृद्गत पाहण्यास सांपडतें. या महात्म्याच्या वाणींत–कलशांत–त्याच्या आत्मानुभवाचें–परमार्थाचें अगदीं सारसर्वस्व कसें सांठविलें आहे हें प्रामुख्यानें व्यक्त झालें आहे. विस्तारभयास्तव त्यांतील उतारे उद्धृत न करतां या ग्रंथाचे मुमुक्षूंनीं अवश्य अध्ययन करावें एवढीच प्रार्थना आहे. अमृतचंद्रसूरी यांच्या टीकेच्या साहाय्यानें कवीवर बनारसीदासजी यांनीं हिंदींत हा ग्रंथ छंदोबद्ध रचिला आहे. बारा अधिकारांशिवाय चतुर्दश गुणस्थानाधिकार नांवाचा तेरावा स्वतंत्र अधिकार बनारसीदासांनीं त्यास जोडला आहे, पण तो मूळांत नाहीं. ती त्यांची स्वतंत्र रचना होय. हा ग्रंथही फार उत्कृष्ट साधला आहे.

तत्त्वार्थसारः—याला मोक्षशास्त्र असें दुसरें नाव आहे. याचेंहि मराठींत भाषांतर प्रसिद्ध झालें आहे. जीवादि सप्ततत्वाचें यांत अगदीं सोप्या व सरळ भाषेंत वर्णन केलेलें आहे. श्रीमान् उमास्वामीकृत तत्वार्थ-सूत्राचें हें सर्वांना सहज समजणारें अनुकरण होय. उत्तम काव्यांत शब्द आणि अर्थ यांचें स्वरूप वेगळें करून दाखवितां येत नाहीं; कारण विष-याचें आणि भाषेचें त्यांत तादात्म्य झालेलें असतें. पुष्प व पुष्पाचा सुगंध ही जशी एकजीव असतात तसाच अर्थ आणि भाषा यांचा उत्तम काव्यांत एकजीव झालेला असतो, या कसोटीस हें काव्य उतरलें आहे एवढींच आम्हीं वाचकांस ग्वाही देतों. असला गहन विषय इतक्या सोप्या रीतीनें प्रतिपादन केला आहे यावरून त्यांचें बुद्धिवैभव कसें विस्तृत व व्यापक होतें हें सहज दिसून येतें. संसारसागरांत गटांगळ्या खाणाऱ्या मानवास आत्मज्ञान करून देऊन तरणोपाय दाखविण्याकरितांच आचार्यांनीं आपलें ग्रंथ लिहिलेले आहेत. या सर्व ग्रंथांत जैनांचें तत्वज्ञान ओतप्रोत भर-लेलें आहे.

पंचास्तिकायसमयसारः—या ग्रंथावर श्रीमदमृतचंद्रसूरी यांनीं संस्कृत टीका लिहिली आहे. यांत जीव, पुद्गल, धर्म, अधर्म व आकाश या पांच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अस्तिकोयांचें[1] सामान्य व विस्तारपूर्वक विवेचन निश्चयनयानें केलें आहे. यावरील पंडित हेमराजजीकृत हिंदी टीकाही वाचनीय आहे. याचे मराठी भाषांतर पं. निटवे यांनीं प्रसिद्ध केलें आहे. या टीकाग्रंथावरूनही अमृतचंद्राचार्यांनीं कुंदकुंदाचार्य उत्तम पचविला होता ही गोष्ट सिद्ध होतें.

पुरुषार्थसिध्द्युपाय:—प्रस्तुत ग्रंथ काव्याच्या दृष्टीनें व तसाच अध्यात्मिक दृष्टीनें लोकादरास अत्यंत पात्र झाला आहे. मुख्य जें प्रमेय म्हणजे निरूपणाचा विषय तो स्पष्ट करून दाखविण्याकरतां योग्य व समर्पक उपमा आणि व्यवहारांतील अनेक दृष्टांत देऊन, वाचकांच्या मनांत गहन विषय सुद्धां बिंबवून देण्याची अजब हातोटी अमृतचंद्रसूरीखेरीज कोणासही साधली नाहीं. लोकांचें शील सुधरावें; त्यांना नीतिमान्, सदाचरणी करावें; व खऱ्या पुरुषार्थाची त्यांना ओळख करून देऊन परमार्थाकडे—मोक्षमार्गाकडे त्यांची प्रवृत्ति वळवावी याच हेतूनें आचार्यांनीं हे अमूल्य ग्रंथ लिहिले आहेत. पुरुषार्थसिद्ध्युपाय यांतील अहिंसेसंबंधीं दयामय भावनेनें थबथबलेले अमृतचंद्रसूरींचे विचार वाचले म्हणजे या आचार्यांच्या अंतःकरणांतून प्रेमळ व कोमल भावनेचा अखंड व जिवंत असा झरा सतत वाहात आहे असें वाटतें; काव्यांत भावनेला केवढी मोठी कामगिरी करतां येते याचीहि आपल्याला योग्य ती जाणीव होते. आमच्या चरित्र नायकाच्या अंतःकरणाचा जिव्हाळा हेंच त्याचें काव्य; या भावनेच्या किमयेनें या काव्यांतील प्रत्येक पदाचें सुवर्ण बनलें आहे. आचार्यांच्या या श्रद्धाळु व प्रेमळ स्वभावाचा विचार केला म्हणजे त्यांच्या वाणीच्या माधुर्याचें रहस्य लगेंच ध्यानांत येतें. दयेचा तर ते सागरच होते. काव्याचा आत्मा, जो भावनेचा ओलावा, तोहि पुरुषार्थसिद्ध्युपाय या ग्रंथांत असल्यानें अहिंसा—धर्माचा हा काव्यरूप अवतारच होय असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. आत्मज्ञानाचे गहन

---

१ अस्ति—आहे, काय—शरीर. या पांच द्रव्यांना जैनागमांत अस्तिकाय हें नांव दिलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सिद्धांत प्रासादिक भाषेनें आबालवृद्धांना सुगम करणारा हा ग्रंथ उत्तम काव्यांत गणला जाईल. आचार्यांच्या सर्व कृतींत पुरुषार्थसिद्धयुपाय हा तत्त्वज्ञानपर किंवा नीतिशास्त्रपर ग्रंथ अग्रस्थानीं शोभण्यासारखा आहे. येथपर्यंत मूळ ग्रंथकार श्रीमदमृतचंद्रसूरि व त्यांचे ग्रंथ विशेषतः पुरुषार्थ-सिद्धयुपाय यासंबंधीं आम्हांला जी माहिती मिळूं शकली व जीं साधनें उप-लब्ध झालीं त्याच्या आधारें हे चार शब्द लिहिले. आतां ही प्रस्तावना लिहिण्याची सुसंधि मला कशी प्राप्त झाली हें येथें सांगणें क्रमप्राप्त आहे.

माझे मित्र 'अज्ञात' कवि यांनीं पुरुषार्थसिध्द्युपाय या संस्कृत ग्रंथाचा आर्यावृत्तांत मराठी अनुवाद केला आहे; व तो सुबोध व सरस असून त्यामुळें मूळाच्या अर्थाचें मार्मिक ज्ञान होतें. अज्ञात कवींचें हें पहिलें काव्यसुमन नसून, यापूर्वीच्या त्यांच्या तीन चार सुमनांचा सुगंध जैन–महाराष्ट्र–वाचकवर्गांत चोहींकडे दरवळत असून त्यांचीं अंतःकरणें त्यांनीं आकर्षण करून घेतलीं आहेत; तेव्हां अशा नांवा-जलेल्या कवींच्या एका मोठ्या व सुंदर कृतीस माझ्यासारख्या कवि नस-लेल्या अज्ञ माणसाकडून प्रस्तावना लिहून घेण्याचा मोह त्यांना कां पडला याचें मला तर मोठें गूढ वाटतें; पण कार्लाइलनें म्हटल्याप्रमाणें ' we are all poets, when we read a poem well " म्हणजे आपण सर्व थोड्या फार अंशांनीं कवि आहोंत. आणि रसिकतेची थोडी फार देणगी जन्मतःच आपल्याला मिळालेली असते; या दृष्टीनें त्यांनीं ही कामगिरी मजकडे सोंप-विली असल्यास न कळे ! अस्तु. या काव्यास त्यांनीं स्वतः प्रस्तावना लिहिली असती किंवा एखाद्या काव्याविषयांतलि अधिकारी अशा तज्ज्ञाकडे ही कामगिरी सोंपविली असती तर मला अधिक आनंद झाला असता. पण ज्या अर्थीं त्यांनीं हें काम आग्रहपूर्वक मजकडेच सोंपविलें त्या अर्थीं मला त्यांच्या त्या प्रेमळ सूचनेचा अव्हेर करतां येईना. अज्ञात कवीची वाणी साधी, सरळ, सहजसुंदर पण मोहक आहे. त्यांची वर्णन करण्याची शैलीही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चांगली आहे. त्यांच्या काव्यांत विद्वत्तेचा भरीवपणा नाहीं; तसेंच कृत्रिमपणाचा, नटवेपणाचा लवलेश नाहीं. तथापि स्थलविशेषीं प्रसाद व माधुर्य हें गुणहि बरेच आहेत. हें आम्हीं ' साधुशिक्षा ' या ग्रंथाचें परीक्षण करतांना त्यांतील उतारे देऊन त्यावेळीं दाखविलें आहे. अज्ञात कवीला 'अन्तर्मुख ' कवीच्या मालिकेंत बसविण्याला आम्हांला मुळींच दिक्कत वाटत नाहीं; कारण लक्ष्मी, तारुण्य वगैरे बाबतींत कवीची सर्वतोपरि चांगली अनुकूल परिस्थिति असूनही तो जगाकडे—त्यांतील भोग्य विषयांकडे—बहिर्मुख दृष्टीनें पाहात नाहीं; आणि हेंच या कवीचें वैशिष्ट्य होय. या विसाव्या शतकांतहीं भोंवतालचें जग अगदीं ख्यालीखुशालींत व ऐषआरामांत लोळत पडलेलें दिसत असूनही खऱ्या श्रद्धाळु अंतःकरणाला विषयसुखाची असारता कशी तात्काळ पटते व त्यामुळें या ऐहिक सुखोपभोगांपासून कसा तो अलिप्त राहूं इच्छितो याचें अज्ञात कवि हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ऐहिक वैभवाविषयीं जर मन उदासीन असेल तरच परमार्थ हातीं लागेल; व परमार्थ हातीं लागल्याशिवाय पुरुषार्थाची खरी सिद्धि होणार नाहीं, या गोष्टीचें अज्ञात कवींस प्रत्यंतर आल्याचें त्यांनीं आजपर्यंत प्रसिद्ध केलेल्या काव्यांवरूनही स्पष्टपणें दिसून येतें. किंबहुना वर्ण्य विषयाशीं कवीचें तादात्म्य झालें म्हणजे एका भाषेंतला अर्थ दुसऱ्या भाषेंत उत्तम रीतीनें कसा व्यक्त करतां येतो याचा प्रस्तुत अनुवाद हा एक उत्कृष्ट दाखलाच होय. अशा प्रकारची विषयाशीं तन्मयता म्हणजे काव्यकलेचा कळस होय. अज्ञात कवींच्या या गुणांमुळें त्यांची कविता भाषांतरित किंवा रूपांतरित आहे असें वाटत नाहीं. असलें हें आल्हादजनक काव्य लिहून जैनवाङ्मयाची मोठीच कामगिरी या कवीनें केली आहे. कवितेखालीं दिलेल्या टीपा व जैनागमांतील प्रमेयांबद्दल व पारिभाषिक शब्दांबद्दल दिलेलें स्पष्टीकरण यांमुळें ग्रंथाच्या उपयुक्ततेंत चांगलीच भर पडली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अज्ञात कवींच्या काव्यांतील कांहीं उतारे आम्हीं खालीं उध्दृत केले आहेत त्यांवरून त्यांची योग्यता वाचकांच्या सहज ध्यानीं येईल.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सिंहाचें ज्ञान न ज्या, त्या भासे सिंहतुल्य मार्जार।
भासे अनिश्चयज्ञा तेंवि निश्चयासमान संसार ॥ ७ ॥

यांत निश्चयनयाचें स्वरूप ज्याला कळलें नाहीं असा पुरुष व्यवहारालाच निश्चय समजतो हा एकच मुद्दा फार समर्पक असा दृष्टांत देऊन सिद्ध केला आहे.

गळला दर्शन मोहहि झाला तत्वार्थ सकल ज्या ज्ञात।
दृढचित्त मनुज असला सम्यक्चरितग्रहार्थ हो उचित ॥ ३७ ॥

म्हणजे सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान या दोहोंची प्राप्ति झाल्यानंतर, दृढनिश्चयी मनुष्यानें सम्यक्चारित्राचा अंगिकार करावा. या श्लोकांत सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान यांस जें आद्यस्थान दिलें आहे तें अगदीं योग्य आहे. हल्लीं फक्त चारित्रधर्माचाच अंगिकार केलेल्या कांहीं साधूंना शास्त्रार्थाकरितां वेळोवेळीं पुस्तकी पंडिताच्या तोंडाकडे पहावें लागतें, व ते सांगतील तो अर्थ निमूटपणें मान्य करून त्याचीच जी 'री' ओढावी लागते त्याचें कारण त्यांच्या ठिकाणीं सम्यग्ज्ञानाचा अभाव हेंच होय. यामुळें सम्यक् अर्थात् योग्य चारित्र पाळीत असतांही परावलंबीपणाचा दोष येतो व कित्येक प्रसंगीं धरसोडीपणाचा जो आरोप त्यांचेवर येतो त्याचें कारण त्यांचा 'शिथिलाचार' हें नसून, शास्त्रार्थाच्या बाबतींत त्यांना फारसें ज्ञान नसल्यामुळें, त्यांची या 'ज्ञानी' म्हणविणाऱ्या लोकांनीं केलेली दिशाभूल हें होय; हा अनवस्था प्रसंग टाळावयाच्याच हेतूनें अमृतचंद्रसूरि यांनीं पुरुषार्थसिद्ध्युपाय या ग्रंथांत 'समञ्जसज्ञानविदिततत्वार्थैः सम्यक्चारित्रमालम्ब्यम्' असें म्हटलें आहे. अतएव, कवीनें हाच मुद्दा मुमुक्षूंच्या अंतःकरणावर बिंबविण्यासाठीं पुढें म्हटलें आहेः—

'होई सम्यग्नामां चरित्र अज्ञान–युक्त ना पात्र।
ज्ञानानंतर कथिलें म्हणुनी आराधण्यास चारित्र ॥ ३८ ॥

म्हणजे अज्ञानपूर्वक चारित्र 'सम्यक्' हें नांव धारण करण्यास योग्य होत नाहीं; म्हणून प्रथम ज्ञान व नंतर चारित्र असा क्रम ठेवणें हेंच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रेयस्कर होय. औषधाचे गुणधर्म माहीत असल्याशिवाय जर तें सेवन केलें तर ज्याप्रमाणें मृत्यु येण्याचा संभव असतो त्याप्रमाणें ज्ञानाशिवाय चारित्र्याचा अंगिकार केल्यानें, तें संसारवृद्धीलाच कारणीभूत होतें. किंबहुना प्राण निघून गेल्यावर प्रेतांचे ठिकाणीं असलेले इंद्रियांचे आकार ज्याप्रमाणें व्यर्थ होत त्याप्रमाणें ज्ञानाशिवाय धारण केलेलें शरीर हें ज्ञान-रहित शुद्धोपयोगाची प्राप्ति करून घेण्याला साधनीभूत होऊं शकत नाहीं.

अमृतचंद्राची भाषा जोमदार, मर्मभेदक, तीक्ष्ण, मृदु, गंभीर, जसा वेळप्रसंग असेल त्याप्रमाणें, अर्थाचें जें स्वरूप असेल तशी तदाकार बनते. ज्या भागांत आचार्यांनीं तत्त्वज्ञान सांगितलें आहे तेथें तिचें उज्ज्वल रूप पाहावयास मिळेल. या ठिकाणीं अज्ञानी साधूचा उपहास करून त्याचे मनावर ज्ञानाचें महत्त्व बिंबविणें असल्यामुळें तिनें कठोर, तीक्ष्ण रूप धारण केलेलें दिसेल.

पुरुषार्थसिध्युपाय ग्रंथांतील ४३ व्या श्लोकापासून तों १७५ व्या श्लोकांपर्यंत आचार्यांचा अत्यंत आवडीचा विषय जो ' अहिंसाधर्म ' त्यावर त्यांनीं शास्त्रीयरीत्या सांगोपांग निरूपण करण्यास सुरुवात केली आहे. त्या काळींही यज्ञयागांतील हिंसेचें भयंकर स्तोम माजलें होतें. लोक महायज्ञ राष्ट्रीय महोत्सवाप्रमाणें साजरे करीत असत. याप्रमाणें रूढीरूपी राक्षसिणीनें धर्माच्या नावांखालीं पशुवध करण्याचें अव्याहत सत्र चालूं ठेविलें असता खऱ्या सात्त्विकवृत्तीनें आणि भूतदयेनें प्रेरित होऊन लोकनिंदेची पर्वा न करतां, रूढ दुराग्रहांचा आचार्यांनीं जो प्रतिकार केला त्यावरून ते फारच लोकोत्तर साधुपुरुष होते यांत संशय नाहीं. हिंसेची व्याख्या सांगत असतां त्यांतच जिनागमाचें सार आहे असें या विभूतीनें जे उद्गार काढले आहेत ते अत्यंत उद्बोधक व हृदयस्पर्शी आहेत. कवि म्हणतोः—

जो द्रव्यभावरूप प्राणाचा वध घडे कषायानें ।
हिंसा अवश्य तेथें अवतरते कथियलें असेंच जिनें ॥ ४३ ॥
रागादींची होणें उत्पत्ति न अहिंसाच ती सत्य ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तदुत्पत्ति ती हिंसा ऐसें जिनधर्मसार संक्षिप्त ॥ ४४ ॥

याप्रमाणें जिनधर्माचें रहस्य सांगून हा थोर कवि पुढें म्हणतो:—

एकाला फळ तीव्रचि दुसऱ्याला सौम्य तीच फळ देते ।
दोघांची सम असली हिंसा शेवटिं विचित्र फळ फळतें ॥ ५३ ॥

म्हणजे एकाद्या मनुष्यप्राण्याचा वध करतांना दोघांनीं सारखा भाग घेतला असल्यास त्या गुन्हेगारांना जगांतलें पिनल कोड जरी समसमान शिक्षा सांगत असलें तरी जैनागमांत त्यांना सारखी शिक्षा फर्माविण्यांत आलेली नाहीं. जैनागमांत परिणामाला—भावांना—अत्यंत महत्व दिलें असल्यामुळें दोघांनीं जरी एकच गुन्हा केला असला तरी ज्याचे परिणाम तीव्र कषायरूप होतात त्यालाच हिंसेचें फळ आधीं भोगावें लागतें. व ज्याचें परिणाम—मनाचे भाव—मंद कषायरूप होतात त्यास त्याचें फळ कमी भोगावें लागतें. परिणामाच्या तरतम भावांवरून शिक्षेंत होणारें हें महदंतर योग्य व न्याय्य नाहीं असें कोणता सूज्ञ मनुष्य म्हणूं शकेल ?

येथें व यापुढें जे हिंसेचे सूक्ष्म भेद; तिचें उच्च, नीच फळ, त्याचप्रमाणें हिंसा करणाऱ्या गुन्हेगाराच्या मनाचे परिणाम व त्यामानानें प्रत्यक्ष त्या गुन्हेगारांस किंवा इतरांस होणारी कमीजास्त शिक्षा, यासंबंधीं मूळ आचार्यांनीं केलेलें वर्णन व त्यावर महाराष्ट्र भाषेंत ' अज्ञाता ' नीं चढविलेला सुंदर व आल्हादजनक पेहेराव सर्वांनीं विशेषत: जैनेतर तसेंच पाश्चात्य विद्वानांनीं व मुमुक्षूंनीं अवश्य पाहण्यासारखा आहे व तो पाहून त्याचें मनन करावें एवढीच आम्हीं त्यांना सविनय प्रार्थना करतों. कारण, पाश्चात्य पंडितांना सुद्धां अलिकडे या अहिंसा—धर्माचें महत्त्व पटूं लागलें आहे.

बालवीरांची (Scout) चळवळ कांहीं वर्षांपूर्वी निघाली असून तिचा प्रसार हल्लीं सर्व जगभर झाला आहे. या संस्थेचे सर्व जगांतील मुख्य बालवीर यांनीं एका नांमांकित मासिकांत '*An ancient scout law*'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असा मथळा देऊन सन १९२६ च्या मे मध्यें खालील माहिती प्रसिद्ध केली आहे.

"The Emperor Asoke more than 200 years before Christ gives our moral law for the guidence of his people among those were the following.—Thus said, His Majesty "Father and mother must be obeyed *Similar—respect for living creatures must be enforced* " यांत राजा अशोकेचे फरमोन प्राणिमात्रांविषयीं प्रेम अर्थात् आम्हां जैनांचे ' सत्वेषु मैत्री ' हें तत्त्व बाल-वीरांनीं नेहमीं ध्यानांत ठेवावें असा या आद्य बालवीर—संस्थापकांनीं उपदेश केला आहे. सारांश, अशोकानें प्रतिपादन केलेलें अहिंसेचें हें सामान्य तत्व जर या लोकांना इतकें पटत आहे तर आमच्या पूर्वाचार्यांनीं युक्तिवादानें अत्यंत परिणामकारक रीतीनें, कुशलतेनें प्रतिपादिलेला जैनांचा हा अहिंसा धर्म योग्य दिशेनें प्रयत्न केल्यास खास पटून त्याचें विश्वधर्मांत रूपांतर खात्रीनें होईल, असें आम्हांस वाटतें. पण दुर्दैवानें जैनांतील हें उत्कृष्ट वाङ्मय निरनिराळ्या भाषेंतून प्रसिद्ध न झाल्यामुळें जैनवाङ्मयाची उज्ज्वलता पर-धर्मीयांस दिसूं शकली नाहीं, व अहिंसाधर्माची छाप त्या वेळेस जशीं बसावयास पाहिजे तशी बसूं शकली नाहीं. जैन आपआपसांतील मतभेद विसरून जावोत; त्यांच्या हातून वाङ्मयप्रसार होऊन जैन धर्माची खरी सेवा घडो व अहिंसा धर्माची ध्वजा सर्व जगभर उज्वलतेनें फडको एव-

---

१ टीपः—श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे यांनीं ग्रंथमाला या मासिकांत अशोकाचें चरित्र लिहिलेलें आहे. त्यांत त्याचे १४ आदेश दिले आहेत त्यांपैकीं खालीं कांहीं देतों. " प्राण्याची हिंसा ही अजिबात बंद करण्यांत आली आहे. आतां मांसाहाराच्या मेजवान्या व्हावयाच्या नाहींत; कारण त्यांत फार पाप घडतें. असें राजा प्रियदर्शी (अशोक) यांस वाटत आहे. यापुढें मुदपाकखान्यांत सत्कार्यासाठींसुद्धां हिंसा हेणार नाहीं, असें राजानें ठरवून टाकलेलें आहे. "

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ढीच त्या जिनेंद्र प्रभुजवळ नम्र प्रार्थना करून 'अज्ञात' कवीनें मद्यपि माणसाच्या हातून पाप—हिंसा—कशी घडतें याचें जें यथातथ्य चित्र रेखाटलें आहे त्याकडे वाचकाचे लक्ष्य आकर्षित करतों.

मद्य मना मोहवितें मोहित मनुजांस नाठवे धर्म ।
अविशंक आचरितो हिंसा नर विसरलाच जो धर्म ॥ ६२ ॥

मद्यपानाचे दुष्परिणाम यांत हुबेहूब दाखविले आहेत; कैलासवासी—परशुराम-पंत गोडबोले यांनीं असेंच उद्गार काढले आहेत:—

जे मद्यपान करिती नर त्यांची बुध्दि होतसे भ्रष्ट ।
नष्ट श्री होउनियां ते लोकीं बहुत पावती कष्ट ।

हें चित्रही तितकेंच उठावदार व हृदयस्पर्शी असल्यामुळें येथें मुद्दाम दिलेलें आहे. या वर्णनांत कोठेंही अतिशयोक्ति नाहीं, कृत्रिमपणा नाहीं, नटवेपणाचें—औपचारिक अलंकाराचें नांवच नको ।

पुढें धर्माकरतां हिंसा करण्यांत दोष नाहीं, या भ्रामक समजुतीनें कधींहि प्राणिवध करूं नका; असें मोठ्या कळकळीनें कवीनें बजाविलें आहे.

सूक्ष्मचि भगवध्दर्म, न धर्मास्तव हिंसनांत मुळिं दोष ।
या धर्ममुग्धहृदयें मारूं नये कधिं शरीरिजीवांस ॥ ७९ ॥

यानंतर देवानेंच धर्म उत्पन्न केला आहे. तेव्हां त्याला सर्व कांहीं देणें योग्य आहे अशा मिथ्या भावनेनें देवापुढें जीवहिंसा करणें हेंही निषिद्धच आहे असें म्हटलें आहे. तसेंच अतिथीकरतां किंवा पूज्य पुरुषाकरतां कोणत्याही प्रसंगीं किंवा कसल्याही निमित्तानें हिंसा करणें उचित नाहीं. आधिव्याधि यांनीं गांजलेल्या प्राण्यांना जर ठार केलें तर ते तत्क्षणीं दुःखमुक्त होतील असें मानणें हें व तसेंच आत्महत्या करणें हेंहि मिथ्याश्रद्धान—भ्रामक समजूत—आहे. आपल्या शरीरांतलि मांसदान अतिथींस किंवा मुमुक्षुजीवांस देण्याकरतां किंवा दुःखमुक्त होण्याकरतां आत्महत्या करणें हेंही योग्य नाहीं. अहिंसाधर्माचें इतकें उठावदार ललितरम्य व परिणामकारक असें शब्दचित्र दुसऱ्या कोणत्याही कवीनें काढलेलें आपणास आढळणार नाहीं. या ठिकाणीं भिन्न-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भिन्न कारणें दाखवून जीववध जो अनेक प्रसंगीं होतो त्याचें वैय्यर्थ्य दाखाविलें आहे. हिंसा कधींहि, केव्हांहीं व कसलीही करूं नये अशी आचार्यांची निर्धाराची वाणी आहे. त्या वाणींत कल्पनेची कल्पनातीत कोमलता आहे. या भागांत कवीचा सात्विक प्रेमळपणा, अंतःकरणाची कळकळ, त्यास प्राणिमात्रांविषयीं वाटत असलेली भूतदया हे सर्व गुण अवतरलेले दिसतात. या पुढील भागांत अनृत, चोरी, अब्रह्म वगैरे पापें करणाऱ्याच्या हातून हिंसा कशी घडते याचें मोठें मार्मिक विवेचन केलेलें आहे. तें मूळ ग्रंथावरून अवश्य वाचावें; चोरी ही हिंसा कशी होते एवढें एकच उदाहरण खालीं देतों. त्यावरून या कवितेंतील कल्पना किती कोमल व रमणीय आहे हें वाचकांस सहज दिसून येईल.

जो जन ज्याच्या हरितो अर्था त्याचे हरीतसे प्राण ।
कारण धनादि सगळे असति नराचे बहिश्चरप्राण ॥ १०३ ॥

धन धान्य वगैरे वस्तू संसारी जीवाचे बाह्य प्राण होत. अतएव या वस्तूंचा वियोग होतांना मरणप्राय दुःख होतें; म्हणून चोरी ही साक्षात् हिंसा होय असें आचार्य म्हणतात. योग्य दृष्टांत, समर्पक शब्द कवीला धुंडाळावे लागले नाहींत तें त्याला सहज सुचतात हें या व इतर आर्यांवरून सहज कोणालाहि दिसून येईल. परिचित कल्पनेचा उठावहि वरील आर्येंत इतक्या कुशलतेनें केला आहे कीं, त्यामुळें त्या परिचित कल्पनेलाहि एक प्रकारचें नवीनच सौंदर्य प्राप्त झालें आहे.

कवीनें त्यागधर्माचें वर्णन येणेंप्रमाणें केलें आहेः—

धनधान्यवास्तुवित्ता त्यागाया जो कुणीहि शक्त नसे ।
कृश ते तयेंचि करणें कारण कीं, 'त्यागरूप' तत्व असें ॥१२८॥

म्हणजे, मनुष्यानें धनधान्यादिकांचा परिग्रह शक्य तितका कमी करावा; कारण त्याग हेंच खरें तत्व होय.

पुढें शीलाचें कां रक्षण करावें याबद्दल आचार्य म्हणतातः—

तट रक्षितात जैसें नगरां तैसे व्रतास जागीं शील ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्रतपालनार्थ शीलां पाळावें श्रावकें सदा विमल ॥१३६॥

यांतहि शीलाला जी तटाची व व्रताला जी नगराची उपमा दिली आहे ती खरोखरच समर्पक असून आल्हादजनक आहे.

शृंगाररसप्रधान अश्लील कादंबऱ्या नाटकें, व लघुकथा असल्या वाङ्मयाचा निषेध करतांना कवि म्हणतोः—

रागास वाढवीती ज्या, त्या अज्ञानयुक्त दुष्ट कथा।
कधिं नच ऐकाव्या वा संग्रहिं घ्यावा न शिक्षणास वृथा ॥ १४५ ॥

राग, प्रेम, द्वेष, मोह वगैरे विकार वृद्धिंगत करणारें घाणेरडें वाङ्मय वाचल्यानें पापास्रव होतात. अतएव असलीं पुस्तकें वाचणें किंवा वाचविणें अथवा संग्रहीं ठेवणें हें सर्वथैव त्याज्य आहे. आचार्य सद्‌गुरु असल्यामुळें उत्कृष्ट शिक्षकाप्रमाणें, जनतेमध्यें चांगल्या वाङ्मयाचाच प्रसार होऊन सदभिरुचि वाढावी या हेतूनें अश्लील वाङ्मयाचा यांत तीव्र निषेध केला आहे. पुढें आचार्यांनीं द्यूत, जुगार; सट्टेबाजी याचा निषेध केला आहे तो त्यांच्याच शब्दांत खालीं सांगतोः—

सर्वानर्थप्रथमं मथनं शौचस्य सद्म मायायाः।
दूरात्परिहरणीयं चौर्यासत्यास्पदं द्यूतम् ॥ १४६ ॥

अज्ञात कवीनें यास महाराष्ट्र पेहराव दिला तो असाः—

सर्व संकटीं पाहिलें अतोषकारीहि सद्ममायेचें।
त्यागावें दुरुन अशा द्यूता जें गृह असत्यचौर्याचें ॥ १४६ ॥

म्हणजे सर्व व्यसनांत श्रेष्ठ, किंवा सर्व अनर्थांचें आद्य कारण संतोष नाहींसें करणारें, मायाचाराचें माहेरघर व चोरी आणि असत्य यांचें स्थान असा जो जुगार उर्फ सट्टेबाजी याचा दुरूनच त्याग करावा. कारण जुगारी हा द्यूतांत चोरी करतो व खोटें बोलतो; जेव्हां हा जुगारांत द्रव्य घालवितो, तेव्हां मोहानें चोरी करतो. अथवा द्रव्य न देण्याच्या इच्छेनें असत्य बोलतो; व जेव्हां त्यांतच द्रव्य मिळवितो तेव्हां संपत्तीच्या धुंदींत मदोन्मत्त होऊन वेश्यागमनादि दुष्कृत्यें करतो; खोटें बोलतो व चोऱ्याही करतो. सारांश जुगा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रांत पापबंध अधिक होतो. अतएव तो सर्वथैव त्याज्य आहे; त्यापासून दूर राहणेंच सर्वस्वी श्रेयस्कर होय.

अतिथीसंविभाग कोणास व कसा शुद्ध अंतःकरणानें करावा याबद्दल हा थोर कीव म्हणतोः—

विधिनें दातृगुणवतें अर्पावा देय वस्तुचा भाग ।
निजपरकल्याणास्तव नग्न मुनीशास निश्चयें सांग ॥ १६७ ॥

अर्थात्—श्रावकानें दिगंबर मुनीला किंवा उत्कृष्ट पात्राला उत्तम आहार उत्तम विधिपूर्वक अवश्य द्यावा. उत्तम दात्याच्या अंगीं असलेल्या गुणांनीं विधिभूषित होऊन श्रावकानें हा आहारदान-विधि करावा; दान करण्यांत लोभाचा त्याग करावा लागतो; व लोभ हा हिंसेचाच एक प्रकार आहे; अतएव दान करण्यांत हिंसेचा त्याग होतो ही गोष्ट मोठ्या खुबीनें आचार्यांने येथें विशद करून दाखविलं आहे.

गृहमागताय गुणिने मधुकरवृत्त्या परानपीडयते ।
वितरति यो नातिथये स कथं न हि लोभवान् भवति ॥

अर्थात्

इतरां त्रास न देतां जो मधुकरवृत्तिनें घरीं येई ।
श्रावक कसा न लोभी ! त्या गुणि अतिथीस अन्न ना देई ॥१७३॥

म्हणजे भुंगा ज्याप्रमाणें फुलाला कोणत्याही प्रकारचा त्रास न देतां; त्यांतील सुगंध ग्रहण करतो त्याप्रमाणें रत्नत्रयमंडित, परमवैरागी मुनी दात्याला कोणत्याही प्रकारें त्रास न देता आहार ग्रहण करतात. अशा मुनीला सुद्धां जो श्रावक आहार देत नाहीं तो अवश्य लोभी समजावा. श्रावकांच्या घरीं त्यांचीं पात्रें धुंडाळून अन्नाची मोजदाद करून शिल्लक काढूं पाहाणाऱ्या तसेंच योग्य उपदेश न करतां वेळीं अवेळीं त्यांची हजिरी घेण्यांत भूषण मानणाऱ्या कांहीं आधुनिक साधुंनीं आहाराचे वेळीं पूर्वाचार्यांनीं उपदेशिल्याप्रमाणें मधूकरवृत्ति धारण केल्यास जैनागमाप्रमाणें वागल्याचें त्यांना खास श्रेय मिळेल.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या पुढील आख्यान सल्लेखनेचें आहे. सत् + लेखना= सल्लेखना. सत्= सम्यक् रीतीनें, लेखना = काय कषायांना कृश करणें. सल्लेखनेचें दोन भेद आहेत; शरीर कृश करणें याला बाह्य सल्लेखना; व अंतरंगांतील क्रोधादि कषाय कृश करणें याला अभ्यंतर सल्लेखना म्हणतात. अंतकाळच्या वेळीं ही सल्लेखना अवश्य करावी असें पूर्वाचार्यांनीं सांगितलें आहे. या आख्या-नांतही आचार्यांनीं आपलें वैशिष्ठ्य दाखविलेंच आहेत. या संन्यासमरणांत हिंसेला कारणीभूत असे कषाय कृश केले जातात म्हणून :—

सिद्ध्यर्थ अहिंसेच्या मुनिवर सल्लेखनेस ते कथिती ॥१७९॥

म्हणजे जेथें कषाय वृद्धिंगत होतात तेथें हिंसा घडते; व कषाय कृश—कमी—करणें यालाच सल्लेखनां म्हटलें आहे; अतएव सल्लेखनेंत कषाय क्षीण झाल्यानें अहिंसेची सिद्धी होते, असें यांत या वागीश्वरानें सिद्ध केलें आहे.

शेवटच्या सकलचारित्र आख्यानांत कवीनें दशधर्माचें वर्णन केलें आहे तें असें :—

मार्दव आर्जव संयम तप शौच क्षान्ति आणि तो त्याग ।
सत्य ब्रह्म अकिंचन हा हो दशधर्म सेवण्या योग्य ॥

हे दहा धर्म मुनि व श्रावक या दोघांनींहि आपापल्या योग्यतेप्रमाणें धारण करावेत. पुढें आचार्यांनें द्वादश भावनाचें चिंतवन करण्यास सांगितलें आहे. या बारा भावना निरंतर मननीय असतात. यांचें चिंतवन चाललें असतां, संसारतापानें होरपळून गेलेल्या आर्त जीवांस अपूर्व शांतता, आल्हाद व समाधान प्राप्त होतें. या विभूतीच्या काव्यकृतीचें नुसतें वरवर परीक्षण केलें तरी इतकें सहज लक्ष्यांत येतें कीं, अहिंसा धर्माचा गौरव व प्रसार, दुःखि-तांचें समाधान, नित्युपदेश, आत्मानुभवाचें कथन, हेंच त्यांच्या काव्याचें मुख्य हेतु होत. पुढें जैनांगमांतील बावीस परीषह सांगून त्यांना--उपसर्गांना-जिंकणें हें मुनीचें परम कर्तव्य आहे, असें म्हटलें आहे. हे उपसर्ग मोठ्या धैर्यानें व शांत चित्तानें सहन करणारा मुनि मोक्षमार्गापासून च्युत होत नाहीं.

विचारी माणसें गृहस्थधर्माचा अंगिकार करूनहि संसार करीत असतांनाही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ऐहिक सुखोपभोगांपासून विरक्त असतात; परमार्थाकडे जाण्याचीच त्यांची धांव असते; पण त्यांनींही वैराग्यप्राप्तीची संधि साधून मुनिपद धारण करून गृहस्थाश्रमांत असतांना अपूर्ण राहिलेल्या रत्नत्रयाला पूर्ण करून घ्यावें. यांत आचार्यांनीं रत्नत्रयाचे सकल व विकल रत्नत्रय असे दोन भेद सांगितले आहेत. सकल रत्नत्रय हा मुनिधर्म आहे; व विकल रत्नत्रय हा गृहस्थांचा धर्म आहे. हे दोन्हींहि रत्नत्रय मोक्षाला नेणारे आहेत; बंधाला कारणीभूत होत नाहींत. अतएव मुमुक्षूनें, सकल रत्नत्रय धर्म जर पाळवत नसेल तर निदान विकलरत्नत्रय धर्माचा अवश्य अंगिकार करावा; कारण हाहि परंपरेनें मोक्षालाच नेणारा आहे.

'या लोकीं रत्नत्रय होई निर्वाण हेतु नान्याचा।'

म्हणजे रत्नत्रय धर्म हा निर्वाणाप्रतच नेणारा आहे, दुसऱ्या गतीला तो नेत नाहीं, असें स्पष्ट म्हटलें आहे. शेवटीं ह्या रत्नत्रयरूपी मोक्षमार्गानेंच आत्मा परमात्मपदाला जाऊन पोंचतो, व तेथें मोक्षपदावर आकाशाप्रमाणें कर्मरूपी रजानें रहित अशा आपल्या अनंतदर्शनज्ञानस्वरूपांत हा अत्यंत निर्मल असा परमात्मा अनंतकालपर्यंत प्रकाशमान होत असतो. आचार्यांनीं ग्रंथकर्तृत्वाचें श्रेय स्वत:कडे कांहींही न घेण्यांत जो नैसर्गिक विनय आणि नम्रता दाखविली आहे ती अपूर्व आहे. ग्रंथाचा उपसंहार करतांना ते म्हणतात—

वाक्यें पवित्र रचिलें शास्त्रा, आम्ही परी न ते खास ॥ २२६ ॥

असाच उपसंहार आचार्यांनीं समयसारकलश व तत्वार्थसार याही ग्रंथांत केला असून स्वतःसंबंधीं लघुता प्रगट केली आहे. यावरून अती विद्वान व आत्मज्ञानी किती नम्र असतात हें सहज दिसून येतें. सारांश या आचार्यवराच्या प्रत्येक ग्रंथाच्या उपसंहारांतील श्लोकांत त्यांची रसिकता, ऋजुता, व नम्रता या तिहींचें रम्य प्रतिबिंब स्वच्छपणें पडलेलें आढळून येतें.

ही प्रस्तावना लिहितांना जैनांतील सुप्रसिद्ध साहित्य-सेवक व इतिहाससंशोधक पं. नाथुराम प्रेमी यांनीं लिहिलेल्या लेखांची फारच मदत झाली याबद्दल आम्ही त्याचें अत्यंत ऋणी आहोंत. आम्ही गुंफलेल्या प्रस्तावनारूपच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कां होईना, पूर्वाचार्यांच्या चरित्रमालेपैकीं हें चवथें चरित्र होय. श्री जिनसेनाचार्य व गुणभद्राचार्य यांचीं चरित्रें लिहिलीं त्याचवेळीं अशीं चरित्रें प्रसिद्ध करण्याचें अभिवचन दिलें होतें. तें पूर्ण करण्याची सुसंधी 'अज्ञात' कवीच्या या काव्यामुळें मिळाली याबद्दल त्यांचेही आभार मानणें जरूर आहे. जैनेतिहासाबद्दल योग्य साधनें उपलब्ध नसल्यामुळें जर कांहीं यांत दोष राहिले असतील तर त्याबद्दल सूज्ञ वाचकांनीं क्षमा करून आम्हांस कळविण्याची कृपा करावी. शेवटीं अज्ञात कवींनीं लिहिलेल्या या उपयुक्त वाङ्मयाचा समाजानें योग्य तो परामर्श घ्यावा एवढींच विनंती आहे. जैन वाङ्मयोपवनांतील उमललेलीं नामीं नामीं पुष्पें निवडून सुंदर माळा गुंफण्याचा अज्ञात कवीनें जो उपक्रम केला आहे तो अत्यंत अभिनंदनीय आहे. या माळेंत गुंफल्या जाणाऱ्या विविध पुष्पांच्या सौरभानें दशदिशा दरवळून जाऊन ही माळ उत्तरोत्तर सर्वांना अधिक प्रिय होवो अशी जिनेंद्रचरणीं नम्र प्रार्थना आहे. कै. परशरामपंत गोडबोले यांनीं नवनीत ग्रंथांत रसिक जनांस ग्रंथ कर्त्यांची जी प्रार्थना केली आहे तीच या ग्रंथासंबंधींहि सर्वस्वी अनुरूप असल्यामुळें आम्ही येथें अज्ञात कवीकरितां उध्दृत करितोंः--

काव्यामृताचा नवनीत भेला ।
हा गोड लागो तुमच्या जिभेला ।
याची तुम्ही चाखुनि घ्याल गोडी ।
तेव्हां सुखाची मिळवाल जोडी ॥

परम पुरुष निज अर्थको साध भये गुणवृंद ।
आनंदामृतचंद्रको वन्दत हूं सुखकंद ॥ (पं. टोडरमलजी)

शेवटीं ज्या कवीश्वरानें पुरुषार्थसिद्ध्युपाय या ग्रंथांत मधुर व अमृततुल्य असे अमृतालाप काढून ग्रंथाच्या नांवाप्रमाणें स्वतःचें नांवहि सार्थ करून दाखविलें त्या श्रीमदमृतचंद्राचार्यांना मी विनयपूर्वक नमस्कार करून आपली रजा घेतो.

सोलापूर
ज्येष्ठ शु० ॥ ५ वी. सं. २४५४
२४ मे. १९२८

रावजी नेमचंद शहा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust eGangotri

परमपूज्य पिताश्री

हिराचंद अमीचंद गांधी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अर्पण-पत्रिका.

प्रेमें लालनपालनीं सुख दिलें, तैसेंच जें शिक्षण
रागानें, अनुराग-युक्त-हृदयें तें होत संवर्धन।
त्याचें जें आजि अल्पस्वल्प फळ यें, त्यांचीचही थोरवी
अर्पी पितृकरीं कृतज्ञ-मनसें ही मत्कृती पांचवी॥

—अज्ञात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुद्धिपत्र.

सू:-शुद्धिपत्राचा उपयोग प्रथम करूनच नंतर पुस्तक वाचावें ही विनंती.

प्रस्तावना.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
११	१३	किती	किति
१४	२१	पाळल्या	पाळल्यानें
१६	२२	गुरुश्चुक्त	गुरुश्चुक्त
२७	२६	हेणार	होणार
३१	४	कीव	कवि
		म. पुरुषार्थसिद्ध्युपाय	
२	२	जे	जो
,,	,,	असते	असतो
५	१९	त्याचा	तिचा
७	७	नित निजरूपा जाणुनि	जाणुनि नित निजरूपा,
८	५	मनुजा	मनुजें
९	१९	होतात	होत नाहींत
९	२१	सूक्ष्मस्थूल	स्थूलसूक्ष्म
१२	२	क्रोध	....
१४	८	विष्टादिक	विष्ठादिक
,,	१५	सम्यग्धारि	सम्यक्त्वधारी
,,	१८	जाणतो	जाणतात
,,	२६	करणें	न करणें
१७	११	प्रज्ञभिज्ञान	प्रत्यभिज्ञान
१८	१८	व्याकारण	व्याकरण.
१८	१९	गो	गौ
१९	८	स्वरूप	स्वरुप
२०	८	मलीन	मलिन
२१	७	शुद्द	शुद्ध
,,	१३	तुषमांसारखा	तुषमाषासारखा
,,	२०	तासाचा	घटकांचा

(या पानांत पुढील ओळींत येणाऱ्या ‘ तास ’ शब्दाऐवजीं “ घटका ” शब्द योजून वाचावें)

२३	१७	आत्मीक	आत्मिक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२५	१३	विभ	विभा
२७	१७	शुभाश्रवास	शुभास्रवास
२८	२	फळफळते	फळ फळते
२९	५	शुभाशुभकर्मांचे	शुभाशुभकर्मांचे
३०	१३	एक करतो	अनेक करतात
,,	,,	अनेकांना	एकाला
,,	२३	हिंस्रक	हिंसक
३१	९	कोण्या एका जीवानें	कोणी एक जीव
,,	१३	हिंससेच	हिंसेचेच
,,	१७	पक्षाच्या	पक्ष्याच्या
,,	२०	कठींण	कठिण
३२	१७	पंचोदोम्बर	पंचोदुम्बर
३३	६	तयांतहि	तयांतही
३५	२१	अल्पएकेंद्रियघाताहून-व्यतिरिक्त,	अल्पएकेंद्रियघातेंकरून
३८	९	बडबडींतें	बडबडितें
३९	१	प्रमतयोगचि	प्रमत्तयोगचि
४१	६	मद्नाद्रेक	मदनोद्रेकें
,,	२२	शिथिलातादिक	शिथिलतादिक
४४	५	हा	ही
४६	१०	करण	कारण
४८	११	रत्नत्रयरूपीं	रत्नत्रयरूपि
६३	५	वस्तुंमध्यें	वस्तुंमधें

परिशिष्ट १ लें.

६	२	प्राण	प्राणि
९	१	विनिहिते तिला	विनिहितास्तिला
,,	१५	आतिसंक्षेपद्	आतिसंक्षेपाद्
,,	२४	मुर्च्छैव	मूर्च्छैव
१०	६	सम्मुखायातः	सम्मुखायातान्

याशिवाय अज्ञतेमुळें व नजरचुकीनें राहिलेल्या अनुस्वारादिकांच्या चुका वाचक सुधरून घेतील अशी आशा आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५६	१५	ही कापल्यानंतर	कापल्यानंतरही
”	”	सप्रतिष्ठ	सप्रतिष्ठित
५७	३	तद्दिन निशोपभोग्याने	तद्दिननिशोपभोग्यानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ नमः सिद्धेभ्यः ।

श्रीमदमृतचन्द्रसूरिविरचित

पुरुषार्थ–सिद्ध्युपाय.

(आर्यावृत्त)

त्रैकालिक पर्यायासह सकल पदार्थ–मालिका जींत ।
दर्पणवत्प्रतिबिंबित होति असो श्रेष्ठ विजयिं ती ज्योत ॥१॥
श्रेष्ठागमजीवन, नमि निषेधि जें गज–विधान–अंधाचें ।
सकल–नय–विलसिताच्या स्याद्वादा, करि मथन विरोधाचें ॥२॥
आगम मंथन करुनी यत्नें लोकत्रयैकनेत्र असा ।
पुरुषार्थसिद्ध्युपायहि, हा मी कथितो जगांत विद्वांसा ॥३॥
मुख्यामुख्यनयें करि जो मिथ्याभाव दूर शिष्यांचा ।
व्यवहारें–निश्चयज्ञहि जो, करि जगिं तो प्रसार तीर्थाचा ॥४॥

---

१ तिन्ही काळासंबंधींच्या. २ पदार्थांची पंक्ती. ३ आरशाप्रमाणें. ४ केवलज्ञानरूपी प्रकाश. ५ वस्तुस्वभावाच्या. ६ स्यात् = कथंचित् नय अपेक्षेनें + वाद = वस्तुस्वभावाचें कथन. ७ प्रयत्नांनीं. ८ त्रैलोक्याचा एकच नेत्र (नयन). ९ हा ग्रंथ. १० मुख्य आणि उपचारनयानें. ११ अज्ञानभाव. १२ व्यवहार व निश्चय. निश्चयनय–एकाद्या वस्तूच्या कोणत्याहि पर्यायाचा व गुणाचा निश्चय ज्यामुळें होतो त्यास नय म्हणतात. नैगम,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संग्रह, व्यवहार, ऋजुसूत्र, शब्द, समभिरूढ व एवंभूत असे सात नय आहेत. तेव्हां " स्वाश्रितो निश्चयः, " अर्थात् जें स्वाश्रित असतें तो निश्चयनय होय, आणि ह्याच कथनाला मुख्य कथन म्हणतात. ज्या द्रव्याच्या ठिकाणीं जो भाव दिसून येतो तोच भाव त्या ठिकाणीं स्थापन करून लेशमात्रही इतर कल्पना न करणें स्वाश्रित होय. निश्चयनयाच्या ज्ञानामुळें हा आपला आत्मा सर्व परद्रव्याहून भिन्न आहे, तो केवळ शुद्ध चैतन्यस्वरूपी आहे असा अनुभव होतो. त्यामुळें भेदविज्ञानाची प्राप्ती होऊन शरीरादिक अनादि परद्रव्याच्या एकत्व श्रद्धानरूपी अज्ञानभावाचा लोप होतो, आणि तेव्हांच तो जीव परमानन्ददर्शेत पोहत पोहत केवळ ज्ञानस्वरूपाला जाऊन पोहोंचतो. जे मूर्ख लोक ह्या नयाचें ज्ञान करून न घेतां धर्मांत लवलीन राहतात ते संसाराला कारणीभूत होणाऱ्या शुभोपयोगालाच साधन मानून स्व-स्वरूपापासून भ्रष्ट होतात, आणि त्यामुळें ह्या संसाररूपी चक्रांत निरंतर भ्रमण करितात. पण हें कळून घेण्यासाठीं मुख्यकथनाची माहिती करून घेणें हें अत्यंत आवश्यक होय. आणि हें सारें निश्चयनयाचेंच स्वाधीन असतें. निश्चयनयाच्या ज्ञानावांचून केलेला उपदेश निरर्थकच ठरतो. कारण निश्चयनयाला जाणल्याशिवाय गुरु शिष्य—जनाला कोणत्याहि प्रकारचा उपदेश करूं शकत नाहीं.

व्यवहारनयः—" पराश्रितो व्यवहारः " जो परद्रव्याचें आधीन असतो तो व्यवहार होय. थोडेसें देखील निमित्त पाहून एका द्रव्याचा भाव दुसऱ्या द्रव्यांत स्थापित करणें पराश्रित होय. आणि पराश्रितरूपकथनालाच उपचारकथन म्हणतात. उपचारनयाला जाणणारे शरीरादिकाच्या संबंधीं अशी संसारावस्था यथायोग्य जाणून, संसाराला कारणीभूत होणाऱ्या आस्रव-बंधाचा निर्णय करून त्यांतून मुक्त होण्यासाठीं निर्जरासंवरादितत्वाचें अवलम्बन करतात. परंतु जे अज्ञानी असतात, ज्यांना व्यवहारनयाचें देखील काडीइतकें ज्ञान नसतें ते त्या व्यवहारनयाची ओळख देखील करून न घेतां शुद्धोपयोगी होण्याचा प्रयत्न करतात. पण व्यवहारसाधनाला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्यवहार अभूतार्थचि या जगिं सत्यार्थ निश्चयां म्हणती ।
विमुख यथार्थज्ञानें बहुधा आहे समस्त ही जगती ॥ ५ ॥
देति असत्यार्थाचा अबुधा मुनिराज बोध होण्यास ।
उपदेश, जाणि परि जो फक्त व्यवहार त्या न उपदेश ॥ ६॥
सिंहाचें ज्ञान न ज्या, त्या भासे सिंहतुल्य मार्जारें ।
भासे अनिश्चयज्ञा, तेविं निश्चयासमान संसारें ॥ ७ ॥

सोडल्यामुळें पापाचरणांत मग्न होऊन नरकादिक दुःखमय गतींत जाऊन पडतात. म्हणूनच व्यवहारनय जाणणें आवश्यक होय. सारांश, दोन्ही नयांचे ज्ञाते तेच खरे उपदेशक व धर्मप्रवर्तक होत. १३ धर्माचा (धर्मतीर्थाचा).

१ अभूतार्थ—अभूत=जो पदार्थांत कधींहि दिसून येत नाहीं असा, अर्थ=भाव, नाना कल्पनेच्या जोरावर प्रतिपादन करणें अभूतार्थ होय. अभूतार्थालाच असत्यार्थ हें दुसरें नांव आहे. २ भूतार्थ या शब्दाचा अर्थ सत्यार्थ असा आहे. जो भाव ज्या पदार्थाच्या ठिकाणीं स्वभावतःच असतो त्याच्या विरुद्ध भाव कल्पनेच्या बळावर न प्रतिपादितां मूळचाच सांगणें सत्यार्थ होय. ३ संसार. आत्म्याचे परिणाम निश्चयनयाच्या कथनाविरुद्ध बनून शरीरादिक परद्रव्याशीं संमिश्रित होऊन जगांत वावरतात त्याला संसार म्हणतात. संसार अशी कोणतीहि भिन्न वस्तु नाहीं. तेव्हां संसारांतून मुक्त होऊं पाहणाऱ्यांनीं निश्चयनयाचीच कांस धरली पाहिजे. फक्त—निश्चयनयालच जाणून भागत नाहीं, तर त्याबरोबर व्यवहारनयाचें देखील ज्ञान करून घ्यावयास पाहिजे. आणि या दोन्ही नयांना समतोल रीतीनें पाळतो त्याचाच संसार मुक्तिस्वरूपीं होतो. ४ अज्ञानीजीवांना. ५ मांजर. ६ व्यवहारनय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्यवहार–निश्चयांना तत्वें जाणून होइ मध्यस्थ ।
करितो उपदेशाच्या संपूर्ण फलास शिष्य तो प्राप्त ॥ ८ ॥
स्थित गुण–पर्यायांनीं ध्रौव्योत्पादव्ययेंहि जो युक्त ।
हो पुरुष तो चिदात्मा जो रसगंधादिकें असे रहित ॥ ९ ॥

---

१ गुणपर्यायांनीं युक्त. पुरुष गुणपर्यायांनीं तदात्मक आहे. कारण द्रव्यच गुणपर्यायमय आहे. आत्मा हें एक द्रव्य असून गुणपर्यायांनीं सर्वदा विराजमान असतें. द्रव्याबरोबर ज्याची नेहमीं सत्ता असते त्यास सहभूत म्हणतात. सहभूत हें गुणाचें लक्षण असून जें द्रव्याच्या ठिकाणीं सदासर्वदा आढळून येतें त्यास गुण म्हणतात. आत्म्याचे साधारण आणि असाधारण असे दोन प्रकारचे गुण आहेत. ज्ञानदर्शनादिक हे असाधारण आणि अस्तित्व, वस्तुत्व, प्रमेयत्वादिक गुण साधारण होत. असाधारण गुण हे अन्य द्रव्यांत कधींच दिसून येत नाहींत. साधारण गुण नेहमीं दिसून येतात. पर्यायाचें लक्षण क्रमवर्ति आहे. द्रव्याच्या ठिकाणीं जो अनुक्रमें उत्पन्न होतो तो पर्याय. आत्म्याचे व्यञ्जन व अर्थपर्याय असे दोन भेद आहेत. ह्या सर्व गुणपर्यायांनींच आत्मा ओळखला जातो. २ नवीन अर्थपर्यायाच्या व व्यंजन-पर्यायाच्या उत्पत्तीला उत्पाद, पूर्वपर्यायाच्या नाशाला व्यय आणि गुणपर्यायाच्या अपेक्षेनें जी शाश्वत स्थिति तिला ध्रौव्य असें म्हणतात. आत्मा याच गुणांनीं सदोदित युक्त असतो. ३ पुरुषः—पुरि (पुरुषु) शेते इति पुरुषः पुरु=उत्तम चैतन्य गुणाचा जो—शेते=स्वामी बनून वावरतो तोच पुरुष अर्थात् दर्शन आणि ज्ञानस्वरूपी चेतनेचा स्वामी तोच पुरुष होय. आत्म्याचें हें अव्याप्ति, अतिव्याप्ति, असंभव या तीन दोषांनीं रहित असाधारण लक्षण आहे. पदार्थाच्या लक्षणाचा कित्येक ठिकाणीं अभाव, तर कित्येक ठिकाणीं सद्भाव असणें हा सारा अव्याप्तिदोषाचाच प्रकार आहे. चैतन्यगुणात्मक आत्म्याचें या दोषांविरहितच लक्षण असतें. असा कोणताही आत्मा नाहीं कीं ज्यांत चेतना नसते. परंतु रागादिक हे प्रत्येक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्म्याचे गुण असतात हें म्हणणें अव्याप्तिदोषयुक्त होय. कारण रागादिक गुण प्रत्येक संसारी जीवाच्याच ठिकाणीं आढळून येतात. पण ते मुक्त, सिद्ध जीवाच्या ठिकाणीं नसतात. जे लक्षण लक्ष्यांत अलक्ष्यांतही सारखें दिसतें त्याला अतिव्याप्तियुक्त म्हणतात. परंतु आत्म्याचें 'चेतना लक्षण' इतर कोणत्याहि पदार्थांत संघटित होत नाहीं, आणि म्हणूनच तो अतिव्याप्तीच्या दोषापासून मुक्त असतो. आत्म्याला अमूर्तिक जर ठरविलें तर मात्र हा दोष त्याला लागू होतो. कारण हा आत्म्याचा अमूर्तिक गुण धर्म, अधर्म, आकाश, काल ह्या द्रव्यांतहि दिसून येतो. जें लक्षण प्रत्यक्ष त्याचप्रमाणें परोक्ष प्रमाणांनीं बाधित वस्तूच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं तें असंभवी होय. आत्मा हा चैतन्यलक्षणी आहे. हें प्रत्यक्ष व परोक्ष प्रमाणांनींच सिद्ध झालें आहे, आणि म्हणूनच तो या दोषानें विरहित आहे. आत्म्याचा हा 'चेतना' गुण दोन प्रकारचा आहे. ज्ञानचेतना व दर्शनचेतना. जी चेतना पदार्थाला विशेष स्वरूपानें साकाररूप जाणते ती ज्ञानचेतना, आणि सामान्य स्वरूपानें निराकाररूप जाणते तीं दर्शनचेतना होय. पुन्हां या चेतनेचें परिणमनाच्या अपेक्षेनें ज्ञानचेतना, कर्मचेतना व कर्मफलचेतना, असे तीन प्रकार होतात. शुद्ध ज्ञान स्वभावरूप परिणमन करतें ती ज्ञानचेतना, रागादि कार्यरूप परिणमन करतें ती कर्मचेतना आणि सुखदुःखादिक भोगरूप परिणमन करतें ती कर्मफल चेतना होय. ह्या प्रकारें चेतनेचे अनेक प्रकार होतील. पण त्याचा सर्वस्वी अभाव कधींही दिसून यावयाचा नाहीं. जसा रागादिक परिणामाचा दिसून येतो; आणि या अशा चेतनलक्षणांनीं विभूषित झालेला जीव नांवाचा पदार्थच पुरुष होय.

४ आठ प्रकारचे स्पर्शः—(शीत, उष्ण, स्निग्ध, रुक्ष, मृदु, कठोर, हलका, भारी) दोन गंध (सुगंध—दुर्गंध); पांच प्रकारचे रस (खारट, आंबट, तिखट, गोड, कडू); पांच प्रकारचे वर्ण—(अरुण, पीत, श्वेत, नील, कृष्ण) इत्यादि पौद्गलिक लक्षणांनीं विरहित अमूर्तिक पुरुष असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनादिकालापासुन बोधविवर्तेंच नित्य परिणमतो ।
तो निज परिणामाचा कर्ता भोक्ता म्हणूनही ठरतो ॥ १० ॥
जेव्हां ध्रुव–मोक्षसुखां पावे सगळी उपाधि जिंकून ।
हों, तो कृतकृत्य तदा सम्यक्पुरुषार्थ–सिद्धिसंपन्न ॥ ११ ॥

अनादिकालापासून आत्म्याच्या ह्या द्रव्याशीं अहंकार, प्रेम, इत्यादि रागादिक गुणांना बळीं पडल्यामुळें संबंध आलेला आहे. पण वास्तविक तों त्यापासून अगदीं अलिप्त आहे. म्हणूनच वरील गुणांनीं त्याची व पुद्गलांचीं भिन्नता दाखविली आहे. आणि अशा प्रकारें जो गुणपर्यायांनीं उत्पादव्यय ध्रौव्यांनीं युक्त, रसगंधादिकांनीं रहित असतो तोच पुरुष 'चिदात्मा' बनूं शकतो. तो पुरुष 'चिदात्मा' होय.

१ ज्ञानावरणयुक्त रागादि परिणामांनीं. २ चैतन्यसुखाला. ३ उत्तम प्रकारच्या पुरुषार्थ सिद्धीनें संपन्न असलेला. पुरुषार्थसिद्धिः–पुरुषाच्या अर्थांची अर्थात् निजकार्यांची सिद्धता ती पुरुषार्थसिद्धि होय. जेव्हां आत्मा आपल्या निजस्वरूपाला जगांतल्या वस्तूहून, रागादिक परिणामांहून अगदीं भिन्न आहे, असें जाणूं लागतो, आणि आपस्या शुद्धात्मस्वरूपांत तल्लीन बनून त्याचे ध्याता आणि ध्येयाचे विकल्प नष्ट होतात तेंव्हांच तो कृतकृत्य होतो. कारण आत्म्याचें मूळ स्वरूपाला जाणण्याचें कर्तव्य त्याचेकडून पार पडलेलें असतें, शिल्लक असें कांहीं उरलेलें नसतें. आणि अशा अवस्थेलाच पुरुषार्थसिद्धि म्हणतात. उत्तम प्रकारच्या पुरुषार्थांची सिद्धि ज्यानें प्राप्त करून घेतली तोच पुरुष या नांवास शोभतो. लहान मुलाची धांव जशी त्याची मूळ जी आई तिच्याकडेच असते तद्वत् प्रत्येक वस्तूची धाव आपल्या मूळ वस्तूकडेच असते व असावयास पाहिजे. आपले मूळ गुण जे अनादि कालपासून रागादिक परिणामांत गुरफटून गेल्यामुळें लुप्त झाल्यासारखें दिसतात, त्यांना प्रकट करणें आपलें कर्तव्य होय. आणि हें कार्य परिपूर्ण ज्यानें केलें तो 'सिद्ध' होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीवाच्या परिणामा, निमित्तमात्रच पुन्हां इथें करुन ।
कर्मत्वानें दुसरें पुद्गल करिती स्वतःच परिणमन ॥ १२ ॥
स्वचिदात्मकेंभावांनीं परिणमन तसें स्वयेंचि करितात ।
तीं पुद्गलमय कर्में त्या जीवाचें निमित्त बनतात ॥ १३ ॥
कर्मोद्भव भावांनीं नसुनी संयुक्त युक्त तो भासे ।
बालिशें जनांस कारण संसारा हाच भास नित्य असे ॥ १४ ॥
निर्तें निजरूपा जाणुनि श्रद्धा विपरीत नष्ट ती करुन ।
च्युंत त्यांतुन नच होणें, त्यासाचि पुरुषार्थ-सिद्ध्युपाय गण ॥१५
दुरिताचांरे विन्मुख, नित्यहि एकान्त-विरेति रूपांची ।
हें पदं अनुसरणाऱ्या वृत्ति अलौकिकें असेच हो मुनिची ॥१६॥
बहुधां दाखविलेल्या ग्रहण करि न जो समस्तविरेतीतें ।
ह्यां रीतीनें कथणें, योग्याचि त्यां एकदेंश-विरतीतें ॥ १७ ॥
यतिधर्मा नच कथितां अल्पमेंती जो गृहस्थधर्मास ।
उपदेशी सिद्धान्तीं म्हटलें तो होइ पात्र दण्डास ॥ १८ ॥

---

१ कारणमात्रच. २ आपल्या चैतन्यस्वरूपीं रागादि परिणामांनीं. ३ मूर्ख, अज्ञानी लोकांस. ४ योग्य प्रकारें. ५ कर्मजनित पर्यायांना आत्मा मानणें याला मिथ्या-विपरीत श्रद्धान म्हणतात. ६ परावृत्त. ७ पापक्रियेनें युक्त अशा आचारापासून. ८ पराङ्मुख. ९ परद्रव्यांपासून सर्वदा उदासीन अशा स्वरूपाची. १० रत्नत्रयरूपी पद. सम्यक्दर्शन, सम्यक्ज्ञान व सम्यक्चारित्र हें रत्नत्रय, आणि यांनीं विभूषित झालेलें पद. ११ अंतरंग परिणाम; वर्तन. १२ विलक्षण प्रकारची. १३ वारंवार, पुष्कळदां. १४ सकलपापरहित मुनिवृत्तीला. १५ पुढीलप्रमाणें. १६ एकदेशपापरहित गृहस्थाचारातें अर्थात् श्रावकधर्माला. १७ तुच्छबुद्धि उपदेशक.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उत्साहि शिष्य बहु जरि असला क्रमबद्ध तें न कथिल्यानें ।
अपेदीं तुष्ट बनोनी ठगला जातोच त्याच दुर्मतिनें ॥ १९ ॥

श्रावकधर्म

चारित्रबोध दर्शन या त्रयिनें मुक्तिमार्ग जो युक्त ।
शक्त्यनुसारें मनुजा यापरि वरणोंहि नित्य त्यां युक्त ॥ २० ॥
त्या त्रयिंतुन सम्यक्त्वा प्रथमचि वरणें महा प्रयत्नानें ।
कारण बोध-चरित्रां येतें सम्यक्त्व तेंच असल्यानें ॥ २१ ॥
ह्या जीवाजीवादिक तत्वांर्थाचें सदा यथार्थत्व ।

---

१ क्रमवार. २ तुच्छ स्थानांत—पदवींत. ३ त्या गृहस्थधर्माला देखील. ४ जीवाजीवादिक तत्वें सातच आहेत, अधिक नाहींत. जीव, अजीव, आस्रव, संवर, बंध, निर्जरा आणि मोक्ष हीं सात तत्वें होत. या सातही तत्वांत जगाच्या समस्त पदार्थांचा समावेश झालेला आहे. जीवाच्या विशिष्ट पर्यायाच्याच अपेक्षेनें हीं तत्वें सांगितलीं आहेत. मूलतः तत्वें दोनच आहेत. एक जीव व दुसरें अजीव. वास्तविक भेदाभेदासहित मूलतत्वाचा विचार केला जाईल तर सहाच भेदांमध्यें या समस्त तत्वांचा समावेश झालेला दिसून येईल. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल या नांवांनीं ते सहा भेद प्रसिद्ध आहेत. जीवाच्या सात तत्वांची माहिती पुढीलप्रमाणें आहे.

१ जवितत्वः—जें द्रव्य ज्ञाता आणि द्रष्टा असतें तो जीव होय. जीवाचा मुख्य गुण चेतना हा आहे. जीव अनंतज्ञान, अनंतसुख या शक्तीनीं व अन्य पूज्य गुणांनीं युक्त असतो. याचें देखील शुद्ध, अशुद्ध आणि मिश्र असे तीन भेद आहेत.

(१) शुद्ध जीव—ज्या जीवाचे संपूर्ण गुणपर्याय आपल्या मूळ स्वरू-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पांत परिणमतात अर्थात् केवळ ज्ञानादि गुण शुद्ध परणतिपर्यायांत विराजमान होतात त्यांना शुद्ध जीव म्हणतात.

(२) अशुद्ध जीव—ज्या जीवाच्या संपूर्ण गुण–पर्यायांना विकारावस्था प्राप्त होऊं लागलेली असते त्यांना अशुद्ध जीव म्हणतात. अर्थात् ज्याचें ज्ञानादिक गुण आवरणामुळें आच्छादित झालेले असूनही जे आणखी रागादिक रूप परिणमन करतात ते अशुद्ध जीव होत.

(३) मिश्र जीव—ज्या जीवाचे सम्यक्त्वादि गुण कांहीं अंशीं शुद्ध व कांहीं अंशीं अशुद्ध असतात, ज्ञानादि गुणाच्या कांहीं शक्ति शुद्ध आणि बाकीच्या सर्व अशुद्ध असतात आणि ज्याची परिणती शुद्धस्वरूपी असते त्यांना मिश्र जीव म्हणतात.

२ अजीवतत्व—चैतन्यरहित पदार्थाला अजीव म्हणतात. याचें पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काळ हे पांच भेद आहेत.

(१) पुद्गलः—जें द्रव्य स्पर्श, रस, गंध आणि वर्ण या चार गुणांनीं संयुक्त असतें त्यास पुद्गल म्हणतात. अणु आणि स्कन्ध असे त्याचे दोन भेद आहेत. एकट्याच अविभागी परमाणूला अणु आणि अनेक अणूंच्या समूहाला स्कन्ध म्हणतात. पुद्गल द्रव्याचे अणु आणि स्कन्ध याखेरीज १ स्थूलस्थूल, २ स्थूल, ३ स्थूलसूक्ष्म, ४ सूक्ष्मस्थूल, ५ सूक्ष्म आणि ६ सूक्ष्मसूक्ष्म, असे सहा भेद आहेत. १ स्थूलस्थूल—काष्ठपाषाणादिक पदार्थांसारखे जे छिन्नभिन्न केल्यावरहि पुन्हां एक होतात ते. २ स्थूल पाणी, दुग्ध वगैरे द्रव पदार्थासारखें छिन्नभिन्न केल्यावर ही एकत्रित होऊं शकतात तें. ३ सूक्ष्मस्थूल–सूर्य, चंद्र, तारे, अंधःकार वगैरे सारखे दिसतात, पण हातांत धरतां येत नाहींत, पकडले जात नाहींत ते. ४ सूक्ष्मस्थूल–शुद्ध गंधादिक परमाणूंसारखे दिसण्यांत दिसतात परंतु श्रवणनासिकादि अन्य इंद्रियांच्या द्वारें ग्रहण केले जातात ते. ५ सूक्ष्म–कार्म्माण वर्गणादिक पुष्कळ परमाणूंचे स्कंध ते आणि ६ सूक्ष्मसूक्ष्म– अविभागी परमाणु सूक्ष्मसूक्ष्म होत.

(२) धर्म–गमन करण्याची अर्थात् हलचाल करण्याची शक्ति ही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फक्त जीव आणि पुद्गल या दोघांच्या ठिकाणींच असते. दुसरा कोणताहि पदार्थ हालचाल करूं शकत नाहीं. जशी मत्स्याला पाण्याची, पतंग उडविण्यासाठीं वाऱ्याची, किंवा घरावर चढण्यासाठीं शिडीची; तशी प्रत्येक वस्तूला आपली स्वतःची हालचाल सुरूं करण्यासाठीं एका द्रव्याची आवश्यकता असते. आणि त्या द्रव्यालाच धर्मद्रव्य म्हणतात. तें द्रव्य अमूर्तिक असून तीन्ही लोकांना व्यापून टाकणारें आहे. मात्र बाहेर असत नाहीं. स्वतः हालत फिरत नाहीं. पण त्याच्या साहाय्यानें जीव आणि पुद्गलाला मात्र हलनचलनक्रिया सुरूं करतां येते.

(३) अर्धमद्रव्य—हें धर्मद्रव्याप्रमाणेंच अमूर्तिक असून तीन्ही लोकांत व्यापून राहिलेलें आहे. त्याच्या बाहेर त्याचें वास्तव्य नाहीं. ज्याप्रमाणें धर्मद्रव्य हें स्वतः गमन करण्याला प्रेरणा न करतां हालचाल करणाऱ्या वस्तूला चलनवलन करण्यासाठींच फक्त सहाय्य देतें, त्याचप्रमाणें अधर्मद्रव्यही वस्तूला थांबविण्याची प्रेरणा करीत नाहीं. पण स्वतःच चलनवलनाची क्रिया थांबविणाऱ्या वस्तूला ती थांबण्याच्या कार्यांत मदत करते. तेव्हां जें जीवद्रव्य पुद्गलाच्या थांबत्या अवस्थेला सहाय्यकारी होतें तें अधर्मद्रव्य होय. अधर्म, धर्म या द्रव्याशिवाय बाकीचीं चार द्रव्यें अन्य मतमतांतरांनीं मानलेलीं आहेत. फक्त धर्म आणि अधर्म हीं दोन द्रव्यें जैन धर्मानेंच मानलेलीं आहेत. वस्तूंच्या गती–स्थितीच्या अवस्थेला एकादी तरी सहाय्य देणारी वस्तू अवश्य असली पाहिजे अशी महान् इंग्लिश तत्ववेत्यांना अलीकडे शंका येऊं लागली आहे व तदनुसार त्यांनीं संशोधनाची क्रियाहि चालविली आहे; पण अमूर्तिक वस्तूचा शोध कसा लागावा ! शोधासाठीं सर्वज्ञ वीतरागच बनावें लागेल ! जें या काळांत अत्यंत दुःसाध्य आहे.

(४) आकाश——जीवादिक समस्त पदार्थांना अवकाश देण्यांत जें समर्थ असतें तें आकाश होय. त्या आकाशाचे लोकाकाश व अलोकाकाश असे दोन भेद आहेत. आकाश हें अनंत असून अमूर्तिक आहे. तें सर्व-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्यापी असल्यामुळें प्रत्येक वस्तूचा त्याच्या आंत समावेश होतो; आणि म्हणूनच सर्वव्यापी तें आकाश असें म्हणतात. जेवढ्या म्हणून स्थानांत हीं पांच द्रव्यें पाहाण्यांत येतात तेवढ्याच स्थानाला लोक म्हणतात. लोकांचे उर्ध्व, मध्य, पाताळ हे तीन भेद आहेत. लोक अर्थात् तीन लोकांच्या आंतील आकाशास लोकाकाश आणि त्याच्या बाहेरील अनंत आकाशास अलोकाकाश म्हणतात.

(५) काल—जें द्रव्य संपूर्ण द्रव्याचें परिवर्तन घडवून आणण्यांत समर्थ आणि जें वर्तमान हेतुत्वलक्षणानें युक्त असतें त्याला कालद्रव्य म्हणतात. व्यवहारकाल आणि निश्चयकाल हे कालचे दोन भेद आहेत. समय, तास, प्रहर, दिवस, महिना, वर्ष इत्यादिकांना काल म्हणतात. ही कालची ओळख संसाराच्या परिवर्तनक्रमावरूनच ठरविली गेलेली आहे. जितक्या वेळांत एक परमाणु (पुद्गलाचा सर्वांत लहान तुकडा) मंद गतीनें आकाशांतल्या एका प्रदेशांतून दुसऱ्या प्रदेशाकडे जातो त्या अवधीला समय म्हणतात. ह्याचप्रमाणें दिवसमहिन्याची परिपाठी ठरविलेली आहे. निश्चयानें कालद्रव्य पदार्थाच्या परिणमन अवस्थेंत कुंभाराच्या चाकांतील अणीप्रमाणें उदासीनतेनें साहाय्य देण्यास कारणीभूत होतें. पदार्थपरिणतींत त्या सहकारितेला परिपाठी म्हणतात. परिपाठी (वर्तना) हेंच ज्याचें लक्षण तोच कालनुरूप निश्चयकाल होय. याशिवाय अधिक माहिती द्रव्यसंग्रहादि तात्विक ग्रंथांतून अवश्य पाहावी.

३. आस्रवतत्व—जीवाच्या ठायीं कर्ममलाचें आगमन झालें कीं आस्रव घडतो. शरीरधारी जीवाच्या समस्त मानसिक, शारीरिक व वाचिक क्रियेबरोबर जीवपुद्गलाचें जें आगमन तें आस्रव होय. आस्रवाचे भावास्रव व द्रव्यास्रव हे दोन भेद आहेत. आत्म्याच्या प्रदेशांत जी चलनवलनाची क्रिया घडते त्यास भावास्रव आणि द्रव्यकर्माच्या म्हणजे पुद्गलपरमाणूच्या कर्मरूप परिणमनाला द्रव्यास्रव म्हणतात. भावास्रवाचे भेद त्याच्या भेदाच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भेदांसह छत्तीस आहेत. फक्त भावास्रवाचे मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, योग, क्रोध, व कषाय हे पांच आणि द्रव्याश्रवाचे अनंत भेद आहेत.

४. बंधतत्त्व—कषाययुक्त जीव कर्मयुक्त पुद्गलांना ग्रहण करतो त्यावेळेस जीवाचा व त्या पुद्गलाचा जो एक क्षेत्रावगाह बंध होतो त्यास बंध म्हणतात. आत्म्याच्या ज्या विकारामुळें जीवात्म्याला कर्मबंध होतो त्या विकाराला भाव-बंध आणि त्या विकारभावाचें कारण जें कर्मरूप पुद्गलपरमाणू यांचें आत्म्याच्या प्रदेशांत एकीकरण होणें यास द्रव्यबंध म्हणतात. बंध चार प्रकारचा आहे. प्रकृति, स्थिति, अनुभाग आणि प्रदेश. योगामुळें प्रकृति आणि प्रदेश बंध होतो व कषायामुळें स्थिति आणि अनुभाग बंध होतो. मिथ्यात्व, अवि-रति (व्रतनियम न पाळणें), कषाय (क्रोध, मान, माया, लोभ) आणि योग (मन, वचन, काय यांची प्रवृत्ति) हीं बंधांचीं कारणें होत.

५ संवरतत्व—कर्मांना उत्पन्न न होऊं देणें अर्थात् त्यांना रोकणें संवर होय. ज्या परिणामामुळें कर्माची पैदास होत नाहीं त्यास भावसंवर आणि ती कर्मांची पैदास थंडावल्यामुळें पुद्गल परमाणूंचा कर्मस्वरूपांत पालट न होणें याला द्रव्यसंवर म्हणतात.

६ निर्जरातत्व— जीवाच्या शुद्धोपथोगाच्या सामर्थ्यामुळें पूर्वसंचित कर्म-परमाणूंचा एकदेश नाश होणें याला निर्जरा म्हणतात. तपामुळें संवर आणि निर्जराहि घडते. निर्जरेचे सविपाक व अविपाक असे दोन भेद आहेत. एकादें कर्म फळ देऊन तात्काळ दूर होतें. या प्रकारें फळ देऊन आपल्या वेळेवर कर्में नष्ट होणें सविपाक निर्जरा; आणि तप करून एखाद्या कर्माला असमर्थीच नष्ट करणें अविपाक निर्जरा होय.

७ मोक्षतत्व—कर्में सर्वस्वी आणि सर्व प्रकारचीं नष्ट झाल्यानंतर जीवा-त्म्याचा जो शुद्ध स्वभाव उरतो तो मोक्ष होय. कर्मरहित झालेला—निजशुद्ध परमानन्दस्वरूपाला जाऊन मिळालेला जीव पुन्हां कधींही कर्मबंधनांत पडत नाहीं. कारण योग, कषाय वगैरे कोणत्याही प्रकारच्या कर्मांचा आस्रव होत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं. आत्मा त्रिकालाबाधित व शाश्वत आहे. अनादिकालापासून चालत आलेल्या कर्माच्या संबंधामुळें तो अनेक गतींतून व अवस्थेंतून फिरतो व जेव्हां तो कर्मबंधापासून मुक्त होतो तेव्हां त्या मुक्तावस्थेला मोक्ष म्हणतात. तोच जवाचा मूळ स्वभाव आहे. जीव मूळ स्वभावाप्रत गेल्यानंतर कधींही कर्मबंधनांत पडत नाहीं. या सप्ततत्त्वांचें योग्य प्रकारें अर्थासहित श्रद्धान करणें उत्तम सम्यक्‌दर्शन होय.

५ तत्त्वार्थश्रद्धान---तत्त्वार्थश्रद्धान हें एक सम्यक्त्वाचें लक्षण आहे. जवाजीवादिक तत्त्वांचें श्रद्धान ही एक ज्ञानाची पर्याय आहे. श्रद्धान या शब्दाचा सामान्य अर्थ जरी विश्वास आहे तरी त्याच्यांत आणि ज्ञानांत स्थूल भेद आहे. तत्त्व शब्दाचा अर्थ पदार्थांचा भावधर्म आणि अर्थ शब्दाचा अर्थ निश्चय असा आहे. अर्थात् जें भावरूपानें निश्चित केलें त्यास तत्त्वार्थ म्हणतात. जो ज्या वस्तूचा धर्म–भाव असतो त्याच धर्मासह त्या वस्तुस्वरूपाचा निश्चय करणें तत्वार्थ होय. ' त्याच्या धर्मासह ' म्हणण्याचें कारण जें वस्तूचें वास्तविक स्वरूप नसतें त्याचेंही श्रद्धान करतां येतें. पण ह्या श्रद्धानांत आणि वस्तुस्वरूपाच्या–मूळ धर्माच्या–श्रद्धानांत अतिशय फरक आहे. आणि अशा श्रद्धानाला विपरीत श्रद्धान असें म्हणतात. तेव्हां आपल्या स्वभावाला धरून वस्तूचें श्रद्धान तें यथार्थ श्रद्धान होय. आणि हेंच वस्तूचें यथार्थ श्रद्धान तत्त्वार्थश्रद्धान होय. श्रद्धानाचे सामान्य आणि विशेष असे भेद आहेत. परभावांहून भिन्न असे आपल्या चैतन्यस्वरूपाला निजस्वरूपी जाणणें सामान्यतत्त्वार्थश्रद्धान होय. हे नारकतिर्यंचादिक सर्व सम्यक्‌दृष्टी जीवांचे ठिकाणीं आढळून येतें. जीवाजीवादिक सात तत्त्वांना विशेष प्रकारानें जाणून श्रद्धान करणें विशेष तत्त्वार्थश्रद्धान होय. हें मनुष्य देवादिक बहुश्रुत (विशेष ज्ञानयुक्त) जीवांच्याच ठिकाणीं आढळून येतें. परंतु सप्ततत्त्वांची जाणीव–माहिती नसणाऱ्याला हें दोन्ही श्रद्धान असूं शकत नाहीं. उघडच आहे कीं, तत्त्वांना जाणल्यावांचून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मिथ्याज्ञानाविरहित करणें श्रद्धान तेंच आत्मतंत्र ॥ २२ ॥

सम्यक्त्वाचीं आठ अंगें

कथिल्या बहु स्वभावेंस्वरूपयुत सकल वस्तु सर्वज्ञे ।
सत्य किं असत्य ऐशी त्या कधिं शंका करूं नये सुज्ञें ॥ २३ ॥
ह्या लोकीं विभवातें परलोकीं चक्रि-भद्र पदवीतें ।
एकांतवादंदूषित इच्छुं नये, तेविं, अन्य धर्मातें ॥ २४ ॥
थंडी वारा गरमी क्षुधा तृषादिक अनेक भावांची ।
विचिकित्सा न करावी ती विष्टादिक कधींहि वस्तूंची ॥ २५ ॥
शास्त्राच्या समयाच्यां देवाच्या लोकिंही अभासांत ।
तत्वप्रेमीं मनुजें ठेवावि अमूढदृष्टि ती सतत ॥ २६ ॥

श्रद्धान कोठून आणि कसें होणार ? मग तीं तत्वें कशीहीं असोत पण त्यांना जाणणें, त्यांवर दृढ श्रद्धान ठेवणें तत्वार्थश्रद्धान होय. ६ यथार्थ रीतीनें, योग्य प्रकारें.

१ मूळ आत्म्याचें स्वरूप=निजस्वरूप. २ अनेकान्तात्मक. ३ सम्यक्धारी जीव लोक आणि परलोक यासंबंधींच्या सर्व पुण्यदायक फलांची आकांक्षा करीत नाहींत; कारण त्या पुण्यामुळें प्राप्त होणाऱ्या इंद्रियजन्य विषयांना–तद्विषयक तीव्र लालसेमुळें दुःखरूपच जाणतो आणि यालाच निःकांक्षित अंग म्हणतात. ४ एकांतवादामुळें दूषित झालेल्या अन्य धर्माला. ५ ग्लानि. ६ धर्माच्या. ७ वास्तविक सत्य आणि योग्य नसलेल्या धर्माला अविवेकामुळें तो खरा आहे असा दाखविण्याचा प्रयत्न करणें (जें खरोखरी योग्य नसेल त्यास भ्रामकपणामुळें खरें म्हणणें) हा शास्त्राभास होय. आभास याचा अर्थ मूळांत पदार्थांचें खरें स्वरूप जें नसतें तें भ्रामकपणामुळें दाखविण्याचा प्रयत्न करणें हा होय. ८ दुःखदायक, कुत्सित कार्यांत आणि कुमार्गांत खिंचपत पडलेल्या लोकांचीं मन, वचन कायेकरून अनुक्रमें प्रमाणतः प्रशंसा आणि स्तुति करणें या क्रियेला अमूढदृष्टि म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मार्दवादि[1] भावांनीं वाढविणें नित्य आत्म[2]–धर्मास ।
दाखविणें परदोषा ना उपगूहन[3]-गुणार्थं लोकांस ॥ २७ ॥
असतां काममदादिक सन्मार्गातुन[4] करावया हरण ।
सिध्द स्वपराचें वा करणें श्रुतियुक्तिनें[5] स्थितीकरण[6] ॥ २८ ॥
अनवरत[7] अहिंसेचें मुक्तिश्रीप्राप्तिच्याच धर्माचें ।
निज-धर्म-बांधवाचें सुपरम वात्सल्य ठेवणें साचें ॥ २९ ॥
रत्नत्रयतेजानें नित्यात्मिक ती प्रभावना[8] करणें ।

---

१ मार्दव, क्षमा, संतोष, वगैरे भावनांच्या द्वारें. २ शुद्ध स्वभावाला. ३ उपगूहन आणि उपबृंहण हे दोन्हीं शब्द एकाच अर्थांचे आहेत. उपबृंहण शब्दाचा अर्थ वाढविणें असाहि होतो आणि छपविणें असाहि होतो. जिथें वाढविणें ह्याचें प्रयोजन पडतें तेथें आत्मीय भावांशीं संबंध येतो आणि जेथें छपविण्याचें प्रयोजन पडतें तेथें दुसऱ्या दोषांशीं संबंध येतो; अर्थात् उत्तम क्षमा, मार्दव, आर्जव, सत्य इत्यादि गुणांच्या द्वारें आपल्या आत्मीय भावांना वृद्धिंगत करणें आणि दुसऱ्या दोषांना लपविणें; दोषाला छपविण्यांत कोणता धर्म भरला आहे ? अशी शंका उपस्थित होईल. पण त्याचा अर्थ तसा नाहीं. तर "तो या दोषापासून मुक्त होईल तर त्याचें कल्याण होईल" ही भावना उराशीं बाळगून दोषाचें दिग्दर्शन करतील तर तें अनुचित आणि अनुपगूहनात्मक ठरणार नाहीं. पण जेथें "याचे दोष दाखविले असतां तो जगाच्या अपकीर्तीस पात्र होईल, त्याची लोक निंदा करतील" असा भाव मनांत धारण करून दुसऱ्याच्या दोषांना प्रकाशांत न आणण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हां तें करणें उपगूहनात्मक ठरतें. एरव्हीं ठरत नाहीं. ४ न्याय मार्गातून. ५ शास्त्रानुसार युक्तिप्रयुक्तींनें. ६ धर्माचे ठिकाणीं स्थिरीभूत करणें. ७ निरंतर. ८ अज्ञानतिमिरव्याप्तिमपाकृत्य यथायथं । जिनशासनमहात्म्यप्रकाशः स्यात् प्रभावना. ॥ अज्ञानांधःकाराच्या व्याप्तीला हरतऱ्हेनें दूर सारून जिनशासनाच्या माहात्म्याचा प्रकाश पाडणें प्रभावना होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाढविणें जिनशासन, तप, पूजन, दान तेविं विद्येनें ॥ ३० ॥

सम्यग्ज्ञान.

सम्यक्त्वधारि, यापरि सम्यग्ज्ञानास चिंतुनी यत्नें ।
आत्महितैषी मनुजें योग्यचि आम्नाययुक्तिनें वरणें ॥ ३१ ॥

---

१ आम्नाययुक्तिनें—जिनागमाच्या परंपरेनें व युक्तीनें; अर्थात् प्रमाण-नयाच्या—अनुयोगाच्या द्वारें.

प्रमाणनयः—

प्रमाण—' तत्प्रमाणे ' या तत्वार्थसूत्राच्या वचनावरून सम्यग्ज्ञान हेंच प्रमाण हें स्पष्टतः सिद्ध होतें. प्रमाणाचे प्रत्यक्ष व परोक्ष हे दोन मुख्य भेद आहेत. प्रत्यक्षाचे देखील पारमार्थिक प्रत्यक्ष व सांव्यवहारिक प्रत्यक्ष असे दोन भेद आहेत. जें ज्ञान केवळ आत्म्याच्याच स्वाधीन राहून स्वतःचा जेवढा म्हणून विषय आहे तो विशुद्ध रीतीनें जाणतें तें पारमार्थिक प्रत्यक्ष आणि जें नेत्रादिक इंद्रियाच्या द्वारें वर्णादिकांना साक्षात् ग्रहणसमयीं जाणतें तें सांव्यवहारिक प्रत्यक्ष होय. पारमार्थिक प्रत्यक्षाचे एकदेश पारमार्थिक आणि सर्वदेश पारमार्थिक असे दोन भेद आहेत. अवधिज्ञान व मनःपर्य्यय ज्ञान हें देशप्रत्यक्ष आणि केवलज्ञान हें सर्वप्रत्यक्ष ज्ञान होय. सांव्यवहारिक फक्त व्यवहार दृष्टीनें प्रत्यक्ष म्हणविला जातो. परंतु परमार्थदृष्टीनें तो परोक्षच आहे. कारण ह्या ज्ञानाच्या साहाय्यानें सर्वथा स्पष्ट जाणतां येत नाहीं. उदाहरणार्थ—एकादी वस्तू डोळ्यांनीं पाहिल्याबरोबर जरी तिच्यांत मलिनतेचा अंश असतो तरी तो किती अंशीं असतो ह्याचें स्पष्ट ज्ञान न होतां तो फक्त श्वेतवर्णी आहे एवढेंच ज्ञान होतें. म्हणूनच हें ज्ञान व्यवहारानें प्रत्यक्ष व परमार्थानें परोक्ष होय.

परोक्षप्रमाण—जें इंद्रियजन्य ज्ञान आपल्या स्वतःच्या विषयालाच स्पष्टतः जाणीत नाहीं तें परोक्ष प्रमाण होय. मतिश्रुतिज्ञानानें जाणलें जाणारें तें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सर्व परोक्ष प्रमाणच होत. ह्याचें स्मृति, प्रत्यभिज्ञान, तर्क, अनुमान आणि आगम हे मुख्य पांच भेद आहेत.

१ स्मृति—पूर्वी जाणलेल्या पदार्थांच्या आठवणमात्राला स्मृति म्हणतात.

२ प्रत्यभिज्ञान—" तत्तोल्लेखि ज्ञानं स्मृतिः, इंद्रियग्राहिवर्तमानकालावच्छिन्नपदार्थज्ञानमनुभवः, एतत् उभयसंकलनात्मकं ज्ञानं प्रत्यभिज्ञानामिति " पूर्वीच्या गोष्टीचें स्मरण करून प्रत्यक्ष पदार्थांचा निश्चय करणें प्रत्यभिज्ञान होय. जसें—एकाद्या पुरुषानें ' गाय ' ही जंगलांत राहणाऱ्या " गवय पशुसारखी" असते हें ऐकणें—पण तो प्रत्यक्ष अरण्यांत गेला असतां तेथील ' गवयाकडे ' पाहून गाईसारखा पशु तोच हा गवय होय ही आठवण होणें; यांतील ' तोच ' ही ' स्मृति ' आणि ' हा ' हा अनुभव होय. आणि स्मृति अनुभवमिश्रित " तोच हा आहे " हें प्रत्यभिज्ञान होय.

३ तर्क—" व्याप्यव्यापकसम्बन्धोहि व्याप्तिस्तद्ज्ञानं तर्क इति. " व्याप्तिज्ञान तें तर्क होय. एकावांचून एक न होणें व्याप्ति होय. उदाहरणार्थ—विस्तवाशिवाय धूर, आत्म्याशिवाय चेतना असत नाहीं हें व्याप्तीचें ज्ञान तर्क होय.

४ अनुमान—संकेतावरून (चिन्हांवरून) पदार्थांचा निश्चय करणें अनुमान होय. उदाहरणार्थ—पर्वतांतून निघणाऱ्या ज्वाळेकडे पाहून अग्नि आहे असा निश्चय करणें अनुमान होय.

५ आगम—आप्तवचनाच्या निमित्तानें (सहाय्यानें) पदार्थांचा निश्चय करणें आगम होय. जसें—शास्त्राच्या सहाय्यानें लोकादिकाचें स्वरूप जाणणें.

" नय "

प्रमाणाच्या द्वारें ग्रहण केलेल्या पदार्थाच्या एका विशिष्ट धर्मांचा मुख्यतः जो अनुभव करून देतो तो नय होय. याचे द्रव्यार्थिक आणि पर्यायार्थिक नय असे दोन भेद आहेत.

द्रव्यार्थिक नय—मुख्यतः द्रव्याच्या मदतीनें पदार्थाचा जो अनुभव करून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देतो तो द्रव्यार्थिक नय होय. नैगम, संग्रह आणि व्यवहार हे याचे तीन भेद होत.

१ नैगम--संकल्पमात्रानें पदार्थाचें ग्रहण करणें हा नैगम होय. उ०- खुर्चीसाठीं लांकूड आणावयास निघालेल्या इसमास एकानें विचारलें- " हे भल्या माणसा! कोठें जात आहेस? " तो उत्तरला-" खुर्चीसाठीं जात आहे. " जरी त्याला रानांत खुर्ची तयार मिळणारी नसली तरी तो तेथून लांकूड आणवून बनवील हा त्याच्या म्हणण्याचा गर्भितार्थ लक्ष्यांत घेणें नैगम नय होय.

२ संग्रह—सामान्य रीतीनें पदार्थांचें ग्रहण करणें संग्रह होय. जसें-षट् द्रव्यसमूहाला द्रव्य म्हणणें.

३ व्यवहार--सामान्यस्वरूपानें प्रतिपादिलेल्या विषयाची फोड करून कथन करणें व्यवहार होय. उदाहरण-द्रव्याचे ६ भेद करणें-सांगणें.

पर्यायार्थिक नय-द्रव्यस्वरूपाचें सहाय्य न घेतां पर्य्यायाच्या मुख्यतेनें पदार्थाचें ज्ञान करून घेतो तो पर्य्यायार्थिक होय. त्याचे ऋजुसूत्र, शब्द, समभिरूढ आणि एवंभूत असे चार भेद आहेत.

१ ऋजुसूत्र-वर्तमान स्थितीचें ज्ञान (पर्यायाचेंच) तेवढें ग्रहण केलें जातें तो ऋजुसूत्रनय होय. उदाहरण-देवाला देव व मनुष्याला मनुष्य म्हणणें.

२ शब्द--व्याकारण वगैरे ग्रंथाच्या तत्वानुसार शब्दांतील दोष नाहींसे करणें शब्द नय होय.

३ समभिरूढ--पदार्थाच्या एका विशिष्ट रूपानें त्याचा अर्थ करणें समभिरूढनय होय. " गच्छतीति गो " अर्थात् चालणारी ती गाय होय. परंतु निजणारी, उठणारी, तीही गाय म्हणणें समभिरूढनयाचें कथन होय.

४ एवंभूत--वर्तमानकार्य (क्रिया) ज्या प्रकारें चालत असेल त्याच-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पृथगाराधन इष्टचि असतें दर्शन समागमें बोध ।
होतो, कारण त्याचें लक्षग भेदच होति बहु भेद ॥ ३२ ॥
सम्यक्त्वातें कारण सम्यग्ज्ञानास कार्य जिन म्हणती ।
सम्यक्त्वानंतर हो ज्ञानाराधन म्हणून इष्ट अती ॥ ३३ ॥
समकालीं होणाऱ्या सम्यग्दृष्टींत आणि बोधांत ।
दीपातपासमानाचि समकारण--कार्य--भाव घटतात ॥ ३४ ॥
ठेवावा विश्वास श्रेष्ठ अनेकान्तरूपतत्त्वांत ।
तें स्वरूप जें विपर्यय तेवी संशय, विमोहविरहीत ॥ ३५ ॥

प्रमाणें सांगणें झाला एवंभूत म्हणतात. अर्थात् फक्त चालणारी तीच गाय, निजलेली बसलेली ती गाय नव्हे हें सांगणें.

याप्रकारें द्रव्यार्थिक आणि पर्यायार्थिकनयाचे मिळून सात भेद होतात. प्रमाणनयाच्या संयोगाला " नयप्रमाणाभ्याम् युक्तिः इति वचनात् " (या वचनानुसार) युक्ति म्हणतात. पदार्थांचें यथार्थ ज्ञान प्रमाण-नयामुळेंच होतें.

१ जरी दिव्याचें जळणें आणि त्याचा प्रकाश एकाच वेळेला होतात, आणि दिवा जळेपर्यंतच त्याचा प्रकाश राहतो, तरी परंतु दिवा जळणें प्रकाशाचें कारण आहे आणि प्रकाश कार्य आहे. त्याचप्रमाणें सम्यक्दर्शन आणि सम्यग्ज्ञान एकाच वेळेला होतात तरी सम्यक्दर्शन हें कारण आणि सम्यग्ज्ञान हें कार्य आहे. २ अनेकस्वभावधारी. ३ विपर्य्यय, विमोह, संशय. संशय--जें ज्ञान एकाच वेळेला एका पदार्थाला पाहून अनेक-पदार्थांच्या भावाचें ग्रहण करतें तें संशयज्ञान. जसें--शिंपली पाहून ही शिंपली आहे किंवा चांदी आहे असें ज्ञान होणें हें संशयज्ञान होय. विपर्य्यय--जें ज्ञान पदार्थांच्या मूळ स्वरूपाहून विपरीत प्रकारचें ज्ञान ग्रहण करतें तें विपर्य्यय. जसें--शिंप पाहून " तो चांदीच आहे " असा निश्चय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शब्दोर्थ उभय विनयहि उपधान तसेंच काल अतिमान ।
गुरु या अष्टांगानें युक्तचि आराधणें हि सज्ज्ञान ॥ ३६ ॥

होणें. पण वास्तविक त्याचें मूळ स्वरूप शिंपलीच असतें. परंतु शिंपलीच्या सर्वथैव विपरीत जें चांदीचें ज्ञान तें विपर्य्यय ज्ञान होय. विमोह—विमोहाला अनध्यवसाय हें एक नांव आहे. संशय विपर्य्यय ज्ञानाहून हें एक भिन्न ज्ञान आहे. यांत पदार्थाचे "हा पदार्थ कोणता आहे" या ज्ञानाचा बोध होत नाहीं. अविदित एवं मलीन ज्ञानाला अनध्यवसाय म्हणतात. जसें—रस्त्यांतून चालत असतांना पायांखालीं एकादी वस्तू येऊन तिचा स्पर्श झाला तर कोणत्या तरी वस्तूचा स्पर्श झाला हें न कळतां स्पर्श झाला एवढेंच कळणें विमोह ज्ञान होय. ही ज्ञानाची तिन्हीं रूपें मिथ्या आहेत. वस्तूस्वरूपांहून अगदीं भिन्न आहेत. तेव्हां जें ज्ञान या तीन मिथ्या ज्ञानविरहित असतें तें सम्यग्ज्ञान होय. यथार्थ वस्तुस्वरूपाला ग्रहण करणाऱ्या ज्ञानालाच सम्यग्ज्ञान म्हणतात, आणि तेंच स्व—स्वरूप आहे.

१ आठ अंगें——शब्दाचार, अर्थाचार, उभयाचार, कालाचार, विनयाचार, उपधानाचार, बहुमानाचार आणि अनिह्नवाचार, ही ज्ञानाचीं आठ अंगें आहेत. १ शब्दाचार——व्याकरणाच्या मदतीनें शब्दांना, वाक्यांना शुद्ध करून, अक्षर, पद, वाक्य, चरण, श्लोक, सूत्र, वगैरेचें शुद्धोच्चारणपूर्वक पठणपाठण करणें शब्दाचार होय. शब्दाचार, श्रुताचार, व्यंजनाचार, ग्रंथाचार वगैरे शब्द एकार्थवाचक आहेत. २ अर्थाचार——यथार्थ अर्थाचें परिज्ञान करणें अर्थाचार होय. अर्थात् ज्या पदवाक्याचा जो अर्थ विदित आहे तोच त्या शब्दवाक्याचा करणें अर्थाचार होय. त्या विरहित अर्थ करणें अनर्थविपरीत मार्ग होय. विपरीत अर्थ करण्यांत दर्शनमोहनीय कर्माचा बंध होतो. अर्थाचा अनर्थ करणें हें एक प्रकारचें पाप आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सम्यक्चारित्र.

गळला दर्शन मोहहि झाला तत्त्वार्थ सकल ज्या ज्ञात ।
दृढचित्त मनुज असला सम्यक्चारित ग्रहार्थ हो उचित ।। ३७ ।।
होई सम्यग्नामां चरित्र अज्ञान-युक्त ना पात्र ।
ज्ञानानंतर कथिलें म्हणुनी आराधण्यास चारित्र ।। ३८ ।।

---

३ उभयाचार—शब्द आणि अर्थ ह्या दोघांच्या शुद्ध व यथार्थ पठणपाठनाला उभयाचार म्हणतात. उभयाचाराला शब्द अर्थाहून भिन्न करून तिसरा भेद मानण्याचें कारण एवढेंच आहे कीं, कांहीं कांहीं ठिकाणीं केवळ ग्रंथाच्याच सहाय्यानें ज्ञानाचें आराधन केलें जातें. उदाहरणार्थ—दशाध्यायापासून भक्तामरादि स्तोत्र वगैरे पाठाच्या द्वारें आणि कांहीं कांहीं केवळ अर्थाच्या द्वारें. उदाहरण—शिवभूति मुनि केवळ, " शरीराहून आत्मा तुषमांसारखा भिन्न आहे " एवढेंच जाणून मुक्तीला गेले वगैरे भावाच्या द्वारें—म्हणून उभयाचार पृथक् केला गेला आहे. ४ कालाचार—गोसर्गकाल, प्रदोषकाल (आपराह्णिक), प्रदोषकाल व विरात्रीकाल ह्या चार उत्तम कालांत पठणपाठणादिरूप स्वाध्याय करणें याला कालाचार म्हणतात. चारही संध्याच्या पश्चात् दोन दोन तासांत उल्कापात, वज्रपात, दिग्दाह, इंद्रधनुष, सूर्यचंद्रग्रहण, तुफान, भूकंप वगैरे उत्पाताच्या वेळेंत पठण वर्जित आहे. स्तोत्र, आराधना, धर्मकथादि ग्रंथ वाचण्यास मुळींच हरकत नाहीं. माध्याह्नाच्या पूर्वीचा दोन तासांचा काल आणि सूर्योदयानंतरचा दोन तासांचा काल हा गोसर्गकाल होय. माध्यान्हाच्या नंतर दोन तास आणि रात्रीचे प्रथम दोन तास या कालास प्रदोषकाल म्हणतात. रात्र पडल्यानंतर दोन तासांचा काल आणि सूर्योदयापूर्वी दोन तासांचा काल हा प्रदोषकाल होय. मध्यरात्रीच्या नंतर दोन तास आणि सूर्योदयापूर्वी दोन तास हा विरात्रीकाल होय. ५ विनयाचार—जिनवाणीचा भक्तिविनयपूर्वक स्वा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कारण काया वाचा मनसा नाना प्रकारचें पाप
जें जगिं घडतें त्याच्या, त्यागानें ही विरक्त निष्पाप ।
तेवीं सकल कषायें विरहित जें प्राप्त निश्चयें होतें
चारित्र तेंच कीं ह्या आत्म्याचें स्वस्वरूप हा असतें ॥ ३९ ॥

हिंसा चोरि परिग्रह कुशील आणिक असत्यवचनांत ।
पूर्णैकदेशविरतिस मुनिगृहिचारित्रें बोलती संत ॥ ४० ॥

ध्याय करणें विनयाचार होय. विनयाचे बाह्य आणि अभ्यंतर हें दोन प्रकार आहेत. शुद्ध शरीरानें शुद्ध वस्त्रें नेसून शुद्ध अशा उच्च स्थानांत विनयासनपूर्वक शास्त्राभ्यास करणें बाह्यविनय होय. शास्त्राच्या वेळीं उठून उभें राहाणें, त्याला साष्टांग नमस्कार घालणें, उत्तम वस्त्रांत गुंडाळून सुरक्षितपणें ठेवणें, वगैरे सर्व गोष्टी बाह्य विनयांत येतात. अंतःकरणांत स्वधर्माविषयीं पूर्ण भक्ति असणें, शास्त्राचें उत्तम तऱ्हेनें मनन–चिंतन करणें, बुद्धीला निर्मल एवं विशेष क्षयोपशमशालिनी बनाविणें, जैनधर्माच्या सिद्धान्ताला सर्वव्यापी बनाविणें वगैरे अंतरंग विनयाचे प्रकार म्हणविले जातात. ६ उपधानाचार–सूत्र, वार्त्तिक, श्लोक, गाथा यांना न विसरणें उपधानाचार होय. ७. बहुमानाचार––ज्ञान, पुस्तक आणि शिक्षक यांचा पूर्ण आदर करणें बहुमानाचार होय. ८ अनिह्नवाचार––ज्या गुरुशास्त्रांपासून ज्ञान प्राप्त झालें, त्यांना झांकून न ठेवणें अनिह्नवाचार होय. तसें करण्यानें ज्ञानावरणीय कर्माचा बंध घडतो.

१ परपदार्थांविषयीं उदासीन. २ चारित्रः–हिंसा, असत्य भाषण, चोरी, कुशील आणि परिग्रह यामुळें चारित्राचे सर्वदेश आणि एकदेश असे दोन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जो संपूर्ण त्यागी तो मुनि शुद्धोपयोगिं रत असतो ।
तो श्रावक जाणा जो सर्वस्वीं एकदेशिं रत होतो ॥ ४१ ॥
आत्मिक परिणामाच्या घातें हिंसा घडेचि ही सगळी ।
ही असत्यवचनादिक केवळ शिष्यांस बोधिण्या कथिलीं ॥४२॥
जो द्रव्यभावरूप प्राणाचा वध घडे कषायानें ।
हिंसा अवश्य तेथें अवतरते कथियले असेंच जिनें ॥ ४३ ॥

प्रकारचें भेद होतात. हिंसादिक पापांचा सर्वथैव त्याग करणें याला सकल-चारित्र आणि एकदेश त्याग करणें याला देशचारित्र म्हणतात. सकल-चारित्राचा धारक मुनि:असतो म्हणून त्यास मुनिचारित्र आणि एकदेशचारि-त्राचा धारक श्रावक असतो म्हणून त्यास श्रावकचारित्र असें म्हणतात. चारि-त्राचे याशिवाय पुष्कळ भेद आहेत ते इतर ग्रंथांतून वाचकांनीं पाहावेत.

१ हिंसा—आत्मिक परिणामाचा घात ती हिंसा होय. मनवचनकायेंकरून आपल्या अथवा दुसऱ्याच्या परिणामांत बिघाड, दुःख, कष्ट, उत्पन्न होणें तीच हिंसा होय. हिंसा दोन प्रकारची आहे. एक भावहिंसा व दुसरी द्रव्यहिंसा. आत्मीय भावाची हिंसा जेथें होते ती भावहिंसा होय. शारीरिक कष्ट झाले कीं, आत्मीक परिणामालाही कष्ट होतें आणि म्हणूनच द्रव्यहिंसा ही हिंसेंत गर्भित समजली जाते. खोटें बोलणें, चोरी करणें, वगैरे कामें कीं, ज्यांमुळें आत्मिक परिणामाचा घात होतो तीं द्रव्यहिंसा होय. आत्म्याचा मूळ धर्म खोटें बोलणें हा नसून सत्य हाच आहे. आत्म्याचे परिणाम मूळ स्वरूपाला सोडून जेव्हां विकृत अवस्थेला धारण करतात तेव्हांच हिंसा घडते आणि म्हणूनच आत्मिकस्वरूपविकृति-कारक पदार्थ हिंसेंत मोडतात. तात्पर्य हेंच कीं, जेवढे म्हणून विकृत भाव ते सारे हिंसास्वरूपीच होत. संसारांत पापाच्या भेदप्रभेदाला जेवढीं म्हणून नांवें दिलीं जातात तीं खरोखरी हिंसेचीं दुसरीं पर्य्यायिक नामेंच होत. २ सकषायमन-वचनकायेनें आपल्या तसेंच दुसऱ्याच्या अथवा उभयतांच्या द्रव्यभाव-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्राणाचा घात होणें हें हिंसेचें मूळ लक्षण होय. हिंसा ही सर्वस्वी मनाच्या परिणामावरच अवलंबून असते. हितकर्त्यानें केलेला कटुतर उपदेश जरी केलेल्या व्यक्तीच्या मानसिक परिणामाला बिघडविण्याला—घाताला—कारणीभूत होतो तरी त्या उपदेशकांस त्यामुळें दोष लागत नाहीं. कारण त्यांत त्याचा सद्धेतूच असतो. तद्वतच प्रमादवश झाल्यामुळें अथवा दृष्टिदोषानें हिंसा करण्यासारखे मानसिक परिणाम नसतांना देखील एखाद्या सूक्ष्म जीवाचा घात होईल तर त्याची हिंसा त्यास लागत नाहीं. हिंसा सर्वस्वी न करण्याचें परिणाम हेंच याचें कारण होय. डॉक्टर जेव्हां रोग्याच्या शरीराची त्याचें बरें व्हावें या एका सद्धेतूनेंच चिरफाड करतो तेव्हां जर कदाचित् दैवयोगानें त्या शस्त्रक्रियेमुळें तो रोगी मरण पावला तर त्याला मारणारा डॉक्टर असें कदापीहि ठरूं शकत नाहीं. म्हणूनच जेथें अभिप्रायपूर्वकच जीवाचा वध केला जातो तेथें हिंसा घडते आणि सकषाय प्रवृत्ति जेथें असते तेथेंच अभिप्रायपूर्वक जीवाचा वध घडतो. संकल्पिनी, विरोधिनी, आरंभिनी आणि उद्योगिनी, हें हिंसेचे चार भेद आहेत. १ हिंसेच्या अभिप्रायानें अर्थात् हिंसा करण्याच्या भावनेनें जी हिंसा केली जाते ती संकल्पिनी हिंसा होय. संकल्पिनी हिंसा करण्यास तयार झालेल्या जीवाचे हातून जीवाचा घात प्रत्यक्षांत होवो अथवा न होवो पण मनाचें परिणाम कषाययुक्त झाल्यामुळें त्याला हिंसास्वरूपी पापबंध घडतो. २ जेव्हां दुसरा एखादा जीव स्वतःला दुःख देण्याच्या अथवा मारण्याच्या इच्छेनें अंगावर चालून येतो त्यावेळेस त्यास मारण्याची अथवा दुःख देण्याची इच्छा नसतांनाहि आपल्या रक्षणार्थ केलेल्या विरोधामुळें जर त्या जीवाचा वध झाला तर त्या विरोधामुळें उत्पन्न होणाऱ्या हिंसेला विरोधिनी हिंसा म्हणतात. ३ गृहस्थाश्रमांत आरंभामुळें होणारी हिंसा ती 'आरंभिनी' हिंसा होय. गृहस्थाश्रमी मनुष्याला प्रपंचासाठीं आरंभ करावा लागतो. आरंभाशिवाय संसार चालत नाहीं. पाणी सांडणें,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रागादीची होणें उत्पत्ति न अहिंसाच ती सत्य ।
तदुत्पत्ति ती हिंसा ऐसें जिनधर्मसार संक्षिप्त ॥ ४४ ॥
रागादिक उदयाविण योग्योचरणीं मुनीश्वराकडुन ।
प्राणनाश जरि झाला लागे हिंसा तयांस तीं कधिं न ॥ ४५ ॥

कपडे धुणें, वगैरे कार्यांत आरंभ होतो. आणि आरंभ घडतो तेथें हिंसा असतेच ! यासाठीं श्रावकानें विशेष आरंभ घडेल असें कार्य टाकावें. ४ गृहस्थाश्रमी मनुष्याच्या उद्योगधंद्यामुळें होणारी ती उद्योगिनी हिंसा होय. अन्न कोठथांत भरून ठेवणें, दुकान उघडणें, शेती करणें वगैरे उद्योग जीवहिंसेला कारणीभूत होतात. या चार प्रकारच्या हिंसेपासून विरक्त असणें बरें ! प्रयोजनावांचून अनावश्यक होणाऱ्या हिंसेचा त्याग करावा.

१ यांतील आदि हा शब्द द्वेष, मोह, काम, क्रोध, मान, माया, लोभ, हास्य, भय, शोक, जुगुप्सा, प्रमाद वगैरे विभावाचा द्योतक आहे. ह्या विभवाचें संक्षित लक्षण पुढीलप्रमाणें आहेः–१ राग– एकादा पदार्थ इष्ट जाणून त्यांत प्रेम करणें. २ द्वेष–एकाद्याला आपला अहितकर्मी, (अनिष्ट) जाणून आपल्या मनाचे अप्रीतिरूप परिणाम बनविणें. ३ मोह–परपदार्थांची ममता धरणें आणि तसे परिणाम बनविणें. ४ काम–स्त्री, पुरुष आणि नपुंसक ह्यांच्याशीं मैथुन करण्याची इच्छा. ५ क्रोध–एखाद्याची अनुचित कृति पाहून त्याला दुःख देण्याच्या हेतूनें मनाचे परिणाम बनविणें. ६ मान–स्वतःला मोठें मानणें. ७ माया–मनवचनकायेमध्यें एकतेचा अभाव असणें. ८ लोभ–परपदार्थांशीं संबंध ठेवण्याची इच्छा असे परिणाम. ९ हास्य–उत्तम अनुत्तम चेष्टेकडे पाहून हंसणें. १० भय-आपल्यास दुःख देणाऱ्या पदार्थाला पाहून भयभीत होणें. ११ शोक–आपल्या इष्टाच्या अभावीं आर्त्तरूप परिणाम बनविणें. १२ जुगुप्सा–ग्लानीयुक्त परिणाम. १३ प्रमाद– कल्याणकारक कार्यांत अनादर. २ योग्य आचरण करणाऱ्या. ३ जैनागमांत हिंसेचें लक्षण–' प्रमत्त योगात् प्राणव्यपरोपणं हिंसा '

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होवोनि वश कषाया वागत असतां प्रमत्त होऊन ।
जीव मरो वा न मरो, धावे हिंसा पुढें खचित जाण ॥ ४६ ॥
कारण कषाययुक्तचि होता तो प्रथम घात जीव करी ।
स्वात्म्याचा, मग हिंसा अन्य जिवाची घडो न वाहि परी ॥४७॥
हिंसेमधिं परिणमनें विरक्त नसणें तरीहि ती हिंसा ।
म्हणुनी प्रमत्त योगी प्राण्याचा घात नित्य होइ असा ॥ ४८ ॥
परपदार्थ कारण ज्यां अल्प न हिंसा नरें कधीं घडते ।
हिंसाऽऽयतना त्यजणें तरिही परिणाम शुद्धिसाठीं ते ॥ ४९ ॥
निश्चय नच समजुनि जो आश्रय करि मूर्ख त्याचें तत्त्वाचा ।
बाह्यक्रियेंत आळसि बनुनी करि नाश करणें—चरणाचा ॥ ५० ॥
कुणि भोगण्यास हिंसा केल्याविण पात्र एक हो मात्र ।

'प्रमादाच्या योगानें प्राण नष्ट करणें ' हिंसा ' होय ' असें सांगितलें आहे. प्राण नष्ट करणें यापूर्वी ' प्रमत्तयोग ' हें विशेषण जोडलेलें आहे. हिंसेचीं लक्षणें अव्याप्ति, अतिव्याप्ति, असंभव वगैरे दुषणांपासून रहित होण्यासाठींच हें विशेषण दिलेलें आहे. प्रमत्तयोग नाहीं पण जीवाचा घात जेथें आहे तेथें हिंसा म्हणविली जात नाहीं आणि प्राणाचा घातहि जेथें नाहीं पण प्रमत्त-योग जेथें आहे तेथें हिंसा म्हणविली जांते. हें प्रमादयोगरूप पदावरून सिद्ध होतें.

१ हिंसेच्या आयतनाला. हिंसेला कारणीभूत होणाऱ्या परिग्रहादिकांना. २ निश्चयश्रद्धेमुळें अंतरंग हिंसेलाच हिंसा मानणें या तत्त्वाचा. ३ बाह्य क्रियारूप आचरणाचा. ४ या श्लोकांत परिणामाची विचित्रता दाखविली आहे आणि त्यावरच हिंसेच्या फलाचा भोक्ता—अभोक्ता हें सिद्ध केलें गेलें आहे. एकादा जीव हिंसा करण्याची इच्छा करून देखील बाह्यतः जीवाचा घात करूं शकत नाहीं. अशा अवस्थेंत हिंसास्वरूपी परिणाम बनविल्या-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हिंसा करोनि दुसरा हिंसाफळ भोगण्या न हो पात्र ॥ ५१ ॥
हिंसा अल्प कुणाची परिणामीं दुःख देतसे फार ।
इतराची बहु हिंसा शेवटिं देतेच दुःख अल्पंतर ॥ ५२ ॥

मुळें प्रत्यक्षांत हिंसा घडली नसूनही त्याला हिंसेचें फळ अवश्य भोगावें लागतें. या श्लोकांत एकजण हिंसा न करतांच हिंसेचें फळ भोगण्यास पात्र बनतो. आणि कोणी एकजण हिंसा करून देखील हिंसेचें फळ भोगण्यास पात्र होत नाहीं असें म्हटलें आहे, हें पुढील उदाहरणांवरून स्पष्ट कळेलच. उदाहरण—मासे धरण्यासाठीं जाळ्यांस लहान लहान गांठी मारणारा धीवर ज्या वेळेंस जाळें नदींत टाकून बसतो, त्यावेळेंस त्याचे परिणाम हिंसास्वरूपी बनतात. पण प्रत्यक्षांत त्या जाळ्यांत मासे न सांपडल्यामुळें त्याच्या हातून प्रत्यक्ष अशी हिंसा घडत नाहीं. पण सकषाय परिणामामुळें त्याला हिंसेचें फळ भोगावें लागतेंच. पण तेंच शुद्धाचरणी शेतकऱ्याकडून जमीन नांगरतांना न कळत जीवहिंसा झाली तर त्याचा दोष त्याचे माथीं बसत नाहीं. कारण हिंसा होणें न होणें हें सारें परिणामावरच अवलंबून असतें. धीवराची कषाययुक्त इच्छा भावहिंसेस कारणीभूत झाली आणि शेतकऱ्याची शुभपरिणामी इच्छा हिंसा घडूनहि शुभास्रवास कारणीभूत झाली. हें सारें परिणामावरच अवलंबून असतें. परिणामानुसार फळ हें मिळतेंच.

१ एखादा जीव हिंसा थोडी करूनहि आपल्या भावांना कषायामुळें तीव्र हिंसामय बनवितो. यामुळें अशुभ कर्माचा बंध त्याला होतो. हा कर्मबंध जेव्हां उदयाला येतो तेव्हां अधिक हिंसेमुळें भोगावें लागणारें फळ त्यास भोगविण्यास लाऊन अधिक दुःख देऊन मोकळा होतो; तसेंच दुसरा मंदकषायी बाह्यतः अधिक हिंसा करतो पण त्याला त्याच्या मंद कषायामुळें मंद कर्मबंध होतो. आणि हा कर्मबंध उदय पावतांच अस्तास जातो. एकूण त्याला त्याचें दुःख फारसें भोगावें लागत नाहीं. एखाद्याची बाह्य हिंसा अल्प असूनहि परिणामीं मनस्वी दुःख कां देते; आणि एखाद्याची बाह्य हिंसा अधिक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एकाला फळ तीव्राचें दुसऱ्याला सौम्य तीच फळ देते ।
दोघांची सम असली हिंसा शेवटीं विचित्र फळफळते ॥ ५२ ॥
हिंसा प्रथमचि फळते केल्यावर कधिं करीत असतांना ।

असूनहि परिणामीं दुःख फार थोडें कां देते, हें वरील स्पष्टिकरणावरून सहज लक्षांत येईलच. हा सारा परिणामाचा खेळ होय. परिणामाची सरागता अथवा वीतरागता हीच हिंसाअहिंसारूप फलाची जन्मदात्री होय.

१ प्रसवते; देते. दोन जीव मिळून जरी एखादी हिंसा करतात तरी त्यांना त्याबद्दल सारखें कधीं फळ मिळत नाहीं. जसें ज्याचे कमी अधिक प्रमाणांत कषाययुक्त परिणाम असतात तसें त्याला कमी अधिक फळ मिळतें. एक कार्य करण्यास दोघे प्रवृत्त असूनहि परिणामाच्या तीव्रतेमुळें अथवा मंदतेमुळें दोघांपैकीं एकाला अधिक पापबंध होतो तर दुसऱ्याला मंदस्वरूपी पापबंध होतो. उदाहरणार्थ राजा आणि प्रजा यांचा संबंध घ्या. परचक्र चालून आलें असतां मंदकषायी राजा प्रजेच्या कल्याणासाठीं व राज्यरक्षणासाठीं आपल्या सैनिकांस त्यावर चालून जाण्याची आज्ञा देतो. अर्थात् हिंसेचा भागीदार बनतो. तरी राजाच्या आणि सैनिकांच्या परिणामांत कमीअधिक तीव्रता असल्यामुळें त्यांना कमीअधिक हिंसेचें फळ भोगावें लागतें. यावर कोणी म्हणतील, कीं राजानेंच आज्ञा दिली, तेव्हां तोच या सर्व पापमय कृत्याचा भोक्ता व्हावयास पाहिजे. पण तें तसें नाहीं. कारण राजानें आज्ञा दिली तरी सैनिकाची लढताना होणारी कषाययुक्त प्रवृत्तीच अधिक हिंसेस कारणीभूत होते. राजाची आज्ञा अन्यायनिषेधक असल्यामुळें ती त्याचें कर्तव्य म्हणून द्यावीच लागते. म्हणून त्याला अल्पतर पापबंध घडतो. न्यायपूर्वक दंडाज्ञा देणारा न्यायाधीश जसा निर्दोषी तसाच हा राज्यासनाची न्यायपूर्वक व्यवस्था ठेवणारा राजा निर्दोषी होय. त्याची सरागप्रवृत्तिजन्य हिंसा ही खरी, पण सैनिकाइतकी अधिक नाहीं. आणि हें सारें परिणामांवरच निर्भर असतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करितां आरंभ न वा, परि दे भावानुसार फळ नाना ॥ ५४ ॥
एकाचि हिंसा करितो तत्फळ भागीनें होति जन बहुत ।

---

१ जसे ज्यावेळेस जीवाचे भाव होतात तसे त्या वेळेस त्याच प्रकारचें शुभाशुभकर्मांचे बंध त्याला होतात. एखाद्या जीवाचा एखाद्या जीवाला मारण्याचा विचार त्याला अशुभ कर्मबंध घडविण्यास कारणीभूत होतो. विचार केल्यानंतर त्या प्राण्याला ठार मारण्यापूर्वीच विचारामुळें पूर्वी बांधला गेलेला बंध उदयास येऊन त्याला त्याच्या हिंसेचें फळ मिळतें. कोणी एक जीव एखाद्याला मारण्याची इच्छा करतो आणि त्या हिंसारूप विचारामुळें त्याला तसा कर्मबंध होतो. नंतर तो जेव्हां त्याला मारण्यास धांवतो त्याच वेळेस त्याला त्याच्यां हिंसेचें फळ मिळूं लागतें. कोण्या एका जीवानें एका जीवाची हिंसा केली. हिंसा करतांना त्याला झालेला कर्मबंध पुढें कांहीं वेळानंतर उदयाला आला म्हणजे हिंसा केल्यानंतर त्याला हिंसेचें फळ मिळालें. एखाद्या जीवानें हिंसा करण्याचा विचार केला पण त्याच्या हातून हिंसा घडली नाहीं, पण त्या विचारामुळें त्याला अशुभ कर्माचा बंध झाला व शेवटीं हिंसा न करूनही त्याला त्याचें फळ मिळालें. या वरील चार भंगानें हिंसेची विचित्रता हेंच सिद्ध होतें. जीव हिंसा करो वा न करो, मग करो वा अगोदर करो अथवा त्या वेळेसच करो कसेंही असो ! जसें जीवाचे परिणाम होतील तसे त्याला बंध पडतील आणि बांधलेली कर्में उदयाला येतांच अवश्य फळ देतील. २ वांटेकरी, भागीदार. एका कुटुंबांत दहा पुरुष राहतात. त्या सर्वांच्या इच्छेनें आणि प्रेरणेनें त्यांतील एकानें चोरी केली किंवा जुगार खेळली तर त्याच्या त्या दुष्कृत्याबद्दल सर्वांनाच फळ भोगावें लागतें. एखाद्या कुटुंबांत दुष्ट असा व्यसनी मनुष्य राहात असेल तर त्यानें केलेल्या अपराधामुळें सर्वच पकडले जातात. अशा या गोष्टी प्रत्यक्षांत पहावयास सांपडतात. यावरून एक हिंसा करतो व त्याचें फळ अनेकांना भोगावें लागतें हें उघडच होय. कारण एकमेकांस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हिंसा बहुजन करितां त्याचें फळ भोगि एकला फक्त ॥ ५५ ॥
देते हिंसा कवणा हिंसा फळ एकटेंच फळकाळीं ।
तीच परी दुसऱ्याला देइ अहिंसा फलास बहु काळीं ॥ ५६ ॥
फळ कोणा परिणामीं देइ अहिंसाच फक्त हिंसेचें ।

सहाय्यता केल्यामुळें प्रत्यक्ष हातून जरी घडलें नाहीं तरी अशुभ कर्माचा बंध सर्वांनाच होतो. कांहीं ठिकाणीं याच्या विपरीत घडतें. अर्थात् अनेक हिंसा करतात आणि त्याचें फळ एकाला मिळतें. उ०-राजानें अमुक पुरुषाला मारण्याची आज्ञा केली, परंतु सैनिकांची इच्छा त्याला मारण्याची नसते पण राजदंडाच्या भयामुळें ते त्याला मारण्यास प्रवृत्त होतात आणि म्हणूनच या हिंसेचें फळ ती आज्ञा देणारा जो राजा त्यालाच मिळतें. सैनिक लोक इच्छा नसतांनाहि राजाज्ञेमुळें तें दुष्ट कर्म करण्यास प्रवृत्त झालें पण ते त्या हिंसेचे भागीदार ठरत नाहींत. हिंसा एक करतो आणि त्याचें फल अनेकांना भोगावें लागतें हें यावरून सिद्ध झालें. ही परिणामाची विचित्रता होय.

१ परिणामीं. एखाद्या जीवानें दुसऱ्या जीवाची हिंसा करण्याच्या इराद्यानें जर हिंसा केली तर त्याला दुष्कर्मामुळें घडणारा बंध घडून त्याचें दुःख त्याला मिळेल. पण हिंसेची मनीषा नसूनहि एखाद्यानें हिंसा केली तर हिंसेचें फळ न मिळतां अहिंसेचेंच त्याला फळ मिळेल. उदाहरणार्थ—वनांत ध्यानस्थ बसलेल्या मुनीला पाहून त्याला मारण्याच्या उद्देशानें सिंहानें त्याच्यावर झडप घातली. पण त्याच वेळेस डुकराला मुनीची रक्षा करावी, ही सुभावना उत्पन्न झाली व तत्क्षणींच त्यानें सिंहावर आक्रमण केलें. दोघेही लढतां लढतां मेले. दोघांचेहि परिणाम क्रूर होते. पण सिंह मरून नरकाला गेला, आणि डुकर स्वर्गाला गेला. दोघांचेहि परिणाम हिंसक होते. दोघांनींहि आपापली हिंसा केली. एकाच वेळेला त्यांची प्रवृत्ति हिंसारूप झाली; तरीहि एक स्वर्गाला आणि दुसरा नरकाला गेला याचें कारण सिंहाचा अभिप्राय मुनीवराचा घात करण्याचा, व डुकराचा अभिप्राय त्यांची रक्षा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तशि इतरां दे हिंसा, फक्त अहिंसाच नान्य फळ साचें ॥ ५७ ॥
जिनमार्गमूढजीवा या दुस्तर विविध—भंग—विपिनांत ।
सद्गुरुच शरण असती बहुविधनय-चक्रें ज्यां असे ज्ञात ॥५८॥
जिनवरनयचक्र असे अतिशय दुःसाध्य तीक्ष्णधारी, तें ।
धारण करि जो मूढचि मस्तक त्याचे क्षणांत उतरीतें ॥ ५९ ॥
जाणोनि हिंस्य, हिंसक, हिंसा हिंसा—फलास तत्त्वानें ।

करण्याचा होता.

१ कोण्या एका जीवानें एखाद्या जीवाचा घात करण्याची किंवा त्यास कष्ट देण्याची मनांत भावना धरून त्याप्रमाणें उद्योगास लागला परंतु तो अन्य जीव आपल्या पुण्योदयानें वांचला. वाईट होण्याचे ठिकाणीं त्याचें चांगलें झालें. अशा स्थितींत हिंसा घडलेली नसतांना सुद्धां घात करण्याचा प्रयत्न केल्यामुळें हिंसेसेंच फळ मिळतें. पक्ष्याच्या पिल्लाला सडकेवर पडलेलें पाहून एखाद्या माणसानें तें सुरक्षित राहील या अभिप्रायानें त्याला एका घरट्यांत नेऊन ठेवलें. परंतु तेथून एका पक्षानें पकडलें व त्याला मारिलें. तसेंच रोग्याला बरें करण्याच्या हेतूनें वैद्यानें त्याला औषध दिलें परंतु त्याच औषधानें तो रोगी मेला तर अशा स्थितींत त्या वैद्याला किंवा पक्षाच्या पिल्लाला घरट्यांत ठेवणाऱ्या पुरुषाला हिंसा घडली असूनहि अहिंसेचेंच फळ मिळतें. कारण त्यांचें परिणाम हिंसामय झालेले नसून त्यांच्या भावना जीव वांचविण्याच्या असतात. २ अत्यंत कठीण. ३ विविधभंगरूपी अरण्यांत. ४ अनेक प्रकारचे नयसमूह. ५ साध्य होण्यास कठिण. ६ खालीं ठेवतें. ७ ज्याची हिंसा केली जाते तें हिंस्य म्हणविले जातात. एकेंद्रियापासून संज्ञी पंचेंद्रियांपर्यंतचे सर्वच प्राणी हिंस्य होत. ८ हिंसा करणाऱ्याला हिंसक म्हणतात. ९ हिंस्य जीवाच्या प्राणघाताची क्रिया. याविषयीं अधिक विवेचन मागें केलेलेंच आहे. १० हिंसेमुळें प्राप्त होणारें नरकनिगोदादि फळ.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अवगूहेमानमनुजें हिंसा शक्तीनुसार नित त्यजणें ॥ ६० ॥
मधु मांस मद्य तेवीं पंच उदुम्बर फलास यत्नानें ।
हिंसेस त्यागण्याला त्यागावें प्रथम इच्छि जो त्यानें ॥ ६१ ॥
मद्य मना मोहवितें मोहित मनुजास नाठवे धर्म ।
अविशंक आचरीतो हिंसा नर विसरलाच जो धर्म ॥ ६२ ॥
बहुत रसें जन्मति त्या जीवांची योनि मद्य म्हणवितसे ।
यास्तव त्यां जे भजती अवश्य हिंसा, तयास लागतसे ॥ ६३ ॥
अभिमान भय जुगुप्सा हास्य अरति काम कोप इत्यादि ।
हिंसेचे पर्यायचि सर्व सुरा निकटवर्ति हें अगदीं ॥ ६४ ॥
हरिल्याविण या प्राणा, मांसोत्पत्ती कधीं न ती होते ।
हिंसा मांसाहारी मनुजाकडुनी म्हणोनि अति घडते ॥ ६५ ॥
मृत गो-महिषादींचे स्वयेंचि, जें मांस त्यास खातांची ।
हिंसा घडते घातें त्याच्या आश्रित निगोदं जीवांची ॥ ६६ ॥
परिपक्व वा अपक्कहि पक्कदशेंतील मांस-पेशींत ।
त्या तत्तज्ञातीचें सम्मूर्छनजीव जन्मती सतत ॥ ६७ ॥

---

१ संवरांत उद्योग करणाऱ्या जीवांनीं. २ पंचोदोम्बर—पिंपळ, उम्बर, कटु उंबर (अंजीर), वड, पाखर हीं पांच उदुंबर फळें होत. कित्येक कटुंबराला अंजीर म्हणून सोडण्यास सांगतात तर कित्येक अंजिर खाण्यास परवानगी देतात पण अद्यापि या कटुम्बर शब्दाच्या अर्थाचा निर्णय कोणीहि करून घेत नाहीं. वास्तविक अंजीर देखील उम्बरासारखेच जीवमय असतें. तेव्हां त्याचाही त्याग करावयास पाहिजे. पण जें आवडतें तें कोणीहि सोडण्यास तयार होत नाहींत. ३ बेधडक, विचार न करतां. ४ सम्मूर्च्छन जीव, त्या त्या जातीचे जीव. ५ मांसकोषांत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भक्षी वा स्पर्शे करी अपक्व वा पक्व मांस–पेशींना ।
तो नाशि सतत त्यांतिल नानाविधजातजीवपिण्डांना ॥ ६८ ॥
अलि–हिंसात्मक बहुधा मधुकण देखील तो असे लोकीं ।
मधुभक्षक–मूढमती तो अत्यंतहि ठरेच हिंसक कीं ॥ ६९ ॥
मधुकोशाला पिळुनी, ग्रहण करि मधु स्वयेंचि वा गळतें ।
त्या आश्रित जीवांच्या घाते हिंसा तयांतहि घडते ॥ ७० ॥
मधु मद्य मांस लोणी, अति विकृतियुक्त याच वस्तूंतें ।
तद्वर्ण जीव जन्मति म्हणुनी, ग्रहणें न योग्य व्रतिकांतें ॥ ७१ ॥
वड औदुम्बरयुगलहि पाखरपिंपळ–फळेंहि योनीच ।
त्रसजीवाची म्हणुनी हो तत्तद्भक्षणेंहि हिंसाच ॥ ७२ ॥
कालानंतर होउन शुष्कत्रसरहित जीं फळें बनती ।
तद्भक्षकास घडते विशिष्ट रागादिरूप हिंसा ती ॥ ७३ ॥
त्यजिल्यावरि या अष्टाचि, अनिष्टे दुस्तरेंहि पापपात्रफला ।
होतो विशुध्दबुध्दी पात्र परी तो जिनोपदेशाला ॥ ७४ ॥
धर्म अहिंसारूपी श्रवण करोनि न सोडण्या शक्त ।
जो स्थावर–हिंसेला, त्रस–हिंसा सोडणें तयें युक्त ॥ ७५ ॥

---

१ अतिशय विकारयुक्त वस्तूंनीं भरलेल्या. २ दुःखदायक, वाईट. ३ पार जाण्यास अवघड. ४ त्रस–स्थावर हिंसा–संसारी जीवाचे त्रस आणि स्थावर हे दोन भेद आहेत. ज्यांना केवळ एकच स्पर्शन इंद्रिय असतें ते एकेंद्रियधारी जीव स्थावर होत. द्वींद्रियापासून पंचेंद्रियापर्यंतच्या प्राण्यांना त्रस म्हणतात. द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय व पंचेंद्रिय हे चार त्रसजीवाचे भेद आहेत. द्वींद्रिय जीवांना स्पर्शेंद्रिय व रसनेंद्रिय हीं दोनच इंद्रियें असतात. शंख, कृमि, हे द्वींद्रिय जीव होत. स्पर्श, रस, घ्राणयुक्त ते मुंगळा, मुंगी, त्रीन्द्रि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कायावाचामनसा करणें वा करविणें करायाचें ।
अनुमोदन दिधल्यानें ऐशा उत्सर्ग–रूप विरतींचे ॥
नवधा प्रकारचे ते मानियले भेद आणि कथितात ।
अपवादरूप विरतिस विचित्र तेवीं अनेक रूपांत ॥ ७६ ॥

यधारी जीव होत. स्पर्श, रस, घ्राण, व चक्षु युक्त ते डांस, भ्रमर, पतंगादि चतुरिंद्रियधारी; आणि स्पर्श, रस, घ्राण, चक्षु, आणि कर्ण या पांचही इंद्रियांनीं युक्त–घोडा, बैल ते पंचेंद्रियधारी जीव होत. पंचेंद्रिय जीवांचे संज्ञी व असंज्ञी हे दोन भेद आहेत. ज्यांना मन असतें ते संज्ञी व नसतें ते असंज्ञी जीव होत. संज्ञीचे देव, मनुष्य, नारकी व तिर्यंच असे चार भेद आहेत. यांतून देवाचे भवनवासी, व्यंतरवासी, ज्योतिषवासी आणि कल्पवासी असे भेद आहेत. मनुष्यांत आर्य, म्लेंच्छ हे दोन भेद आहेत. नारकीयांत भूमीच्या अपेक्षेनें सात आणि तिर्यंचांत-जलचर, नभचर व स्थलचर, हे तीन भेद आहेत. स्थावर–जीवाचे पांच भेद आहेत. पृथ्वीकाय, जलकाय, वायुकाय, तेजकाय आणि वनस्पतिकाय (१) पृथ्वीकाय–पृथ्वी हीच ज्यांची काया ते पृथ्वीकाय जीव. (२) जल हीच ज्यांची काया ते जलकाय. (३) अग्नि हीच ज्यांची काया ते तेजकाय जीव. (४) वायु हीच ज्याची काया ते वायुकाय जीव होत. हे चार प्रकारचे जीव अत्यंत सूक्ष्मावस्थेंत राहतात. त्याचे पृथ्वी, जल, तेज, आणि वायु हेंच रूप असतें. (५) वनस्पतिकाय–वृक्ष लहानही असतात व मोटेही असतात. निगोदी जीव अत्यंत सूक्ष्म असून ते वनस्पतिकाय जीव होत.

१ त्यागाचे दोन भेद आहेत. एखादें कार्य मनवचनकायेंकरून स्वतः करणें, दुसऱ्याकडून करविणें, करणाराची प्रशंसा करणें किंवा करणारास उत्तेजन देणें या नऊ प्रकारनीं केलें जातें त्याला उत्सर्गत्याग म्हणतात. उत्सर्गत्याग, सामान्यत्याग, सर्वथात्याग, हे सगळे पर्य्यायवाची शब्द आहेत परंतु जो त्याग या नऊ भेदांपैकीं एक वा अनेक भेदांनीं केला जातो तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्तोकैकेंद्रियघातें योग्यंचि विषयोपभोग ज्या मिळती ।
त्यजणें शेष स्थावर–हिंसा ही श्रावकें सदा जगतीं ॥ ७७ ॥
जे मोक्षाकारण त्या परम अहिंसा–रसायना करुनी ।
प्राप्त, न आकुल व्हावें मूढीं असमंजसत्व ते बघुनी ॥ ७८ ॥
सूक्ष्माचि भगवद्धर्म, न धर्मास्तव हिंसनांत मुळें दोष ।
या धर्ममुग्धहृदयें मारुं नये कधिं शरीरिजीवास ॥ ७९ ॥
धर्म सुरें उद्भवला हा देणें सर्व योग्य तें त्यांस ।
अविवेकबुद्धिनें या मारुं नये लोकिं देहधारीस ॥ ८० ॥

अपवादत्याग म्हणविला जातो. अपवादत्याग, विशेषत्याग, आंशिकत्याग वगैरे सगळे पर्य्यायवाची शब्द आहेत. चारित्रधारण करणाऱ्यांचे जसे मुनि, आणि श्रावक हे दोन भेद आहेत तसेंच त्यागाचे सर्वथात्याग आणि एकदेशत्याग हे दोन भेद आहेत. मुनिराज महाव्रताचे धारक असल्यामुळें प्रत्येक पापाचाराचा सर्वथात्याग करूं शकतात, पण गृहस्थी हा अणुव्रती तसाच प्रतिपाक्षिकही असतो. म्हणूनच तो यथाशक्ति थोडा थोडा त्याग करूं शकतो. कोणी वचनानें न करतां कायेनें करतो तर कोणी वचनानेंही करतो. कोणी मनवचनकायेंकरून त्याग करतो, म्हणजे स्वतः करतो दुसऱ्यांना तें सोडण्या-विषयीं प्रवृत्त करण्याच्या विषयाचा आरंभ करतो. कोणी दुसऱ्याला पाप करीत असतांना स्वतः त्याचा त्यागी असूनहि त्याची प्रशंसा करतो इत्यादि अपवाद त्यागाचे अनेक भेद आहेत. २ त्यागाचे.

१ अल्पएकेंद्रियघाताहून–व्यतिरिक्त. २ न्यायपूर्वक. ३ अज्ञानी जीवाचें असंगत वर्तन पाहून. ४ धर्मभोळ्या भावनेनें. जेथें हिंसा असते तेथें धर्म नसतो. यास्तव धर्मी पुरुषांनीं धर्मासाठीं यज्ञ वगैरे करण्यांत हिंसा नाहीं असा ग्रह करून घेऊं नये. जैनधर्मांत मंदीर बांधणें, प्रतिष्ठा करणें, वगैरे कामें, कीं ज्यामुळें विपुल हिंसा होते–करण्यास सांगितलीं आहेत, मग यांत धर्म नसतो काय ?

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पूजनीयें मनुजास्तव वृषादि वधण्यांत ना मुळीं दोष ।
चिंतुनि ऐसें वधणें अतिथीस्तत्र योग्य नाच जीवास ॥ ८१ ॥
बहु जीवघात–युक्ताचि अन्नाहुन एक–जीव–घातान्न ।
बरवे चिंतुनि ऐसे मोठ्या प्राण्यास मारणें कधिं न ॥ ८२ ॥
एकास मारण्यानें घडते रक्षा बहूत जीवांची ।
ऐसें मानुनि करणें योग्य न हिंसाच हिंस्त्र–जीवांची ॥ ८३ ॥
बहु जीव घातकी हें करतिल बहु पातकें जिवन्तपणीं ।
हिंसक--जीवा वधणें कधिं नच या परि दयार्द्र होवोनी ॥ ८४ ॥
अतिदुःखपीडितांना वधतां झणिं दुःख–मुक्त होती ते ।
ही वासना–कृपाणी वरुनी वधणें न दुःखि–जीवांतें ॥ ८५ ॥
कष्टें सुख लाभतसे सुखीजना मारितां सुखी होती ।
यास्तव सुखिजनघातां तर्कअसीतें धरूं नये हातीं ॥ ८६ ॥
प्राप्त करि सुगतिसाधन समाधिसारास फार अभ्यासें ।

असा कित्येकांना प्रश्न उद्भवेल! याचें उत्तर हेंच कीं, केवळ मान प्रतिष्ठेसाठीं यत्नाचाररहित बेपर्वाईनें हीं कामें केलीं तर शुभकर्मबंध होणार नाहीं. धर्मबुद्धीनें केलें तर अधिक शुभबंध होईल. उक्त कार्यांत आरंभजनित हिंसा घडते परंतु धर्मानुरागपूर्वक बांधल्या जाणाऱ्या शुभबंधाकडे पाहिल्यास लेश-मात्र देखील अधिक जाणवत नाहीं. याशिवाय या कार्यामुळें पापकर्मेंकरून मिळालेला पैसा खर्चिला जाऊन त्यामुळें पुढें उद्भवणाऱ्या विषयकषायादिक सेवनाचें महत्पाप दूर राहतें. म्हणूनच मंदिरप्रतिष्ठादिक कार्यें उत्कृष्ट धर्मकार्यें होत. परंतु धर्मनिमित्त होणाऱ्या यज्ञादिकांत पशुहवनादि जी क्रिया घडते. ती उद्यमी हिंसा असल्यामुळें सर्वथा त्याज्य होय.

१ अतिथिसत्कारार्थ बकरी अथवा बैल यांपैकीं घरीं जें उत्तम असेल त्यास मारण्यांत कांहीं पाप नाहीं असें स्मृतिकाराचें वचन आहे. २ वासना-तर्कणारूपी तलवार.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करणें निजगुरुशीर्षच्छेद, न सध्दर्म इच्छि त्यां शिष्यें ॥ ८७ ॥
शिष्यां विश्वासायां द्राविण तृषित त्याच खारपटिकांतें ।
मानुं नये, दाविति जे झट–घटं–चटकासमान मोक्षातें ॥ ८८ ॥
भोजनार्थ येणाऱ्या सम्मुख मनुजा बुभुक्षु जाणून ।
ना निजघात करावा करुं निजमांसा म्हणून त्या दान ॥ ८९ ॥
नयभंगनिपुणगुरुतें आराधुनि जिनतत्व रहस्यास ।
जाणि असा विमलमती केंविं अहिंसक वरील मोहास ॥ ९० ॥
प्रमादयोगें कांहीं जें कथन असत्य बोलिलें जातें ।
अनृत तयांस म्हणावें परि असती चार भेद ते त्यातें ॥ ९१ ॥

---

१ समाधिस्थ बसलेल्या गुरूचें शिर त्यांचें चांगलें होवो या बुद्धीनें कापणें महामूर्खता होय. समाधींत बसलेला जीव मेल्यानें खात्रीनें सुगतिप्रत जाईल पण गुरुविषयीं एवढी कृतघ्नबुद्धि दाखवून त्यांना मारणारा खरोखरी मूर्ख होय. शुभपरिणामीं रत असणाऱ्या गुरूला प्राणदंड देऊन विनाकारण त्यांचें परिणाम कलुषित बनविणारा त्यांना पापबंध घडवितो, व स्वतःलाही मोठा पापबंध हिंसेमुळें बांधून घेतो. संसारांत याच प्रकारच्या अज्ञानामुळें अनेक जीव पुण्याच्याऐवजीं पापाची कमाई करतात. २ श्रीमत् अमृतचंद्र सूरींच्या समयाला खारपटिक नांवाचें एक धर्ममत भारतवर्षांत प्रचलित होतें. त्यांच्या अनुयायांची मोक्षकल्पना अगदीं विचित्र प्रकारची होती. ते प्रतिपादीत कीं, " एखाद्या घागरीमध्यें चिमणीचीं पोरें बंद करून ठेवावींत आणि मग ती घागर उघडतांच जशीं तीं पोरें भरकन् उडून जातात, तद्वत्च या शरीरांतून एकदां आत्मा सुटला कीं, तो तत्काल मोक्षालाच जातो. मग तो जीव विरागी असो वा नसो त्याचा प्रश्नच उरत नाहीं. शरीरांतून सुटणें म्हणजेच मोक्ष. पण ह्या मताचे अनुयायी भारतवर्षांत आतां दिसून येत नाहींत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वक्षेत्रकालभावें असतां वस्तुहि निषेधितीं[2] जेथें ।
तें प्रथम असत्य गणीं "नाहिं जसा देवदत्त मुळिं तेथें" ॥ ९२ ॥
अन्यचतुष्टयरूपें वस्तूचें जें न रूप तें कथिती ।
जेथें, असत्य दुसरें तें जेविं नसे इथेंच घागर ती ॥ ९३ ॥
स्वैरूपिं वस्तु असोनि कथिली पररूपिं जेथ ती जाते ।
तिसरें असत्य त्यासाचि बोलावें अश्व जेविं बैलातें ॥ ९४ ॥
ज्या वचनाचें अप्रिय गर्हित सावद्य भेद हे तीन ।
सामान्यगुणें होती असत्य चौथाच भेद तो जाण ॥ ९५ ॥
पैशुन्य, हास्य-संयुत, कठोरशा अर्थहीन वडवडीतें ।
दुसऱ्या शास्त्रविरुद्धहि गर्हित म्हटलेंच सर्व वचनातें ॥ ९६ ॥
छेदन भेदन ताडण, कर्षण-वाणिज्ये-आदिचीं वचनें ।
सगळीं तीं सावद्याचि घडती हिंसादि पातकें तेणें ॥ ९७ ॥
भय शोक दुःख भांडण, जेणें वा इतर ताप उद्भवती ।
होते अंरति जनामधिं जाणी सगळी कटूच वचनें ती ॥ ९८ ॥
प्रमत्तयोगच कारण तो हेतू याच सर्व कथनांत ।
कथिला, यास्तव नियमें हिंसा घडते असत्य वचनांत ॥ ९९ ॥

---

१ क्षेत्र-द्रव्य ज्या क्षेत्राला रोकून स्थित होतें तें. काल-द्रव्य ज्या कालांत ज्या स्वरूपानें परिणमतें तो काल. भाव-द्रव्याचा निजभाव आणि द्रव्य-जो पदार्थ ज्या स्वरूपांत स्थित असतो तें द्रव्य होय. २ नाहीं म्हणून सांगितली जातें. ३ आपल्या चतुष्टयांत. ४ दुसऱ्या स्वरूपांत. ५ अवद्य-शब्दाचा अर्थ पाप आहे आणि जें वचन पापयुक्त असतें तें सावद्य होय. ६ दुष्टता. ७ निंद्य. ८ शोषण. ९ व्यापार. १० अप्रीति. ११ नियमानें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रमत्तयोगाचि कथिला हेतू सगळ्यां असत्य वचनांचा ।
परि नच असत्य ठरतो हेयोपादेय बोध गोष्टींचा ॥ १०० ॥
भोगोपभोग साधन त्या पाया त्यागण्यास ना शक्त ।
जे, शेषानृत सगळे त्यांनींहि नित्य सोडणें युक्त ॥ १०१ ॥
कुणी न देतां जाणा प्रमत्तयोगें परिग्रहा ग्रहणें ।
ती चोरि तीच हिंसा कारण वध हेतु खचित असल्यानें ॥१०२॥

---

१ त्याज्य गोष्टींच्या विधानाचें कथन. २ जिचा एक वेळच उपभोग घेतां येतो ती भोग्य वस्तु होय व वारंवार भोगतां येणाऱ्या वस्तूस उपभोग म्हणतात. भोजन, पान, गंधपुष्पादिक, या भोग आणि स्त्री, शय्या, आसन, वस्त्र, अलंकार, वाहन, वगैरे वस्तू उपभोग वस्तू होत. या भोगोपभोग साधनांमुळें नित्य हिंसा घडते. आरंभ हा सारा हिंसामूलक आहे आणि हिंसेशिवाय आरंभ होत नाहीं. म्हणून श्रावकांनीं या हिंसेचा सर्वस्वी त्याग करतां येत नसला तरी भोगोपभोग साधनाला एकत्रित करण्यासाठीं उपयोगांत आणावीं लागणारी कठोर, अप्रिय व अनृत वगैरे बोलणीं, त्यागण्याचा प्रयत्न करावा. २ न देतां धनधान्यादि परिग्रहांना कषायांना वश होऊन घेणें चोरी होय. ती चोरीही हिंसाच होय. कारण हिंसेंत प्राण्याचें प्राण हरण केले जातात तसेंच चोरींतहि प्राणांचें अपहरण केलें जातें. प्राण दोन प्रकारचे आहेत. एक भावप्राण व दुसरा द्रव्यप्राण. आत्म्यांत दुःख उत्पन्न होणें हा भावप्राणाचा घात होय. आणि शरीराच्या अंगउपांगांचा घात तो द्रव्यप्राणघात होय. धनधान्य हें देखील बाह्यप्राण म्हणविले जातात हे चोरून नेल्यामुळें मोही–संसारी जीवाच्या प्राणांवर तीव्र आघात होतो. धनरक्षणार्थ ते आपल्या प्राणाचीहि पर्वा करीत नसतात, आणि म्हणूनच ते हरण झाल्यामुळें त्यांच्या आत्म्यांत अत्यंत दुःख होतें. आत्म्यांत दुःख होणें भावप्राण होय आणि भावप्राण ही हिंसा होय व म्हणूनच चोरी हिंसा ठरते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जो जन ज्याच्या हरितो अर्था त्याचे हरीतसे प्राण ।
कारण धनादि सगळे असति नराचे बहिश्चरंप्राण ॥ १०३ ॥
हिंसेमधिं चोरिमधें अव्याप्ति न, उघड ती असे हिंसा।
बनतो प्रमत्त कारण इतरांचा घेइ तो जरी पैसा ॥ १०४ ॥
आणि प्रमत्तयोगा कारण जे एक मुख्य त्याचाच
तो अभाव झाल्यानें रागद्वेषादिहीन मुनिच्याच ।
चोरीचा संबंधचि नसल्यानें सत्यकर्म वरण्यांत
नातिव्याप्तीच असें मुळिं त्या हिंसेंत आणि चोरींत ॥ १०५ ॥
जलाशयांतुन घेणें जलादि ह्याचा करावया त्याग ।

---

१ धनादिक पदार्थांना. २ बाह्यप्राण. ३ जें लक्षण पदार्थांच्या एकदेशांत व्याप्त असतें अर्थात् दुसऱ्यांत नसतें त्यास अव्याप्ति म्हणतात. हा अव्याप्तिदोष 'यत्र यत्र स्तेयं तत्र तत्र हिंसा' अर्थात् 'जेथें चोरी होते तेथेंहि हिंसा घडतेच' या लक्षणांत येत नाहीं. पण हें लक्षण पदार्थांतच सर्वदेशव्याप्त असतें. कारण प्रमादावांचून चोरी होत नाहीं आणि जेथें प्रमादयोग असतो तेथें हिंसाही घडतेच. ४ अतिव्याप्ति नसणें. 'अदत्तादानं स्तेयं' या सूत्रानुसार न देतां पदार्थ ग्रहण करणें चोरी होय असें ठरतें. सर्वज्ञ वीतराग ज्यावेळेंस द्रव्य-नो-कर्म-वर्गणांचें ग्रहण करतात त्यावेळेंस त्यांना चोरीचा दोष लागावयास पाहिजे. कारण द्रव्यनोकर्मणावर्गणाचें ग्रहण अदत्तादान आहे. आणि उपरिकथित न्यायानें अदत्तादान चोरी आहे. तेव्हां वीतरागदेव चोरीचे भागीदार ठरल्यानें हिंसक ठरतात. परंतु ते हिंसक नाहींत कारण मोहनीय कर्मांचा अभाव असल्यामुळें कर्मवर्गणांचें ग्रहण करण्यास कारण जो प्रमत्तयोग त्याचाहि अभाव असतो, म्हणून अतिव्याप्तीचा दोष त्यांना लागत नाहीं. यथार्थतः, चोरीचें लक्षण 'प्रमत्त-योगात् अदत्तादानं स्तेयं' अर्थात् 'प्रमादयोगानें परद्रव्याचें ग्रहण करणें ती चोरी' हें होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असमर्थ तयें करणें तो सर्व अदत्तवस्तुचा त्याग ॥ १०६ ॥
वेदप्रीत्यों घडतें मैथुन अब्रह्म त्यास जिन वदती ।
हिंसा होते तथें अवश्य बहु जीववध तदा घडती ॥ १०७ ॥
जैं घाण्यांत तिळाच्या जळती तिळ तप्तलोह संगानें ।
योनींत तेविं मरती प्रभूत ते जीव मैथुनाचरणें ॥ १०८ ॥
घडती मदनाद्रेक अनंगरमणादि पातकें जीं जीं ।

---

१ कोणी न देतां घेतल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंचा त्याग. हा त्याग दोन प्रकारचा आहे. एक एकदेशत्याग व दुसरा सर्वथात्याग. याचें वर्णन मागें आलेलेंच आहे. एकदेशत्यागी पुरुषांना तलावाचें पाणी, माती वगैरे अमूल्य पदार्थांचें ग्रहण करण्यांत चोरीचा दोष लागत नाहीं. परंतु तोच सर्वथात्यागी पुरुषाला लागतो. त्यांना त्याचे मालकाचे परवानगीवांचून ते ग्रहण करतां येत नाहीं. २ पुरुष, स्त्री व नपुंसक हे तीन वेद आहेत. वेदकर्म दोन प्रकारचें आहे. एक नामकर्माचा भेद आणि दुसरा चारित्र्यमोहनी-याचा भेद. चारित्रमोहाच्या वेदनामक प्रकृतीच्या उदयामुळें जो राग उत्पन्न होतो, व त्यामुळें स्त्रीपुरुषांचा जो सहवास होतो त्यास अब्रह्म म्हणतात. अब्रह्मांत सर्व ठिकाणीं हिंसेचा सद्भाव असतो. एवढेंच नव्हें तर हिंसेशिवाय अब्रह्म घडतच नाहीं. स्त्रियांच्या—योनि, नाभि, कुच, बगल, आदि ठिकाणांत सम्मूर्छन पंचेंद्रियजीव नेहमीं उत्पन्न होत असतात आणि मैथुन करतांना त्यांच्या द्रव्यप्राणाचा घात अवश्य होतोच हें एक व कामरूप परिणाम झाल्यामुळें स्त्रीपुरुषांच्या भावप्राणांचा घात होतो हें दुसरें आणि त्याचप्रमाणें शरीराच्या शिथिलतादिक निमित्तानें द्रव्यप्राणाचा घात होतो. हें तिसरें. या तीन कारणामुळेंच अब्रह्मांत हिंसा घडते. ३ मिथुनस्यकर्म मैथुनं. ४ कामाच्या उत्कटतेनें. ५ अनंगक्रीडादि—सहवास करण्यायोग्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रागोदय संभवतो हिंसा घडतें म्हणून त्यामाजीं ॥ १०९ ॥
जो नच समर्थ अपुल्या त्यजिण्या मोहें कलत्रमात्रास ।
व्हावें उद्युक्त तयें परास्त्रिसेवन अशेष त्यजिण्यास ॥ ११० ॥
बाह्यपरिग्रह जाणा तो मूर्च्छा हे जया असे नाम ।
मोहोदयिं उद्भवती म्हणनिति मूर्च्छा ममत्व परिणाम ॥ १११ ॥
मूर्च्छा परिग्रहाचें लक्षण म्हणताच व्याप्ति भलिं घटतें ।
सग्रंथ तोच मूर्च्छित ठरतो त्यजि जरि अशेष संगातें ॥ ११२ ॥
हो जरि ऐसें त्याविण बाह्यपरिग्रह ठरे न दुसराही ।

अंगाशिवाय भिन्न अंगांच्या तसेंच तिर्यंचणीच्या द्वारें जी कामक्रीडा केली जाते त्यास अनंगक्रीडा म्हणतात.

१ आपल्या विवाहित स्त्रीमात्राला. २ धनधान्यादिक परिग्रहांना संसारांत परिग्रह म्हणतात. वास्तविक त्याविषयीं ममत्व परिणाम असल्याशिवाय त्यांना परिग्रह म्हणतां येत नाहीं. ध्यानस्थ मुनींच्या जवळ पुष्कळसें द्रव्य ठेवलें तरी तें त्यांचा परिग्रह म्हणविलें जात नाहीं. कारण त्यांच्या मनांत त्याच्याविषयीं ममत्व भावना नसते. म्हणूनच या श्लोकांत मूर्च्छेला परिग्रह म्हटलें आहे. आणि मोहनीय कर्माच्या उदयामुळें होणारा जो ममत्वपरिणाम तोच मूर्च्छा म्हणविला जातो, आणि हेंच परिग्रहाचें यथार्थ लक्षण होय. ३ परिग्रहाच्या भावाचे. ४ जेथें लक्षण असतें तेथेंच लक्ष्य असणें या सहचारी नियमाला व्याप्ति म्हणतात. ५ बाह्यपरिग्रहयुक्त. एखादा पुरुष बाहेरून सर्वस्वी नग्न अर्थात् सर्व प्रकारच्या परिग्रहानें रहित असून जर त्याच्या अंतरांत मूर्च्छेचा सद्भाव असला तर तो परिग्रहीच म्हणविला जाईल कारण ' जेथें जेथें म्हणून मूर्च्छा असते तेथें तेथें अवश्य परिग्रह असतोच असा नियम आहे. आणि परिग्रहाच्या या लक्षणांत अव्याप्तिदोषाचा प्रादुर्भाव असूं शकत नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तें न तसे, कारण तो मूर्च्छेच्या कारणा सदा वाही ॥ ११३ ॥
यापरिच अतिव्याप्ती परिग्रहा जरि असेच तरि नसते ।
कारण मूर्छा नसते कर्मग्रहण्या कषायरहितातें ॥ ११४ ॥
अति संक्षेपें असती त्या अन्तरें-बाह्य भेद हें दोन ।

---

१ 'परिग्रहाचें लक्षण मूर्च्छा ठरवावें तर बाह्य परिग्रहामध्यें परिग्रहत्व सिद्ध होणार नाहीं. कारण मूर्च्छालक्षण अंतरंग परिणामाशींच संबंध ठेवते' अशी शंका घेणाऱ्याला आचार्य या श्लोकांत उत्तर करतात—बाह्य परिग्रहहि मूर्च्छेला निमित्तकारण असल्यामुळें परिग्रह म्हणविला जातो. अर्थात् मूर्च्छा-रूप परिणाम बाह्य परिग्रहाच्या निमित्तानें होतात म्हणून उपचारानें त्यास परिग्रह म्हणतात. व्यक्तीशीं संबंध आल्याशिवाय कोणतीहि स्वतंत्र वस्तु परिग्रह म्हणविली जात नाहीं. जेव्हां ती वस्तु आपलीशी म्हणून मानण्यांत येते तेव्हांच ती परिग्रह म्हणविली जाते. ममत्व असतें तेथेंच परिग्रह असतो असें म्हणतात तें यामुळेंच. २ बाह्य पदार्थांत द्रव्यपरिग्रहत्व मान-ल्यानें अतिव्याप्तिदोषाचा सद्भाव होतो. अर्थात् वीतरागी पुरुषाच्या कार्माण वर्गणाच्या ग्रहणांत द्रव्यपरिग्रहत्व सिद्ध होते.' अशी शंका घेणाऱ्या तर्क-वादीला पुढील उत्तर योग्य होय. 'वीतराग पुरुषांच्या कार्माणवर्गणाग्रहण करण्यांत सर्वस्वी मूर्च्छा नसते; आणि "जेथें मूर्च्छा नसते तेथें परिग्रह नसतो तसेंच जेथें परिग्रह असतो तेथें मूर्च्छा अवश्य असते." याप्रकारें त्याची व्याप्ति घटते. ३ परिग्रह दोन प्रकारचा आहे. अंतर व बाह्य. बाह्यपरिग्रहाचे दोन आणि अंतरङ्गपरिग्रहाचे चौदा भेद आहेत. अंतरङ्गपरिग्रहाचे भेद—मिथ्यात्व; स्त्री, पुरुष, नपुंसक, या वेदाचा राग; हास्यादिक, अर्थात् हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा, हे सहा दोष; क्रोध, मान, माया, लोभ, (अथवा—अनंतानुबंधी, अप्रत्याख्याना-वरणी, प्रत्याख्यानावरणी आणि संज्वलन) हे चार कषायमिळून १४ भेद आहेत. बाह्यपरिग्रहाचे सचित्त आणि अचित्त हे दोन भेद आहेत. सुवर्ण,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पहिल्यातें चवदाही असती दुसऱ्यास भेद परि दोन ॥ ११५ ॥
हास्यादिक दोष सहा मिथ्यात्वहि वेदराग तैसेच ।
चार कषाय मिळोनि अभ्यंतरसंग होति चवदाच ॥ ११६ ॥
सचित्त अचित्त भेदहि हे असति बाह्यपरिग्रहा दोन ।
हिंसेचें उल्लंघन ते करिती सर्व संग हा कधिं न ॥ ११७ ॥
म्हणतात हा अहिंसा त्यागावें त्या परिग्रहां उभय ।
द्विविध--परिग्रह वरण्या हिंसा जैनागमज्ञ आचार्य ॥ ११८ ॥
हिंसापर्यय म्हणुनी सिद्धचि हिंसांऽतरंग--संगांत ।
बहिरंगीं परि मूर्च्छा हिंसत्वा प्राप्त ती करी नियत ॥ ११९ ॥
ह्यापरि विशेष नच हो उंदिररिपुपाडसादिकांमधिं तो ।
नच ऐसे अधिक कमी, मूर्च्छेसम त्याचिया परी होतो ॥१२०॥
हरित तृणांकुरखाती, मूर्च्छा त्या पाडसांत मंद असे ।

मंदिर, वस्त्र वगैरे अचित्त म्हणजे चेतनाहीन पदार्थ होत. पुत्र, कलत्र, दास, दासी, हे सचेतन म्हणजे सचित्त पदार्थ होत.

१ या श्लोकांत बाह्य परिग्रहाच्या ठिकाणीं ममत्व परिणाम असणें ही हिंसा आहे, तर मग अधिक हिंसा करणारे आणि कमी करणारे दोघेहि समसमान पापाचे भागीदार होतील. कारण मांजर जें उंदरांचा परिहार करतें तें देखील त्या उंदरांत प्रेम ठेवतें आणि पाडस कोणाचाहि वध न करतां केवळ तृण खातें त्याचीही त्याचे ठिकाणीं प्रेमभावना असते. ममत्वपरिणाम बाह्यपदार्थांच्या ठिकाणीं दोघांचेही आहेत. तेव्हां दोघेहि समसमान हिंसेचे भागीदार ठरावयास पाहिजेत अशी शंका उत्पन्न केलेली आहे त्याचें उत्तर हें कीं, जर ममत्वपरिणामच हिंसारूप आहेत तर जसे ममत्वपरिणाम असतील तशी तेथें हिंसा घडेलच. उंदराचा परिहार करतांना मांजराचे होणारे परिणाम आणि तृण खातांना होणारे पाडसाचे परिणाम सारखेच असतील असें म्हणतां येणार नाहीं. दोघांच्या ममतेंत अधिकता व हीनता आहे, म्हणूनच दोघांच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उंदुर-निवहे-विनाशक परि मार्जारांत तीव्र तीः भासे ॥ १२१ ॥
जेविं[2] दुग्धखंडाच्या माधुर्यी प्रीतिचा दिसे भेद ।

हिंसेंतही कमीअधिकता असणें स्वभावसिद्ध होय. जसे कमीअधिक ममत्व-परिणाम असतात तशी कमीअधिक हिंसा घडते. विशेष गृद्धता अथवा विशेष लालसा जेथें असते तेथें विशेष मूर्च्छा असते. आणि जेथें कमी असतें तेथे मूर्च्छाही कमी असते. पाडसाला इच्छा होते तेव्हांच तो शांतचित्तानें तृणांकुर खातो; आणि इच्छा सरतांच उठून उभा राहतो. तृण खाण्यांत-त्याचें ममत्वभाव मंद असतात. गवत हें चहूंकडे पसरलें असल्यामुळें तें खाण्यांत त्याच्या ठिकाणीं तीव्र लालसा उत्पन्न होत नाहीं. परंतु मांजर जेव्हां एकाद्या उंदराला पकडतें तेव्हां तें मोठ्या लालसेनें पकडतें. तीव्र कषायानें तें त्याच्यावर झडप घालतें. तसेच परोक्षांतही जोंपर्यंत तो उंदीर दिसत नाहीं तोंपर्यंत सुद्धां त्याची वासना तीव्र राहते. यामुळें त्याच्या ठिकाणीं गृद्धता तर तीव्र असतेच असते पण परिणामही अधिक संक्लेषित झालेले असतात. मूर्च्छेच्या आधारावरच मांजराला तीव्र हिंसा लागतें आणि हरणाला त्याच्या अपेक्षेनें फारच कमी लागते.

१समूह. २मागील २०–२१ श्लोकांचें पुन्हां स्पष्टिकरण करून दाखविण्या-साठीं २२–२३ श्लोकांत दृष्टांतात्मक उदाहरण दिलेलें आहे. त्याचा भावार्थ—जसें कारण असतें त्याचप्रकारचें त्याचेकडून कार्य सिद्ध होतें. आणि ही गोष्ट घटपटादि पदार्थ प्रत्यक्षांत पाहिल्यानें सहज सिद्ध होते. सुतानें वस्त्र, मातीनें मडकें, म्हणजे जसें कारण असतें तसें कार्य होतें. जेथें मूर्च्छेची तीव्रता, तेथें हिंसेची तीव्रता; आणि जेथें मूर्च्छेची मंदता तेथें हिंसेचीही मंदता असतेच ! दुधांत आणि साखरेंत गोडीही आहेच. परंतु मधुरतेच्या कारणांमध्यें भेद असल्यामुळें त्यांच्या कार्यांतही भेद होतो. दुधाच्या मधुर-तेचें कारण दूध; आणि साखरेच्या मधुरतेचें कारण साखर आहे. आणि म्हणूनच या दोघांच्या मधुरतेचें आस्वादन करणाऱ्या मनुष्याच्या रुचींत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कारण विशेषतेनें कार्य विशेषत्व होतसे सिद्ध ॥ १२२ ॥
अल्प-मधुर दुधातची माधुर्य प्रीति मंद ती असते ।
तीच परी तीव्ररुची मधुतमशा शर्करेंत जाणवते ॥ १२३ ॥
तत्वार्थी अश्रद्धा बसण्या मिथ्यात्व कारण प्रथम ।
सम्यग्दर्शन चोरी कषाय करितात चार जे प्रथमं ॥ १२४ ॥

फरक पडतो. याचप्रमाणें वरील उदाहरणांतही समजावयाला पाहिजे. दूध मूलतः कमी गोड असल्यामुळें कमी गोड, आणि साखर अधिक गोड असल्यामुळें अधिक गोड, अशी खाणाऱ्याला लागते. दोहींच्या गोडींत भेद असण्याचें करण त्यांच्या कारणांची भिन्नता होय. याचप्रमाणें जीवाच्या परिणामामध्यें मूर्च्छाधिक्य एवं मूर्च्छामांद्य झाल्यानें क्रमेंकरून परिग्रहाधिक्य आणि परिग्रहाल्पत्व होतें.

१ तत्वार्थाचें श्रद्धान न होणें मिथ्यात्व होय. क्रोध, मान, माया, लोभ हे चार कषाय आहेत. त्या प्रत्येकाचे अनंतानुबंधी, अप्रत्याख्यानी, प्रत्याख्यानी आणि संज्वलन ह्या चार भेदांनीं मिळून एकूण सोळा भेद होतात. त्यांपैकीं पाहिले चार अर्थात् अनंतानुबंधी क्रोध, अनंतानुबंधी माया, अनंतानुबंधी मान, व अनंतानुबंधी लोभ; हे चार सम्यग्दर्शनाची चोरी करणारे होत. यांचा क्षय व उपशम झाल्याशिवाय सम्यग्दर्शन होत नाहीं. अप्रत्याख्यानावरणी क्रोध, मान, माया, लोभ, हे एकदेशचारित्राला (श्रावकव्रताला) बंध घालतात. म्हणूनच त्यांना अप्रत्याख्यानावरणीय म्हणतात. अप्रत्याख्यानावरणीयाचा अर्थ थोडयाशा त्यागाच्या प्रकाशाला बंध घालणारें असा आहे. (अ=ईषत्=थोडा, प्रत्याख्यान=त्याग, आवरण=प्रकाशरोधक).हे चार कषाय सकलसंयमाला रोकतात. ह्यांचा सर्वस्वी नाश झाल्यावरच मुनीपद प्राप्त होतें. संज्वलन संयमाबरोबरच दैदिप्यमान स्थितींत राहतें. संज्वलन, क्रोध, मान, माया, लोभ, त्याचप्रमाणें हास्यादिक सहा दोष; तीन वेद यांच्या नाशानें यथाख्यातचारित्राची प्राप्ति होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुसरें कषाय त्यजुनी देशचरित्रास येति सामोरे ।
कारण कषाय ते नित देशचरित्रास रोकिती सारे ॥ १२५ ॥
म्हणुनी निजशक्तीनें अंतरिचा इतर संग तो सारा ।
त्यागावा निःशेषहि मार्दवशौचादि--भावनेद्वारा ॥ १२६ ॥
बहिरंगाच्या देखिल संङ्गें अनुचित घडे असंयम तो ।
यास्तव अशेष त्यजणें असो सचेतन अचित्त वा मग तो ॥१२७॥
धनधान्यवास्तुवित्ता त्यागाया जो कुणीहि शक्त नसे ।
कृश तें तयेंचि करणें कारण कीं, "त्यागरूप" तत्त्व असे ॥१२८॥
अनिवारित हिंसा ती रात्री भोजेन करीच त्यां घडते ।
हिंसा त्यजणाऱ्यानें म्हणुनी त्यजणेंच रात्र--भुक्तीतें ॥ १२९ ॥

---

१ एकदेशचारित्राला. २ भोजन हें शरीररक्षेसाठीं आवश्यक आहे. दिवसां जेवण निरीक्षणपूर्वक करतां येतें; आणि त्यामुळें पुष्कळशा जीवांची हिंसा घडत नाहीं. रात्री नेत्रेंद्रियाचें तेज कमी होतें. त्यामुळें यत्नाचाराचें पालन होत नाहीं. भोजनाचे चार भेद आहेत. खाद्य, स्वाद्य, लेह्य व पेय. भाकर, भात, पुरी, कचोरी वगैरे खाण्यायोग्य पदार्थ ते खाद्य होत. स्वाद्यामध्यें चूर्ण, तांबूल, सुपारी, वगैरे स्वाद घेण्यायोग्य पदार्थांची गणना होते. राबडी, मलाई, इत्यादि चाटण्यासारखे पदार्थ ते लेह्य; आणि दूध, सरबत, पाणी वगैरेसारखें पिण्यायोग्य पदार्थ ते पेय पदार्थ होत. लाडू, बरफी पेढा, वगैरे मिठाई खाद्यांतच मोडते. हें चार प्रकारचें भोजन रात्री कधींही करूं नये, याचें रात्री भक्षण केल्यानें त्यांत रात्रीला उत्पन्न होणारे हजारों प्रकारचे सूक्ष्म जीव मिसळतात व ते डोळ्याला न दिसल्यामुळें खाण्यांत येतात व त्यामुळें पुष्कळशी हिंसा हातून घडते. कोणत्याच प्रकारचें रात्रीं अन्न भक्षण करूं नये असें शास्त्रकार सांगतात. कित्येक रात्रीला स्वतःसाठीं गरम गरम स्वयंपाक बनवितात त्यामुळें तर हजारों जीवांची हिंसा घडते. या भोजनत्यागाविषयीं अधिक माहिती इतर शास्त्रांतून पाहावी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अतिरागोदय होतां न रात्र--भुक्ती जुमानि हिंसेतें ।
आहार--दिवस रात्री करी त्या हिंसा कशी न संभवते ॥ १३० ॥
जरि ऐसे तरि योग्यचि करणें दिन--भुक्तिचाच परिहार ।
करितां भोजन रात्रीं मग तीं हिंसा न नित्य घडणार ॥ १३१ ॥
तैसे न रजनि-भुक्तीं दिनभुक्तीहून राग बहु असतो ।
जैं मांसकवळभक्षणिं अन्न--कवळ--भक्षणाहुनी बहु तो ॥१३२॥
सूर्यातपाशिवायची भोजक हिंसा कशीहि चुकवील १ ।
भोजनमिश्रित सूक्ष्म प्राण्याची जरि दिवाहि लावील ॥ १३३ ॥
कायावाचामनसा जगिं या जो व्यर्थ सांगणें बहुत ।
भोजन रात्रीं त्यजितो पाळि अहिंसेस सिद्ध हे सतत ॥ १३४ ॥
यापरि आत्महितैषी रत्नत्रयरूपी मुक्ति--मार्गांत ।
झटतात सदा यत्नें ते हो मोक्षास शीघ्र जातात ॥ १३५ ॥
तट रक्षितात जैसें नगरां तैसें व्रतांस जगिं, शील ।

१त्याग. २ शील—तीन गुणव्रतें आणि चार शिक्षाव्रतें या साताला शीलव्रत म्हणतात. यामुळें अनुव्रताची वाढ होते. गुणव्रते तीन आहेत. दिग्विरति, देशविरति, आणि अनर्थदंडविरति. १ दिग्विरति—लोभ आरंभ वगैरे कर्मी करण्याच्या इराद्यानें यावज्जीव अमक्या नदीच्या, गांवांच्या, देशाच्या, पुढें जाणार नाहीं अशी मर्यादा करणें; आणि त्या मर्यादेच्या बाहेर कोणत्याही प्रकारचीं कामें न करणें दिग्विरति होय. २ दिग्विरतीमुळें मर्यादित केलेल्या दिशेतील, गांवांतील कांहीं कालासाठीं, पुन्हां कांहीं गांवांची, दिशेची अन्तर्सीमा करणें देशविरति होय. ३ कारणांशिवाय पापकृत्य करणें, याचा त्याग करणें; अनर्थदंडविरति होय. या पापाचे—१ पापोपदेश, २ हिंसादान, ३ अपध्यान, ४ दुःश्रुति, आणि ५ प्रमादचर्या असे ५ भेद आहेत. १ आपली कोणत्याही प्रकारची कार्यसिद्धि होत नसेल, स्थावर आणि त्रस जीवाची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हिंसा जेणेंकरून होत असेल असल्या संसारवर्धक कार्यांचा उपदेश देणें पापोपदेश होय. २ हिंसेचीं साधनें—जीं चाकू, सुरी, तलवार, कुदळ- तीं देणें हिंसादान होय. ३ दुसऱ्याचे दोष तेवढे ग्रहण करण्याचे भाव, दुस, ऱ्याची संपत्ति लुबाडण्याची इच्छा, परक्याच्या स्त्रीवर वाईट नजर, मनुष्यांत अथवा जनावरांत तंटे लावण्याची व ते पाहाण्याची इच्छा वगैरे प्रकारचे स्वार्थी आत्मघातकी भाव अपध्यान होत. ४ राग, द्वेष, काम, क्रोध, वगैरेंना उत्पन्न करणारीं पुस्तकें वाचणें; गोष्टी ऐकणें दुःश्रुति होय. ५ कारणाशिवाय झाडें तोडणें, जमीन खणणें, आणि हिंसा घडेल अशीं इतर प्रकारचीं दुसरीं कामें करणें प्रमादचर्या होय. या गुणव्रताच्या प्रत्येक भेदाचे पांच पांच अतिचार आहेत ते पुढें अतिचार प्रकरणांत आलेले आहेत. शिक्षाव्रतें— हीं व्रतें चार आहेत. सामायिक, प्रोषधोपवास, भोगोपभोगपरिमाण आणि अतिथिसंविभाग. १ समस्त पापक्रियांनीं रहित होऊन, राग- द्वेषाचा त्याग करून, समताभाव धारण करून, आत्मध्यानांत लीन होणें सामायिक होय. २ महिन्याच्या प्रत्येक पक्षातील अष्टमी व चतुर्दशीला उप- वासाचे आदले दिवशीं दोनप्रहरीं उपवासाचें व्रत धारण करून तें पार- ण्याच्या दिवशीं बारा वाजेपर्यंत म्हणजे सोळा प्रहरपर्यंत सर्व प्रकारच्या आरंभाचा, आहाराचा, आणि कषायाचा त्याग करून पाळणें आणि तो सर्व काळ धर्मध्यानांत, स्वाध्यायांत घालविणें हा प्रोषधोपवास होय. ३ उप- भोग व परिभोगाच्या वस्तूंची मर्यादा करून बाकीच्या सर्व वस्तूंचा त्याग करणें, भोगोपभोग—परिमाण होय. ४ महाव्रती अथवा अणुव्रती श्रावकाला शुद्ध भावानें आहार देणें अतिथिसंविभाग होय. हीं वरील सात शीलेंच व्रताचें रक्षण करितात. व्रतें—अणुव्रतें. अणुव्रताचे अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य, अपरिग्रह (परिग्रहप्रमाण) हे पांच भेद आहेत. १ स्थावर हिंसेचा त्याग नसूनहि त्रस हिंसेचा त्याग करणें ती अहिंसा. २ स्नेह, वैर, मोह, इत्यादिकांना बळी पडून जें खोटें बोलणें त्याचा त्याग करणें तें सत्य. होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्रत पालनार्थ शीलां पाळावें श्रावकें सदा विमल ॥ १३६ ॥
सुविदित देशापासुन करूनिया सर्व बाजुच्या सीमा ।
पूर्वादि दिशेवांचुन जाणें ना, पाळणें अशा नियमा ॥ १३७ ॥
जो नियमित दिग्भागीं राही, सीमेपुढील अघ त्यातें ।
न शिवे सर्व, अहिंसा-व्रत त्याचें पूर्ण यापरी होतें ॥ १३८ ॥
त्यांतहि सीमा करुनी ग्रामापण—कटक—भवन—पेठेची ।
देशव्रत ते वरणें ठरवुन अवधींच कांहिं कालाची ॥ १३९ ॥
विपुल-प्रदेशें—विरतां हो हिंसेचा विशेष परिहार ।
वाढे व्रतांचि अहिंसा विमलमतीचेंच तत्क्षणीं फार ॥ १४० ॥
युद्ध जयाजय चोरी परस्त्रिगमनादि ते कधीं मनिं न ।
आणावेतचि, कारण केवळ अघफळ मिळें तयें म्हणुन ॥ १४१ ॥
विद्या—व्यापार—मषी—कृषि—सेवा—शिल्पं यापरीं जगती
पापोपदेशरूपी देउं नये दान त्या नरास कधीं ॥ १४२ ॥
शिंपडणें पय वृक्षा, दलफल—कुसुमास तोडणें, भेद ।
मेदिनिचा करणें ना कधिं निष्कारण वनस्पतिच्छेद ॥ १४३ ॥
असि—धेनु—विष—हुताशन—धनुष्य—भाला—हलादिकां तेवीं ।

---

३ इतरांची वस्तु न कळत घेणें, ती घेतली असतां दुसऱ्याला त्रास, दुःख होईल असें न करणें—अचौर्य होय. ४ आपल्या परिणित स्त्रीशिवाय इतर सर्व स्त्रियांशीं भोगण्याच्या वासनेचा त्याग करणें तें ब्रह्मचर्य होय. ५ ठराविक वस्तूशिवाय अधिक वस्तु मी संग्रहीं बाळगणार नाहीं असें संसारीक वस्तूंचे परिमाण करणें—अपरिग्रह होय. यालाच परिग्रहप्रमाण व्रत म्हणतात.

१ गांव व बाजार. २ अधिक क्षेत्राचा त्यागी. ३ लेखनकला. ४ शेतकी. ५ नौकरी. ६ कारागिरी. ७ पत्र. ८ भूमीचा. ९ अग्नि.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यत्नें देणें त्यजणें हिंसेचीं साधनें जना–करवीं ॥ १४४ ॥
रागास वाढवीती ज्या, त्या अज्ञानयुक्त दुष्ट कथा ।
कधिं नच ऐकाव्या, वा संग्रहिं घ्याव्या न शिक्षणास वृथा ॥१४५॥
सर्व संकटीं पहिलें अतोषकारीहि सप्त–मायेचें ।
त्यागावें दुरुन अशा द्यूता जें गृह असत्य–चौर्याचें ॥ १४६ ॥
यापरि जो दुसऱ्यांही जाणुनि सोडी अनर्थ–दण्डास ।
तन्निर्दोष अहिंसाव्रत करिते प्राप्त नित्य विजयास ॥ १४७ ॥
रागद्वेषा त्यजुनी अखिल पदार्थीं धरोनि समतेला ।
करणें सामायिक जें हो कारण मूळ तत्त्वलब्धीला ॥ १४८ ॥

---

१ जुगार खेळणारे चोरी करतात व खोटेंही बोलतात. कारण जेव्हां सर्व हरवून बसतात तेव्हां जिंकूं या तृष्णेनें व मोहानें चोरी करतात व खोटेंही बोलतात. आणि जेव्हां जिंकतात तेव्हां द्रव्याच्या प्रचूरतेनें वेश्या गमनादि दुष्कर्में करतात व तें लपविण्यासाठीं खोटेंही बोलतात. सारांश द्यूतक्रीडेमध्यें हिंसा घडते व त्यामुळें पापबंध अधिक होतो. म्हणून हाही एक अनर्थदंड होय. २ श्रावकाचीं जीं बारा व्रतें आहेत, त्यांपैकीं सामायिक हें एक व्रत आहे. सामायिक शब्दाची उत्पत्ति सम्+आयः+इक् या शब्दांपासून झालेली आहे. सम्–एकरूप होऊन; आयः स्वरूपांमध्यें गमन तें समाय, आणि समाय हेंच ज्याचें प्रयोजन तें सामायिक. समयाची सिध्दि साम्यभावानें होते. म्हणून साम्यभावास सामायिक म्हणतात. स्वतःला दुःख देणाऱ्या इष्टानिष्टवस्तूंमध्यें समताभाव असणें तो साम्यभाव. साम्यभाव मनांत उत्पन्न झाल्यानंतर स्व-स्वरूपांत निमग्न राहणें, योग्य व कर्तव्यस्वरूपी आहे. कदाचित् लीन राहतां येत नसेल तर शुभोपभोगरूप भक्तींत, तत्वविचार करण्यांत अथवा सामायिकासंबंधीं नमस्कार, आवर्त्त, शिरोनति, वगैरे क्रिया करण्यांत तत्पर राहवें. अष्टांगें जमिनीला टेकवून मस्तक नम्र करणें याला नमस्कार, हात जोडून आपल्या मस्तकापुढें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सायंकाळिं पहांटें निश्चलमनसा अवश्य करणें तें ।
करितां इतर समयिं हो दोषी नच परि गुणीच कीं ठरतें ॥१४९॥
सामायिक करणारा समस्तसावद्ययोग सोडुनि तो ।
चारित्र मोह असला उदयांत तरी महोव्रती ठरतो ॥ १५० ॥
प्रतिदिवस घेतलेल्या दृढ सामयिकव्रतास करण्यास ।

तीन वेळां फिरणें यांस आवर्त, आणि हात जोडून मस्तक नमविणें ह्याला शिरोनति म्हणतात. प्रथम ईर्यापथ पाहून, तीन आवर्त करून एक शिरोनति करावी. नंतर नमो अरहंताणं वगैरे पाठ म्हणून तीन आवर्त व एक शिरोनति करावी. यानंतर कायोत्सर्ग करून तीन आवर्त व एक शिरोनति करावी. तदुपरांत ' थोस्सामि ' इत्यादि पाठ म्हणून पुरा करावा व नंतर एक नमस्कार, तीन आवर्त व एक शिरोनति करावी. मग कालाचें प्रमाण ठरवून साम्यभावांसहित शुभोपयोगांत व शुद्धोपयोगांत लीन राहावें. आणि याच क्रियेला सामायिक म्हणतात. सामायिकामुळें प्राप्त होणाऱ्या आनंदानें स्वस्वरूपानंदाची सहज प्राप्ति होते. गृहस्थाला दोन वेळेस सामायिक करण्याची शास्त्राज्ञा आहे. एक सकाळीं व एक संध्याकाळीं. सामायिकासाठीं योग्य काल, योग्य आसन, योग्य विनय, मनवचनकाय यांची शुध्दि या सात गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. ह्याशिवाय मनुष्याचे भाव निर्मल आणि स्थिर बनूं शकत नाहींत.

१ सामायिक. २ ज्यामुळें हिंसादिक पापाचा एकदेश त्याग होतो त्यास अणुव्रत आणि सर्वथात्याग होतो त्यास महाव्रत म्हणतात, आणि हें व्रत धारण करणारा तो महाव्रती होय. सामायिकाच्या वेळीं सर्वस्वी पापक्रियेची निवृत्ति होते. जरी श्रावकाच्या प्रत्याख्यानावरणीय चारित्रमोहनीयकर्मांचा उदय असतो तरी सामायिकाचे वेळीं, ' समस्तसावद्य योगपरिहारात् ' महाव्रतीच असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चारी पर्व तिथींच्या दिवशीं करणें अवश्य उपवास ॥ १५१ ॥
उपवासाच्या पाहिल्या दिवशीं आरंभमुक्त होवोनी ।
उपवासास धरावें मध्याह्नीं, तनु ममत्व तें त्यजुनी ॥ १५२ ॥
निर्जनदेशीं जाउन, सोडुन सावद्ययोग संपूर्ण ।
स्थित मनवचनें कायें व्हावें, सर्वेंद्रियेंार्थ मोडून ॥ १५३ ॥
सांध्य-विधीतें करुनी धर्मध्यानीं व्यतीत दिन करुन ।
पूर्ण करी स्वाध्यायें शुद्धासनिं रात्र सर्व जागून ॥ १५४ ॥
नंतर उठुनि सकाळीं तात्कालिक सर्व सत्क्रिया करुनी ।

---

१ या उपवासाला प्रोषध उपवास म्हणतात. प्रत्येक महिन्याच्या दोन पक्षांतील अष्टमीचतुर्दशीला हा करावयाचा असतो. एकूण महिन्यांत चार वेळेला उपवास पडतो. प्रोषध याचा अर्थ पर्व होय. आणि पर्वांत धारण केलेला उपवास तो प्रोषधोपवास होय. प्रोषध याचा एक वेळ भोजन करणें हा एक, आणि एक वेळां जेवून उपवास धारण करणें हा दुसरा अर्थ होय. पण येथील अर्थ प्रोषधपूर्वक उपवास तो प्रोषधोपवास हा आहे. अष्टमी-चतुर्दशीचा उपवास धारण केल्यास सप्तमी तसेंच त्रयोदशीला एकवेळ जेवण करावें लागतें. व तसेंच त्याचें पारणें नवमी व चतुर्दशीच्या पुढें येणाऱ्या दिवशींही बारा वाजतां अनुक्रमें करावें लागतें. चार प्रकारच्या आहारांचा त्याग करणें याचेंच नांव उपवास होय. उपवासाचा सर्व दिवस धर्मध्यानांत घालवावा लागतो. सर्व प्रकारच्या भोगोपभोग्य पदार्थांचा त्याग करावा लागतो. पुढें श्लोकांतून याचें विवेचन केलेलें आहेच तें पाहाणें. २ एकांत स्थळांत. पूर्वीच्या काळीं गांवाबाहेर धर्मात्मे लोक मुनीलोकांना उतरण्यासाठीं, सामायिक करण्यासाठीं, एक पर्णकुटी बांधून देत असत. तिला वाटिका म्हणत. कांहीं कांहीं ठिकाणीं ही वाटिका अजूनही पहाण्यांत येते. ३ संपूर्ण इंद्रियाचे विषय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्रव्यें प्रासुक करणें पूजन शास्त्राप्रतीच अनुसरुनी ॥ १५५ ॥
यापरि विधिनें दिवसा व्यतीत करुनी द्वितीय रात्रीला ।
यत्नें व्यतित करावें तसेंच अर्ध्या तृतीय दिवसाला ॥ १५६ ॥
सावद्यमुक्त होउन सोळा प्रहरास यापरी व्यतित ।
करि, पूर्ण अहिंसेचें व्रत हो त्याचेंच तेधवां नियत ॥ १५७ ॥

---

१ 'सुक्कं पक्कं तत्तं अंबिललवणेण मिस्सियं दव्वं । जं जंतेण य छिण्णं तं सव्वं फासुयं भणियं ॥ जें सुकलेलें, परिपक्क झालेलें, आम्लरस तसेंच लवणमिश्रित असलेलें, चाकू, सुरी, वगैरे यंत्रांनीं छिन्नभिन्न केलेलें, शोधित केलेलें तें सगळें द्रव्य प्रासुक होय. २ सप्तमीला एक वेळ भोजन करून दोन प्रहरांनंतर प्रोषधोपवासास आरंभ केला जातो; तेव्हां सप्तमीच्या अर्ध्या दिवसाचे दोन प्रहर, सप्तमीच्या रात्रीचे चार प्रहर, अष्टमीच्या संबंध दिवसाचे चार प्रहर, अष्टमीच्या रात्रीचे चार प्रहर, आणि नवमीच्या दोन प्रहरपर्यंतचे दोन प्रहर असे सोळा प्रहर होतात. सोळा प्रहरांचाच उपवास उत्कृष्ट प्रोषधोपवास म्हणविला जातो. बारा प्रहरांचा तो मध्यम; आणि आठ प्रहरांचा तो जघन्य प्रोषधोपवास होय. अष्टमीच्या दिवसरात्रीचे मिळून आठ प्रहर जघन्य प्रोषधोपवास पाळला जातो. पर्वाच्या दिवशीं प्रोषधोपवास करण्यास असमर्थ असणारानें अनुपवास धारण करावा. पाणी घेण्याशिवाय इतर सर्व प्रकारच्या भोजनाचा त्याग करणें अनुपवास होय. अनुपवासालाही असमर्थ असणारानें विकाररहित, सात्विक कोरडें हलकें अन्न खावें. हें विकारी भोजन चार प्रकारचें आहे. गोरस, इक्षुरस, फलरस आणि धान्यरस. दूध, दही, तूप हे गोरस; साखर, गूळ, इत्यादि मिष्ट पदार्थ इक्षुरस; दाळिंब, आंबे वगैरे फलापासून निघणारा तो फलरस, आणि तेल इत्यादि पदार्थ ते धान्यरस होत. यांच्या भक्षणानें तृष्णा वाढते; म्हणून भात वगैरेसारख्या पदार्थांचें भोजन करावें. ३ निश्चयपूर्वक.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घडते स्थावर–हिंसा त्याच्या भोगोपभोग–हेतूनें ।
परि ना लेशहि घडते, त्याग तयाचा अशेप केल्यानें ॥ १५८ ॥
वाग्गुप्ती त्या, म्हणुन न वितथ; स्तेय न अदत्त त्यागें ते ।
ब्रह्मं, रतं–त्यागानें; निर्ममताही न संग देहातें ॥ १५९ ॥
यापरि महाव्रती तो त्यजितां हिंसा समस्त उपचारें ।
ठरतो, संयम–पद नच पावे चारित्रमोह उदयें रे ! ॥ १६० ॥
भोगोपभोग यांनीं देशव्रतिची घडे, न दुसऱ्यानें ।
हिंसा, पदार्थरूपा जाणुनि त्यातें स्वशक्तिनें त्यजणें ॥ १६१ ॥
एकास मारणारा नाश करितसे अनेक जीवांचा ।

---

१ अणुव्रती त्रसहिंसेचा त्यागी असतो. भोगोपभोगाची सामग्री संग्रहीं ठेवतो त्यामुळें त्याचे हातून आरंभ अधिक घडतो. आणि आरंभ असतो तेथें हिंसा घडते. ती हिंसा स्थावरहिंसा होय. भोगोपभोग वस्तूचा परिमाण केल्यानें स्थावर-हिंसाही सुटते. त्रस आणि स्थावरहिंसेचा त्याग झाल्यानें हिंसा लेशमात्रही घडत नाहीं. प्रोषधोपवासी भोग, उपभोग इत्यादि सर्व प्रकारच्या आरंभाचा त्याग करतो. धर्मारंभच केवळ त्याच्या हातून घडतो. भोगोपभोगमूलक स्थावर–हिंसा त्यामुळें घडत नाहीं. म्हणूनच तो पूर्ण अहिंसाव्रती ठरतो. २ वचनगुप्ति. ३ खोटें भाषण. ४ ब्रम्हचर्य. ५ मैथुनत्यागानें. प्रोषधोपवासी पुरुषाचीं शास्त्रादिक वचनांत प्रवृत्ति झाल्यानें त्याचेकडून खोटें भाषण होत नाहीं. सर्व प्रकारच्या परपदार्थग्रहणाचा त्याग केल्यामुळें चोरी संभवत नाहीं. स्वस्त्रीचाही तो त्याग करतो म्हणून त्याचें ब्रह्मचर्य पूर्ण पाळलें जातें. स्वशरीरावर प्रेमच करीत नसल्यामुळें, परपदार्थांचा परिग्रह करण्याची त्याला इच्छा होत नाहीं. याप्रकारें योग्य विधिनुसार प्रोषधोपवास करणाराला पंचपापांपैकीं एकही पाप शिवत नाहीं. ६ व्यवहारनयानें. ७ प्रमत्तगुणस्थान.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ह्यास्तव अवश्य करणें त्याग समस्तांचि अनंतकांयाचा ॥ १६२॥
त्यजणें बहु जीवांचें जें योनिस्थान त्याहि लोण्यातें[२] ।

---

१ वनस्पतीचे साधारण–वनस्पति व प्रत्येक–वनस्पति असे दोन भेद आहेत. ज्याच्या एका शरीरांत अनेक जीव आढळून येतात, त्यास साधारण वनस्पति आणि एका जीवांत एकच जीव आढळून येतो, त्यास प्रत्येक वनस्पति म्हणतात. प्रत्येक वनस्पतीचे देखील सप्रतिष्ठित व अप्रतिष्ठित असे दोन भेद आहेत. साधारण वनस्पति तोडतां क्षणींच सारखी तुटते. पण प्रत्येक वनस्पति सारखी तुटत नाहीं, तोडल्यास मागेंपुढें तुटते. कंदमूल हें सर्वसाधारण होत. वृक्षाची साल जोंपर्यंत पूर्णपणें हिरवी असते तोंपर्यंत ती साधारण असते. तीच पोकळ झाल्यानंतर प्रत्येक होते. प्रत्येक वनस्पति जेव्हां निगोदयुक्त असते तेव्हां सप्रतिष्ठित आणि निगोदरहित असते तेव्हां अप्रतिष्ठित म्हणविली जाते. वेल, लहानमोठे वृक्ष आणि कंदमूलादिक फळें अथवा अशा वनस्पति कीं, ज्यांत लांब लांब रेषा, गांठी, सांधे दृग्गोचर होत नाहींत व ही कापल्यानंतर ज्यांत तंतू नसतात ती सप्रतिष्ठ होय आणि याच्या विरुद्ध ती अप्रतिष्ठित होय. उपर्युक्त सप्रतिष्ठित व प्रत्येक वनस्पतीला सुद्धां साधारण वनस्पति म्हणतात. आणि या साधारण वनस्पतींत अनेक जीव आढळून येतात. ह्मणूनच त्यांना अनंतकाय म्हणतात. २ लोणी काढतां क्षणीं जर विस्तवावर ठेवण्यात आलें नाहीं तर तेंच लोणी दोन मुहूर्तानंतर अनंत जीवरूप होतें. अर्थात् त्यांत अपरिमित जीव उत्पन्न होतात. व्रती श्रावकांना तें घेणेंहि त्याज्य आहे आजकाल पुष्कळ दिवसांचें लोणी संग्रहित करून त्याचें तूप बनवितात. पण त्या लोण्यांत अनंत-निगोदराशी उत्पन्न तर होतेच होते. पण त्रस–जीवांचाही त्यांत संचार होतो. यास्तव श्रावकांनीं मर्यादेचे बाहेर बनविलेलें तूप खाऊं नये. याशिवाय जे पदार्थ पिंडरूपानें शुद्ध असतात पण जें शरीराला अपाय करतात–रुग्ण बनवितात ते कधींही भक्षण करूं नयेत. ज्वराक्रांताला दही दिल्यानें ज्वर वाढण्याचा संभव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहारशुद्धतेचें कथिलें कांहीं विरुद्ध तरिही तें ॥ १६३ ॥
अविरुद्धं–भोगद्देखिल, बघून निजशक्ति कोविदें त्यजणें ।
सोडवें न तरि सीमा करणें तद्दिन विशेषभोग्यानें ॥ १६४ ॥
पूर्वींच्या सीमेमधिं तात्कालिक निज बघून शक्तीस ।
पुनरपि अंतर-सीमा करणेंहि योग्य होई प्रतिदिवस ॥ १६५ ॥

असतो, म्हणून ज्वरांत दही खाणें निषिद्ध होय. तद्वत्‌च जे जे पदार्थ अनिष्ट म्हणून आहेत त्यांचा त्यांचा त्याग करावा. भोगोपभोगपरिमाणव्रतीकाला भोग्योपभोग्य पदार्थांची शुद्धता, इष्टानिष्टता इत्यादिकांचा विचार करून ग्रहण करावयास पाहिजे. अशुद्ध, अनिष्ट, अनुपसेव्य, तसेंच शुद्ध पण आवश्यक नसतील अशा पदार्थांचा त्याग करावयाला पाहिजे.

१ आपल्या पदस्थाच्या विरुद्ध सर्व बाह्य पदार्थांचा भोग तो अविरुद्ध भोग होय. त्याचा त्याग अवश्य केला पाहिजे. सर्वस्वी त्यागतां येत नसेल तर त्याची मर्यादा करावी. हा त्याग दोन प्रकारचा आहे. एक यमरूप व दुसरा नियमरूप. एखाद्या पदार्थाच्या यावज्जीव त्यागाला यम आणि दिन, रात्र, मास, अयन, वर्ष इत्यादिकांची मर्यादा करून त्यागणें याला नियम म्हणतात. भोगोपभोगाला अयोग्य असणाऱ्या वस्तूंचा त्याग यावज्जीव केला जातो अर्थात् यमरूप केला जातो. पण भोग्य वस्तूंचा त्याग शक्ति असेल तरच करतां येतो म्हणून तो आपल्या शक्त्यनुसार करणें योग्य. शक्तिप्रमाणें त्यजिण्यासाठीं ही मर्यादा ठरविणें भाग असतें. २ शाहण्या पुरुषानें. ३ त्याची दिवस, रात्र यांच्या उपभोग्यतेनें. ४ त्या वेळेच्या. ५ सीमेंत पुन्हां सीमा करणें. प्रथम केलेल्या भोगोपभोगाच्या मर्यादेंत आपल्या शक्तीप्रमाणें पुनः मर्यादा करणें आणि त्याचें यथाशक्ति पालन करणें आपलें कर्तव्य होय. गृहस्थ जो नियम प्रतिदिवस घेतात त्यास अन्तरसीमावर्ती नियम म्हणतात. पुढील नियम गृहस्थानें निरंतर ग्रहण केला पाहिजे. ' भोजने षट्रसे पाने कुङ्कुमादिविलेपने । पुष्पताम्बूलगीतेषु नृत्यादौ ब्रह्मचर्यके ॥ स्नानभूषण-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यापरि परिमितें-भोगें जो आनंदें त्यजीहि बहु भोग ।
ठरते श्रेष्ठ अहिंसा करितां हिंसा बहू तयें त्याग ॥ १६६ ॥
विधिनें दातृ-गुणवतें अर्पावा देयें वस्तुचा भाग ।
निजपरकल्याणास्तव नग्ने मुनीशास निश्चयें सांग ॥ १६७ ॥
उच्चासनीं बसविणें घेणें घरिं आदरेंहि अतिथीस ।
पादक्षालन करणें अर्चाद्रव्येंच पूजणें त्यास ॥
मनवचनकाय यांची शुद्धी करणें तशीच अन्नाची ।
असल्या विधितें म्हणती नवधा-भक्तीच आर्यगण साची ॥१६८॥
ऐहिक-फलाभिलाषा कपटासूया न अक्षमा चित्तीं ।
हर्षभावाऽहंकृति खेद न हे सप्त दातृ-गुण असती ॥ १८९ ॥
रागद्वेष-असंयम-मद-दुःख-भयादिकां न उत्पन्न ।
करि, तें देण्यायोग्याचि सुतपस्वाध्यायवृद्धिकरअन्न ॥ १७० ॥

वस्त्रादौ वाहने शयनासने । सचित्तवस्तुसंख्यादौ प्रमाणं भज प्रत्यहं ॥ २ ॥

१ मर्यादित भोगांनीं. २ दात्याचे गुण अंगीं असणाऱ्या गृहस्थानें. ३ देण्यायोग्य. ४ निर्ग्रंथ. परिग्रह नसणारा. ५ यथाविधी. अन्न हें नवधा भक्तीनेंच मुनी लोकांना द्यावें लागतें. ती पुढील श्लोकांतच दिली आहे. ६ ऐहिक फलाची अपेक्षारहितता, निष्कपटता, क्षमा, ईर्षारहितता, अखिन्नभाव, हर्षभाव आणि निरभिमानता, हें सात दात्यांचे गुण आहेत. या गुणांविरहित जो, तो दाता नव्हे. दात्याच्या ठिकाणीं यांपैकीं एखादा जरी गुण कमी असेल तरी त्या दानापासून मिळणाऱ्या फळांत तदनुकूल कमीपणा येतो. ७ दान ग्रहण करणाऱ्याच्या ठिकाणीं राग, द्वेष उत्पन्न होतील, संयम पाळण्यांत कठीणता येईल असें अन्न देणें योग्य नाहीं. ऋतु मास यांचा विचार करूनच त्यांना अन्न द्यावयास पाहिजे. साधूला कोणत्याहि प्रकारची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मोक्षाकारण जे गुण, युक्त तयें असति पात्र जे तीन ।
अविरंत सम्यग्दष्टी देशव्रति तें महाव्रती जाण ।। १७१ ।।
कारण ह्या दानामधिं हिंसेचा भेद लोभ तन्नाश ।
होतो, हिंसानाशक म्हणुनी म्हटलें सुपात्र–दानास ।। १७२ ।।

बाधा न होईल असें अन्न द्यावयास पाहिजे. स्वाध्याय, तपाला सहाय देणारें, बदाम, दूध, उसाचा रस, तूप, भात, वेलदोडे वगैरे सात्विक अन्नच देणें योग्य. रागद्वेषांना उत्पन्न करणारें मंदिर, हत्ती, घोडे, सोनें, चांदी, शस्त्रादि पदार्थ तसेच कामोद्दीपनादि विकार उत्पन्न करणारे स्त्रीवादित्रादि पदार्थ दान देण्यास योग्य नाहींत. या वस्तूंचें दान दिल्यानें दाता स्वतः पापबंध लावून घेतो आणि घेणारालाही तज्जनित पापाचा भागीदार बनवितो–बनतो. म्हणूनच विकारभावांना रोधक; तपश्चरणादि क्रियांना वृद्धिंगत करणारें अन्न देणें योग्य. क्षुधानिवारण होण्यासाठीं आहारदान, रोगशमनार्थ औषध-दान, अज्ञाननिरसनार्थ शास्त्रदान आणि भयहरणार्थ अभयदान या चार प्रकारें जें युक्त तें दान देणें योग्य.

३ सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र ही रत्नत्रयी ज्यानें आत्म्यांत प्रगट केली–तो पात्र होय. उत्तम, मध्यम आणि जघन्य हे तीन पात्रभेद आहेत. रत्नत्रयगुणांनीं युक्त असे आचार्य, उपाध्याय आणि सर्व साधु ते उत्तम पात्र होत. ज्यांचें आत्म्यांत सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि एकदेशचारित्र असतें ते पंचगुणस्थानवर्ती श्रावक मध्यमपात्र होत. व्रतरहित सम्यग्दृष्टि जघन्यपात्र होत. देवगुरुशास्त्रांवर श्रद्धा ठेवतात, जिनमार्गाविरुद्ध अक्षर बोलत नाहींत, अष्टमूलगुणांचे जे धारक असतात ते अविरतसम्यग्दृष्टि होत. आणि हेच जघन्यपात्र होत. दान हें पात्रापात्राचा विचार करूनच द्यावयाचें असतें. या पात्र–भेदांला योग्य जाणून दान देणें योग्य. पात्रा-विषयीं अधिक माहिती शास्त्रांतून पाहवी. विरताविरत तो देशव्रती आणि सकलविरति तो महाव्रती होय. हे तीन पात्र, दान देण्यास योग्य होत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इतरां त्रास न देतां जो मधुकरवृत्तिनें घरीं येई ।
श्रावक कसा न लोभी ? त्या गुणे अतिथीस अन्न ना देई ॥ १७३॥
अपुल्यास्तव केलेलें देतो जो अन्न मुनिस भक्तीनें ।
अरति–विषाद–त्यागी ठरे अहिंसक विलोभ नियमानें ॥ १७४॥

सल्लेखनाधर्म.

मद्धर्मधना मजसह नेण्या ही एकटी असे शक्त ।
हे भावुनि चिंतविणें पश्चिम–सल्लेखनेस नित युक्त ॥ १७५ ॥

---

१ अप्रेम. दुःखरहित. २ निर्लोभ. ३ मरणान्त-सल्लेखना. मरण दोन प्रकारचें असतें. एक नित्यमरण व दुसरें तद्भवमरण. आयुश्वासोच्छ्वासादिक दहा प्राणांचा जो वेळोवेळीं वियोग होतो तें नित्यमरण आणि ग्रहितपर्यायाच्या नाशाला अथवा जन्मनाशाला तद्भवमरण अथवा मरणान्त म्हणतात. ह्या मरणान्त समयांत सल्लेखनेचे चिंतवन करावयास हवें. सल्लेखनाः—सत्-सम्यक्प्रकारानें, लेखना-कायकषायांना कृश करणें, सल्लेखना होय. ही अभ्यंतर आणि बाह्य ह्या दोन प्रकारची आहे. कायेला कृश करणें बाह्य आणि आन्तरिक क्रोधादिक कषायांना कृश करणें याला अभ्यंतर म्हणतात. सल्लेखनाचें चिंतवन पुढीलप्रमाणें करावयास पाहिजे “ ह्या मानव लोकांत अणुव्रतरूपी उद्योगधंदा करून जें धर्मधन मीं मिळविलें आहे त्याला परलोकरूपी देशान्तरास घेऊन जाण्यास सल्लेखना हीच एकटी आधार आहे. म्हणून तिचें धारण मरणान्त कालीं केलेंच पाहिजे. अशी भावना केल्यानें आत्मा ममत्व टाकण्यास समर्थ होतो. भावनेनें आत्मा व्रताचरण करण्यास दृढ बनतो. परंतु सल्लेखनेंत संसारिक स्वार्थाचें लक्ष्य ठेवू नये. स्वार्थ हा निदानबंध बांधणारा असतो. निदानबंधाचें फल अतिशय थोडें तसेंच आत्मघातकी असतें. म्हणूनच कोणत्याहि प्रकारची भावना न धरतां धर्मभक्तिपुरस्सर शुद्धपरिणामानें ती वरली असतां त्याचें उत्तम फळ मिळतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मरतांना आवश्यहि विधिनें सल्लेखनेस मी वरिन ।
व्रत पाळावें प्रथमचि मरणाच्या, भावना अशी करुन ॥ १७६ ॥

क्षीण कषाय कराया वरुं या सल्लेखनेस मरणांत ।
येणाऱ्या, रागाविण वागे तत् आत्मघात ना होत ॥ १७७ ॥

---

१ आयुष्याचा क्षय होत आहे असें जाणून समस्त परिग्रहाचें तसेंच कुटुंबियांचें ममत्व सोडावें. शरीरावरील वस्त्र दूर करावें. आपल्या शरीरावरीलही ममत्व टाकावें. आहाराचा त्याग करावा. सर्वस्वी आहाराचा त्याग करितां येत नसेल तर खाद्यपदार्थ त्यागून पेयपदार्थ घ्यावेत. तेंही पुढें क्रमाक्रमानें सोडून फक्त गरम पाणी घ्यावें. नंतर तेंही सोडून निराहारवृत्ति धारण करावी. कोणाशींही प्रेम करूं नये. शत्रुत्व धरूं नये. परंतु सर्वांना जवळ बोलवून त्यांची क्षमा मागावी आणि आपणही त्यांना क्षमा करावी. ह्या प्रकारें चित्त कषायरहित करून शेवटीं पंचनमस्कारमंत्राचा जप करीत करीत सावधानी ठेवीत ठेवीत शरीरत्याग करावा. ही सल्लेखनेची संक्षिप्त विधी होय. ह्या विधानुसार मी मरणान्त सल्लेखना धारण करीन अशी निरन्तर भावना ठेवणारा मनुष्यच सल्लेखनेची वेळ न येतां देखील सल्लेखनाव्रताचा पालक समजला जातो. २ सल्लेखना करणारा आत्मघातकी कसा नव्हे ? अशी शंका कित्येकांना येईल. पण तो आत्मघातकी ठरत नाहीं कारण तो मरणेच्छा करीत नाहीं किन्तु मरण आलें असतां तो आपल्या कषायांना कृश करून निजपरिणामाची विशुद्धि करतो. मरण आलें असें जेव्हां त्याला समजतें तेव्हां परिग्रहाचें, कुटुंबाचें ममत्व टाकतो, व शुद्धात्मस्वरूपाचें चिंतवन करण्यांत निमग्न होतो. आत्मघातकी विशुद्ध परिणामी असतात काय ? रागद्वेषादिभावांनीं प्रेरित होऊन ते आत्मघात करून घेतात. परंतु सल्लेखनेंत ही गोष्ट नसते आणि म्हणूनच सल्लेखना आत्मघात ठरत नाहीं. मग आत्मघात म्हणजे काय ? हें पुढें उघड रीतीनेंच सांगितलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होवोनि वश कषायां कुंभक–जल–अग्नि–गरल–शस्त्रांनीं ।
स्वप्राणा हरि त्याचा तो सत्यचि आत्म–घात हो जाणी ॥ १७८ ॥
हिंसेचें कारण जें तें जैं केले कषाय कृश जाती ।
सिद्ध्यर्थ अहिंसेच्या मुनिवर सल्लेखनेस तैं कथिती ॥ १७९ ॥
ऐसें व्रत पाळाया सतत सेवितो समस्त शीलांस ।
मोक्षश्री त्या वरितें स्वेच्छें वरि जेविं कन्यका पतिस ॥ १८० ॥
सम्यक्त्व–व्रत–शीलां जे होती पांच पांच हो मिळुनी ।
अन्वर्थ, शुद्धिबाधक सत्तर अतिचार हेयं तें म्हणुनी ॥ १८१ ॥
ग्लानी कांक्षा शंका अन्यदृष्टिची स्तुतीहि मनसाच ।
करणें तशी प्रशंसा अतिचार सुदर्शनांत हे पांच ॥ १८२ ॥

---

१ श्वासनिरोध. २ सल्लेखनामरण याची सुद्धां गणना शीलांतच होते. शीलपालनानें व्रताची उत्तम प्रकारें रक्षा होते.

३ ' अतिक्रमो मानसशुद्धिहानिर्व्यतिक्रमो यो विषयाभिलाषा ।
तथातिचारं करणालसत्वं भङ्गो ह्यनाचारमिह व्रतानां ॥ ' सागरधर्मामृत.
व्रताचें अतिक्रम करण्याच्या इच्छेनें मनःशुद्धि मलिन करणें अतिक्रम, विषयाभिलाषेनें मालिन्य आणणें व्यतिक्रम होय. या व्रताच्या चारित्रांत आळस अर्थात् शिथिलता येणें अतिचार आणि सर्वस्वी व्रतभंग होणें याला अनाचार म्हणतात. सागरधर्मामृताच्या ह्या वचनावरून व्रतांत, चारित्रांत किंचित् मात्र शिथिलता येणें अतिचार होय हें स्पष्ट होय. एकूण अतिचार सत्तर आहेत. सम्यग्दर्शनाचें पांच, पांच अणुव्रताचे प्रत्येकीं पांच पांच मिळून २५, दिग्व्रतादि सात शीलांचें प्रत्येकीं ५ पांच मिळून ३५, सल्लेखनेचें ५ असे मिळून एकंदर ७० अतिचार होतात. हें सगळें पुढें क्रमानें काव्यांतून स्पष्ट रीतीनें सांगितलेलें आहेत. हे अतिचार टाळून व्रतपालन करावें लागतें.
४ त्यागण्यायोग्य. ५ विचिकित्सा. ६ मिथ्यादृष्टी जीवाची.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

छेदन, भेदन, ताडण, भारारोपण तसेंच बहु करणें ।
हें पंच अहिंसेचे समयीं पाणी न अन्न वा देणें ॥ १८३ ॥
मिथ्योपदेश करणें, गुज-गोष्टी वा असत्य लेखन तें ।
न्यासापहारवचना करणें साकार-मंत्र-भेदातें ॥ १८४ ॥
मोलाच्या वस्तुंमध्यें हलक्या विकणेंच वस्तु मिसळून ।
चोरास साह्य देणें करणें तद्वस्तुचें तसें ग्रहण ।
राजाज्ञा उल्लंघन करणें कमि अधिक वजनमापाही ।
ह्या चौर्यत्यागाचें असती अतिचार पांच हे पाहीं ॥ १८५ ॥
करणें काम-क्रीडा अंगाहुनि योग्य साच अतिरिक्त ।
अंगांनीं, बाळगणें, मानसिं तशि कामवासना-सक्त ।
वारस्त्रीपरदारा कुमारिका बालिकेशिं सहवास ।
करणें ब्रह्मव्रतीं ह्या असती पंचातिचार हे खास ॥ १८६ ॥
धनधान्य-शेत चांदी-गो-वृष-घर-हेम-दासदासीची ।
रेशमि आणिक साध्या वस्त्रांच्या तेविं दोन भेदांची ।
मर्यादा ती करुनी लंघन करणें तदीय परिमाणा
परिमितपरिग्रहाचे असती अतिचार पांच हें जाणा ॥ १८७ ॥
केलेल्या मर्यादा उल्लंघुनि खोल वांकडे उंच
जाणें तें लोभवशें करणें क्षेत्र-प्रमाण-वृद्धीच ।

---

१ एकान्तांत झालेल्या दुसऱ्यांच्या गोष्टी करणें, सांगणें. २ एकाद्यानें ठेवलेली वस्तू अथवा रक्कम, त्याच्या ध्यानांत न राहिल्यामुळें कमी मागितल्यास कमी देणें. म्हणजे दुसऱ्याच्या ठेवीचें अपहरण करणें न्यासापहार होय. ३ अंगविक्षेपानें दुसऱ्याचें अंगित जाणून प्रकट करणें. हे सत्याणुव्रताचे अतिचार होत. ४ अस्तेयव्रताचें. ५ वेश्या, व्यभिचारिणी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केलेली, विस्मरणें मर्यादा वा तदीय तैशीच ।
अतिचार दिग्व्रताचें कथिलें असतीच जाण हें पांच ॥ १८८ ॥

ठरल्या मर्यादेच्या पाठविणें सेवकाप्रती पुढती ।
ऐकविणें शब्दातें आणविणें तेथुनीहि वस्तू ती ।
रूपाप्रति दाखविणें पुद्गल वस्तूंस फेंकणें साच
देशावकाशिकाचें असती अतिचार हे असे पांच ॥ १८९ ॥

वदणें कामुक-वचना हांसुन, करणें अयुक्त चेष्टेस ।
कायेनें; वाढविणें अधिकाचि भोगोपभोग वस्तूंस ।
वाष्कळ बडबड करणें अविचारें कार्य तेवि बहु साच ।
हेतूंवाचुन करणें अनर्थदण्डातिचार हें पांच ॥ १९० ॥

मनिं संकल्प विकल्पा धरणें, म्हणणें अशुद्ध पाठांस
ताव्यांत वचन नसणें देणें ते चलनवलन देहांस ।
म्हणतांना विस्मरणें मुळीं अनादर तयांस तैसाच
दाखविणें, अतिचारचि असती सामायिकांस हें पांच ॥ १९१ ॥

नच पाहुनि वा शोधुनि घेणें पूजन-पदार्थ उपयोगा
मलमूत्र टाकणें वा अंथरणें झाडिल्याविना जागा ।
दाखविणें आदर ना विस्मरणें तद्विधी-विधानास
अतिचार पांच असलें असती त्या प्रोषधोपवासास ॥ १९२ ॥

भोजन सचित्त करणें अचित्त वस्तुंत सचित्त मेळविणें
संबद्ध सचित्ताशीं पदार्थ ऐसा-अचित्त तो खाणें ।
पौष्टिक अन्न खाणें तेवीं दुष्पक्व[1]-वस्तुला साच

---

१ कष्टानें शिजविला जाणारा आहार, तो दुष्पकाहार.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भोगोपभोग याचें असती अतिचार हे असे पांच ॥ १९३ ॥
दुसऱ्यांस दान देण्या कथणें, कामा स्वयेंचि गुंतून
अन्ना सचित्तवस्तूंमधिं घालुन ठेवणेंहि झांकून ।
कालातिक्रम करणें, करणें ईर्षा तसाहि अपमान
अतिथिसंविभागव्रतिं, असती अतिचार पांच हे जाण ॥ १९४ ॥
मरणेच्छा पीडेनें, धरणें आशा तशी जगायाची
आठव सन्मित्राचा करणें वा स्मृति सुखानुबंधाची ।
भावी सद्भोगाचें तेविं बांधणें निदान मनिं साच
सल्लेखनाव्रताचें असती अतिचार हे असे पांच ॥ १९५ ॥
त्यजितो विचार करुनी या अतिचारां तशाच दुसऱ्यांहीं
निर्मलसम्यक्त्वव्रत–शीलें तो शीघ्र जाइ मोक्षाही ॥ १९६ ॥

सकलचारित्र.

चारित्रांन्तर्वर्ती तप तें मोक्षांग आगमीं कथिलें ।

---

१ चारित्राचे अन्तवर्ती. २ दर्शन, ज्ञान आणि चारित्र या रत्न त्रयींनें युक्त असा हा मोक्षमार्ग आहे, आणि चारित्राचा विशिष्ट भेद तप आहे म्हणूनच तें मोक्षांग ठरतें. तपश्चरण करण्याला दोन गोष्टींची जरूरी असते. एक आपली शक्ति आणि दुसरी मनाचा वशीभूतपणा. आपल्या शक्ति लपवून आपले हातून तप होत नाहीं म्हणणारानें तप आंगिकार करणें असंभव आहे. शिवाय मन वशीभूत नसतांनाही तें अङ्गीकार करण्याची इच्छा होईल तर तें कधींही बनणें नाहीं. कारण " इच्छानिरोधस्तपः " असें तपाचें लक्षण आहे. ह्या तपाचें अन्तरंग आणि बाह्य असें दोन भेद आहेत. जें नित्य-नैमित्तिक क्रियेच्या द्वारें इच्छेला रोकून साध्य केलें जातें आणि जें दुसऱ्याला प्रत्यक्ष प्रतिभासित होतें तें बाह्यतप होय. जें अन्तरंग मनाच्या निग्रहानें साध्य केलें जातें आणि दुसऱ्याला प्रत्यक्षांत दिसत नाहीं तें अंत-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वशक्तिला नच लपविति जे निग्रहिं त्यास सेवणेंहि भलें ॥१९७॥
कायक्लेश उनोदर विविक्तशय्यासनहि रसत्याग ।
वृत्तिपरीसंख्या हें अनशन तप बाह्य सेवण्या योग्य ॥ १९८ ॥
वैयावृत्त्य विनयता स्वाध्याय ध्यान आणि उत्सर्ग ।
प्रायश्चित्त असे मग सेव्य असा अंतरंग–तप–वर्ग ॥ १९९ ॥

रंग तप होय. बाह्य तपः—बाह्यतपाचें अनशन, अवमोदर्य अर्थात् उनोदर, विविक्तशय्यासन, रसपरित्याग, कायक्लेश आणि वृत्तिपरिसंख्या हें सहा भेद आहेत. १ खाद्य, स्वाद्य, लेह्य, पेय, ह्या चार प्रकारच्या आहारांचा त्याग करणें अनशन. २ भुकेपेक्षां कमी आहार घेणें उनोदर. ३ विषयी, कामी जीव संचार करीत नाहींत अशा निरुपद्रवी एकांत स्थळांत निजणें, वसणें, विविक्तशय्यासन. ४ दही, दूध, घृत, तेल, मिष्टान्न व लवण ह्या सहा रसांचा त्याग करणें रसपरित्याग. ५ शरीराला परीषह देऊन पीडा सहन करणें काय-क्लेश, आणि ६ अमुक तऱ्हेनें आहार मिळाला तर मी भोजन करीन अशी भावना भावून आहार घेणें वृत्तिपरिसंख्या होय.

१ अन्तरंगतपाचें विनय, वैयावृत्त्य, प्रायश्चित्त, उत्सर्ग, स्वाध्याय आणि ध्यान हें सहा भेद आहेत. आदरभाव असणें तो विनय. हा विनय दोन प्रकारचा आहे. एक मुख्यविनय व दुसरा उपचारविनय. सम्यग्दर्शन, ज्ञान व चारित्र हें आपल्या कल्याणाचें मार्ग आहेत म्हणून त्यांना आदरानें वरणें मुख्य विनय आणि ह्या रत्नत्रयाला धारण करणाऱ्या श्रीवीतरागभगवानांना आदरपूर्वक नमस्कार करणें, भक्तिप्रेरित होऊन परोक्ष रूपांत देखील तीर्थ-क्षेत्रादिकांची वंदना करणें उपचारविनय होय. धर्मात्म्याची सेवाचाकरी करणें वैयावृत्त्य, प्रमादामुळें एखादा दोष घडला तर तो निवारण्यासाठीं—त्याचे क्षालनार्थ—एखाद्या दण्डाचें अवलम्बन करणें प्रायश्चित्त होय. धनधान्यादिक बाह्य आणि क्रोधकामादिक अंतरंग परिग्रहाचें ममत्व न ठेवणें, त्यांचा अहं-कार न बाळगणें उत्सर्ग होय. सत्शास्त्रांना वाचणें, त्यांचा अभ्यास करणें,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथिला जिनागमीं जो मुनीश्वराचा असेच आचार ।
वरणें योग्य करोनी निजशक्तीपदार्थिचाच सुविचार ॥ २०० ॥
समता–प्रत्याख्यानस्तवप्रतिक्रमण वंदना तेवीं ।
कायोत्सर्ग सहांही असली आवश्यकेंच पाळावी ॥ २०१ ॥

उपदेश देणें व तें दुसऱ्यांकडून वाचून घेणें, ऐकणें, ऐकविणें याला स्वाध्याय म्हणतात. सर्व प्रकारची काळजी बाजूस सारून, उपाधीचा त्याग करून एकाच वस्तूचें, एकाच धर्मांचें चिंतवन करणें ध्यान होय.

१ समता, स्तव, वंदना, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान आणि कायोत्सर्ग हीं सहा आवश्यकें होत. १ समता आणि सामायिक हें दोन्हीं पर्यायवाचक शब्द आहेत. साम्यभाव ठेवणें याचें नांव समता व सामायिक आहे. नाम, स्थापना, द्रव्य, भाव, क्षेत्र आणि काल ह्या सहा भेदांनीं साम्यभाव धारण करतां येतो. शुभ, अशुभ नांवें ऐकून रागद्वेष न करणें नामसामायिक होय. एखाद्या स्थापन केलेल्या पदार्थांची सुंदरता अथवा विकृतस्वरूपता पाहून रागद्वेष न करणें स्थापनासामायिक होय. सुवर्ण असो, माती असो त्या दोघांनाही सारखें मानणें द्रव्यसामायिक होय. सुंदर अथवा कांटेरी बाग–जमीन ह्यांना पाहून दोन्हीं सम मानणें क्षेत्रसमता होय. थंडी असो, गरमी असो अथवा सुंदर हवा असो तद्विषयीं प्रेम अथवा द्वेष न करणें कालसामायिक आणि समस्त जीवांशीं मित्रत्व ठेवणें, कोणाचाही द्वेष न करणें, भावसामायिक होय. २ तीर्थंकरांच्या गुणांचें गान करणें स्तव होय. हें स्तवन दोन प्रकारचें आहे. एक व्यवहारस्तवन व दुसरें निश्चयस्तवन. व्यवहारस्तवनाचें नाम, स्थापना, द्रव्य, क्षेत्र, काल, हें पांच भेद आहेत. चोवीस तीर्थंकरांच्या नामाचा १००८ वेळा उच्चार करणें तें नामस्तवन; चोवीस तीर्थंकरांच्या मूर्ती स्थापून त्याची आराधना करणें तें स्थापनास्तवन होय. हे भगवन्! आपण शुभलक्षणी आहांत, आपलीं बैल, गज, अश्व, वानर हीं चिन्हें आहेत; आपण घामरहित आहांत इत्यादि प्रकारें स्तुति करणें तें द्रव्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्तवन होय. चोवीसतीर्थंकर ज्या ज्या ठिकाणीं फिरले, दीक्षा घेतली त्या त्या स्थानाचें वर्णन करणें क्षेत्रस्तवन होय. तीर्थंकरांच्या समयाचें वर्णन करणें तें कालस्तवन होय. ३ वंदना—परमपूज्य सिद्ध, वगैरे पंचपरमेष्ठींना नमस्कार करणें, त्यांच्या नांवाचा घोष करणें वंदना होय. नाम, स्थापना, द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, हे सहा त्याचें भेद आहेत. पंचपरमेष्ठींचें नामोच्चारण करणें नामवंदना; पूजा, स्तुति करणें स्थापनावंदना; त्यांच्या शरीराची स्तुती करणें द्रव्यवंदना; कल्याणभूमींची स्तुति करणें क्षेत्रवंदना होय. कल्याणकालाचें स्तवन ती कालवंदना होय. त्यांच्या गुणांचें स्तवन ती भाववंदना होय. ४ प्रतिक्रमण आपण केलेल्या पापांची आलोचना करणें, निंदा करणें अर्थात् त्या पापांना आलोचनादि पश्चात्तापानें दूर करणें प्रतिक्रमण होय. प्रतिक्रमण हें सात वेळेस केलें जातें. दिवसभर केलेल्या पापाचें तें पहिलें दैवसिक, रात्रभर केलेल्या पापाचें तें दुसरें रात्रिक, तिसरें पाक्षिक, चातुर्मासिक तें चवथें, पांचवें तें सावंत्सरिक, ईर्यापाथिक तें सहावें, आणि औत्तमार्थ तें सातवें असे त्याचे सात प्रकार आहेत. याचेंही द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, नामस्थापना या सहा भेदेंकरून सहा भेद होतात. ५ प्रत्याख्यान-त्याग भावानें पुढील कालासंबंधीं आस्रवाला रोकणें प्रत्याख्यान होय. नामादिकामुळें होणारें पाप त्याला रोकणें नामप्रत्याख्यान होय. पापाला कारणीभूत होणारें नाम, स्वतः न घेणें, दुसऱ्याकडून न घेवविणें आणि घेतात त्यांना अनुमोदन न देणें नामप्रत्याख्यान होय. पापबंधाला कारणीभूत तसेच मिथ्यात्वप्रवर्तक असे जें मिथ्यादेव त्याची स्वतः स्थापना न करणें, दुसऱ्याकडून न करविणें व करणाराला अनुमोदन न देणें स्थापनाप्रत्याख्यान होय. तपाला बाध आणणारें तें कृतकारितानुमोदनेंकरून न करणें द्रव्यप्रत्याख्यान होय. असंयमभाव उत्पन्न होणाऱ्या क्षेत्राची कृतकारितानुमोदनेंकरून प्रशंसा न करणें, न करविणें क्षेत्रप्रत्याख्यान होय. जेव्हां असंयमभाव होतो ती वेळ सोडणें, सोडविणें, सोडणाराची प्रशंसा करणें कालप्रत्याख्यान होय. मनवचनकायेनें तसेंच कृतकारितानुमोदनानें मिथ्यात्वादि दुर्भावांचा त्याग करणें भावप्रत्याख्यान होय. ६. कायोत्सर्ग व व्युत्सर्ग

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सम्यग्दण्ड मनाचा तो सम्यग्दण्ड तेविं वचनाचा ।
कायेचा, जाणावा सत्य त्रयभेद हाच गुप्तीचा ॥ २०२ ॥
ईर्य्या सम्यक् सम्यग्भाषा, उत्सर्ग एषणा याच ।
असती समिती ऐशा ग्रहनिक्षेपासहीत त्या पांच ॥ २०३ ॥

हे पर्यायवाचक शब्द आहेत. देहाचा त्याग करून अर्थात् पाषाणमूर्ती समान निश्चल, निष्कंप होऊन सामायिकांत स्थिर होणें कायोत्सर्ग होय. हेंही द्रव्य, नाम,स्थापनादिकेंकरून सहा प्रकारचें आहेत. यांची माहिती शास्त्रांतून पहावी. ह्या सहा क्रियेची श्रावकांना अत्यंत आवश्यकता असते. म्हणून याला षट् आवश्यक–क्रिया हें नांव दिलें आहे.

१ " सम्यग्योगनिग्रहो गुप्तिः " ख्याति, लाभ, पूजा इत्यादिकांच्या वांछेशिवाय मनवचनकायेच्या स्वेच्छाचारांना रोकणें गुप्ती होय. ह्यांना साधारणतः मनगुप्ति, वचनगुप्ति, आणि कायगुप्ति म्हणतात. २ समिती– आपल्या शरीरामुळें इतर जीवांना त्रास न होईल अशी भावना बाळगून यत्नपूर्वक मनवचनकायेची प्रवृत्ति बनविणें समिती होय. कर्मास्रवाला बंध घाल-ण्याचें काम त्यागी मुनीच करूं शकतात. त्यांची सावधपणाची क्रिया कर्मास्रवाला बंध घालण्यालाच सहकारी कारण बनतें आणि यालाच समिती म्हणतात. समितीचे भेद पांच आहेत. १ ईर्य्यासमिती, भाषासमिती, एषणासमिती, आदाननिक्षेपण–समिती (ग्रहनिक्षेपसमिती) आणि ५ उत्सर्गसमिती. ह्या मुनींना व श्रावकांनाही पाळाव्या लागतात. १ रात्रीं न चालणें, मनुष्य-प्राणी ज्या रस्त्यांनीं जातात त्यांवरून न चालणें, सावकाश पुढें पाहून चालणें, चालतांना आजूबाजूस पाहणें अर्थात् कोणत्याही प्रकारची हिंसा न घडेल अशा सावधगिरीनें चालणें ईर्य्यासमिती होय. २ शास्त्र, पिंछी, कमंडलु इत्यादि ज्या वस्तूं मुनीजवळ असतात त्यांना नीट पाहून, पिंछीनें झाडून, इतर जीवांची हिंसा न घडेल अशा तऱ्हेनें उचलणें, आदाननिक्षेपणसमिती होय. ३ हितकारी, प्रामाणिक संदेहरहित प्रियवचन बोलणें भाषासमिती होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मार्दव आर्जव संयम तप शौच क्षान्ति आणि तो त्याग ।
सत्य ब्रह्म अकिंचन हा हो देश–धर्म सेवण्या योग्य ॥ २०४ ॥
अध्रुव अशरण आस्रव अशुची वृष, जन्म, लोक अन्यत्व ।
बोधी–दुर्लभ संवर भावावी निर्जराहि एकत्व ॥ २०५ ॥

---

४ योग्य प्रकारचा आहार घेणें एषणा होय आणि ५ जीवांची हिंसा न घडेल अशा स्वच्छ जीवरहित जागेंत मलमूत्र टाकणें उत्सर्गसमिती होय. जीवरहित अशी जागा कोणतीच नसते. प्रत्येक जागा जीवमय आहे. तरीपण स्थूलदृष्टीला दिसणाऱ्या जीवांना बाजूस सारून अथवा ते नसतील अशी जागा पाहून मलमूत्र टाकावें.

१ धर्म,—उत्तम क्षमा, उत्तम मार्दव, उत्तम आर्जव, सत्य, शौच, संयम, ब्रह्मचर्य, त्याग, तप, उत्तम आकिंचन हे दहा धर्म होत. क्रोधादि कषायामुळें मनाचे परिणाम कलुषित न करणें क्षमा; जात्यादि अष्टमदाला न वरणें मार्दव; माया अर्थात् कपट न करणें आर्जव; यथार्थ बोलणें—सांगणें सत्य; अन्तःकरणांतून लोभ गृद्धितेला कमी करणें, बाह्य शरीर पवित्र ठेवणें शौच; परिग्रह कमी करणें, शरीरादिकावर प्रेम—ममत्व न करणें आकिंचन; कर्माचा क्षय करण्यासाठीं अनशनादि उपायांनीं इच्छेला बंध घालणें तप; दयार्द्र अंतःकरणानें जीवाला ज्ञान, आहार वगैरे प्रकारचें दान देणें त्याग; इंद्रियांना वश करून घेणें, त्रसस्थावर जीवाची रक्षा करणें संयम; आणि आपल्या शुद्धात्म्यांत तल्लीन होणें, स्त्री-पुरुष संभोगाचा त्याग करणें ब्रह्मचर्य होय. २ अनुप्रेक्षावी. ३ भावना यांस अनुप्रेक्षाही म्हणतात. ह्या भावना बारा आहेत. ह्यामुळेंच संवर घडतो. १ अध्रुव, २ अशरण, ३ संसार, ४ एकत्व, ५ अन्यत्व, ६ अशुचि, ७ आस्रव, ८ संवर, ९ निर्जरा, १० लोक, ११ बोधीदुर्लभ आणि १२ धर्म. १ अध्रुवभावना—याला अनित्य—भावना असेंही दुसरें नांव आहे. धन, धान्य, घर, घोडा, वगैरे जगांतील सगळ्या वस्तू नश्वर आहेत, कोणतीही स्थिर राहणारी नाहीं, आपल्या स्वभावानुसारच सर्व वस्तूंचें पर्यायांतर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होत असतें असा विचार करणें, चिंतवन करणें अध्रुवभावना होय. २ जगांत शरण जाण्याला कोणीही योग्य नाहीं. कर्मांच्या फळांपासून कोणीही वांचविणारा नाहीं. राजा, महाराजा, भाऊ, आई, बाप, हे मरणापासून देखील वांचविणारे नाहींत असें चिंतविणें अशरणभावना होय. ३ संसार यालाच जन्म म्हणतात. संसार म्हणजे संसरण अर्थात् चक्रासम फिरणें. हा जीव पंचपरावर्तनरूप संसारांत (द्रव्य, भाव, क्षेत्र, काल, आणि भाव हीं पांच परावर्तनें होत) नानाप्रकारच्या कुयोनींतून भटकत असतो. कर्मांमुळें तो कधीं स्वर्गांत, तर कधीं नरकांत, तर कधीं महादुःखमय अशा निगोदादिक योनींमध्यें जाऊन जन्मतो. घाण्याच्या बैलप्रमाणें तो सारखा फिरत असतो. तो कधीं बाप तर कधीं मुलगा होतो. कधीं सेवक तर कधीं स्त्री वगैरे नाना प्रकारचे देह धारण करून जगांत नाना रीतींनें संबोधिला जातो. त्यानें आजपर्यंत किती तरी वेळां आणि कोणकोणतीं पर्यायरूपें धारण केलीं असतील ह्याची मोजदादच नाहीं. ह्या संसारांत कोणत्याही प्रकारचें सुख नाहीं, वगैरे भावनांचें चिंतवन करणें संसार (जन्म) भावना होय. ४ हा जीव नेहमींचा एकटा आहे. परमार्थदृष्टीनें त्याचें कोणीही इष्टमित्र नाहींत. हा जसा ज्या स्थितींत एकटा आला तसाच जाणारा आहे. हा एकटाच बाल, तरुण, म्हातारा होतो. यालाच जगांतील सर्व सुख दुःखें वेठावी लागतात. त्याचा कोणीही भागीदार होत नाहीं. जगांतल्या पदार्थांतूनही त्याचे बरोबर कोणीही जाणारें येणारें नाहीं. एखाद्या वाटसरूस साथ करणारा रस्ता दुसऱ्या वाटसरूसही जसा साथ करतो तद्वतच या जगांतल्या साऱ्या वस्तू साथीदार आहेत. रस्त्यांत भेटलेले वाटसरू जसें एकमेकांना सोडून आपआपले ठिकाणीं निघून जातात त्याचप्रमाणें जगांतल्या सर्व वस्तूंचें आहे. हा जीव खरोखरीच एकटा आहे वगैरे भावना भावणें एकत्वभावना होय. ५ या शरीराचा आणि माझा जरी अनादीकालपासून संबंध जोडलेला आहे तरीही मी वेगळा व तो वेगळा आहे. तो माझा कोणी नव्हे व मीही त्याचा कोणी नव्हे. मी अतींद्रिय तर तो इंद्रियमय, तो जड तर मी चैतन्यमय, तो अनित्य तर मी नित्य,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तो आदीअंतसंयुक्त तर मी अनाद्यनंत ह्याप्रमाणें त्याचा आणि माझा परस्पर विरोधी संबंध आहे. सारांश, शरीर आणि मी सर्वथा भिन्न आहोंत. आणि म्हणूनच जगांतलें आप्त, इष्ट ते कोणी माझे नव्हेत वगैरे चिंतवन करणें अन्यत्व– भावना होय. ६ हें शरीर अत्यंत घाणेरडें, अपवित्र वस्तूंनीं भरलेलें, बिभत्सयुक्त आहे. मातापित्याच्या मलरूपी रजापासून त्याची उत्पत्ति होतें. त्याच्या संसर्गमात्रानें पवित्र सुगंधित पदार्थ देखील अपवित्र आणि दुर्गंधयुक्त बनतात. मल, मांस, हाड, चामडी, मूत्र वगैरेसारख्या अपवित्र वस्तूंचें तें आगर आहे. ज्याप्रमाणें मलनिर्मित घागर धुतल्यावरही पवित्र बनूं शकत नाहीं त्याचप्रमाणें हे दुर्गंधमलयुक्त शरीर कितीही विलेपनादि पदार्थ लावून स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला तरी तें शुद्ध होत नाहीं. संसारांत जर कोणी याला पवित्र करणारें असेल तर तेवढें सम्यग्दर्शनच आहे अशी भावना भावणें अशुचीभावना होय. ७ पांच प्रकारचें मिथ्यात्व, (एकान्तमिथ्यात्व, विपरीतमिथ्यात्व, विनयमिथ्यात्व, संशयमिथ्यात्व, आणि अज्ञानमिथ्यात्व) बारा अव्रतें, (पांच इंद्रियजन्य, एक मनोजन्य असंयम आणि सहा कायेच्या जीवाची अदया) पंचवीस कषाय, (अनन्तानुबन्धी क्रोध, मान, माया, लोभ; अप्रत्याख्यानावरणी क्रोध मान, माया, लोभ; प्रत्याख्यानी क्रोध, मान, माया, लोभ; आणि संज्वलन क्रोध, मान माया, लोभ हे १६ कषाय आणि हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा, स्त्री, पुरुष, नपुंसक हे ९ नोकषाय मिळून २५ कषाय होतात) आणि पंधरा योग (सत्यमनोयोग, असत्यमनोयोग, उभयमनोयोग, अनुभयमनोयोग, सत्यवचनयोग, असत्यवचनयोग, उभयवचनयोग, अनुभयवचनयोग, औदारिककाययोग, मिश्रकाययोग, वैक्रियिककाययोग, वैक्रियिकमिश्रकाययोग, आहारकयोग, आहारकमिश्रकाययोग, कार्माणकाययोग) ह्या प्रकारच्या ५७ द्वारांनीं जीवांच्या शुभाशुभकर्माचें येणें आस्रव होय. हा आस्रव शुभ आणि अशुभ ह्या दोन प्रकारचा आहे. शुभयोगजन्य कर्मांच्या आस्रवाला शुभास्रव आणि अशुभजन्य कर्मास्रवाला अशुभास्रव म्हणतात. आस्रवामुळें बंध होतो आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हाच बंध संसाराला कारणीभूत होतो. ह्यासाठीं मुमुक्षुलोकांनीं त्यापासून दूर राहावयास पाहिजे, असें आस्रवस्वरूपाचें चिंतवन करणें आस्रवभावना होय. ८ " आस्रवनिरोधः संवरः " अर्थात् कर्मास्रवाला रोकणें संवर होय. ह्या संवरांना कारणीभूत अशीं पांच महाव्रतें, पांच समिती, तीन गुप्ती, दशलाक्षणिक धर्म, द्वादशानुप्रेक्षा आणि बावीस परीषह यांचें चिंतवन करणें संवरभावना होय. ९ पूर्वसंचित कर्मसमूहाचें उदयांत येऊन तात्काळ नाहींसें होणें निर्जरा होय. ही निर्जरा दोन प्रकारची आहे. एक सविपाक व दुसरी अविपाक निर्जरा. पूर्वसंचित कर्मांची स्थिति पूर्ण होऊन त्याचें फळ देऊन स्वतःच निर्जर होणें सविपाक निर्जरा होय. तपश्चर्यापरीषहविजयादीच्या सहाय्यानें कर्मांची स्थिति पूर्ण झाल्याशिवाय त्याचें निर्जर होणें अविपाकनिर्जरा होय. आंब्याचें फळ, वृक्षावर वेळ येतांच पिकणें तें सविपाकनिर्जरेचें आणि घरीं आणून त्यास अढींत घालून तें पिकविणें हें अविपाक निर्जरेचें उदाहरण होय. सविपाकनिर्जरा संपूर्ण जीवाची असते परंतु अविपाकनिर्जरा (हिचेही शुभानुबंधी आणि निरनुबंधी असे दोन भेद आहेत.) सम्यग्दृष्टी सत्पुरुषांची त्याचप्रमाणें व्रतीकलोकांची असते. ह्या निर्जरेच्या स्वरूपाचें चिंतवन ती निर्जराभावना होय. १० अधोलोक, मध्यलोक, उर्ध्वलोक हे तीन प्रकारचे लोक आहेत. अधोलोकांत नरक आहेत. नरकाच्या रत्नप्रभा, शर्कराप्रभा, वालुकाप्रभा, पंकप्रभा, धुमप्रभा, तमप्रभा आणि महात्तमप्रभा ह्या सात पृथव्या आहेत. ह्या अनुक्रमें एकमेकांच्या खालीं आहेत. नरकाच्या खालच्या भागांत निगोदादि पंचस्थावर जीव राहतात. रत्नप्रभेचे खर, पंक आणि अब्बहुल हे तीन भेद आहेत. खरभागांत सात प्रकारचें व्यंतर, पंकांत असुर आणि अब्बहुलांत नारकी जीव राहतात. नरकारंभ अब्बहुलपासूनच होतो. मध्यलोकांत मनुष्य, तिर्यंच, राहणारी पृथ्वी; सूर्य, शशी, नक्षत्रादि असतात. उर्ध्वलोकांत एकावर एक असे १६ स्वर्ग आहेत. सौधर्म, ईशान्य, सनत्कुमार, माहेंद्र, ब्रह्म, ब्रम्होत्तर, लांतव, कापिष्ट, शुक्र, महाशुक्र, शतार, सहस्रार, आनत, प्राणत, आरण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उष्ण क्षुधा हिम तृषा अलाभ नग्नत्व याचना अरति ।
आक्रोश अंग-अशुची मशकादिक-दंश रोग दुःख अती ॥२०६॥
वध अदर्शन निषद्या तृणादिकस्पर्श रति तशी शय्या ।
सत्कार-पुरस्कार प्रज्ञा अज्ञान आणि ती चर्य्या ॥ २०७ ॥
हें जे बाविसे परिषह सहणें संवेगयुक्त-मनुजानें ।

आणि अच्युत हे सोळा स्वर्ग होत. याचेही वर अनुदिशपटल आहे. अनुदिशपटला वर पांच अनुत्तरपटल आहेत. यांत देवांची वस्ती असते. ह्याचेवर शेवटीं मोक्ष-शिला आहे. हे किती मोठे आहेत, यांत कोणकोणतीं स्थानें आहेत, त्यांच्या कशा कशा रचना आहेत वगैरे तद्संबंधीं गोष्टींची भावना भावणें लोकभावना होय. ११ बोधिदुर्लभ-भावना-ह्या घोर दुःखरूप संसाराच्या निगोदराशींतून निघून त्रस जन्म मिळणें दुर्लभ होय. त्रसजन्म जरी अतिप्रयत्नांतीं मिळाला तरी पंचेंद्रियी होणें-महासागरांत पडलेल्या हिरकणीच्या प्राप्तीतुल्यच अती कठीण आहे. पचेंद्रियांत मानव होणें, मानवपणांत उत्तम कुल, देश, परिस्थिति, संपत्ती, उत्तम आरोग्य वगैरे सद् साधनें प्राप्त होणें अत्यंत कठीण. अन्ततोगत्वा परम अहिंसाधर्म, धर्मांत उत्तमश्रद्धा, गृहस्थधर्म, श्रावक--धर्म, यतिधर्म तसेच समाधीमरण मिळणेंहि अतिशय दुर्लभ होय. ह्या प्रकारें रत्नत्रय रत्नाची भावना भावण्याला बोधीदुर्लभभावना म्हणतात. १२ धर्मभावनाः--हा सर्वज्ञ-प्रणितधर्म अहिंसालक्षणयुक्त आहे. सत्य, शौच, ब्रह्मचर्यादि हीं त्याचीं अंगें आहेत. त्याच्या अप्राप्तीमुळें हा जीव अनादि संसारांत परिभ्रमण करीत आहे, पापाच्या विपाकामुळें दुःखी बनलेला आहे. परंतु त्यास धर्म प्राप्त झाल्यावर अनेक संसारिक भोग भोगून देखील मुक्ती--सुखाची कास धरतां येते, हें चिंतविणें धर्मभावना होय.

१ परीषह-परीषह बावीस आहेत. त्यांना जिंकणें मुनि लोकांचें परम कर्तव्य होय. हे परीषह-उपसर्ग-सहन केल्यानें मुनीना आपल्या मार्गांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निश्चल राहून एका क्षणांत कर्मांची निर्जरा करतां येते. परीग्रह—जयाशिवाय चित्त स्थिर होत नाहीं. चित्त स्थिरावल्याशिवाय ध्यानावस्थित होतां येत नाहीं, आणि जोंपर्यंत ध्यानावस्थित होता येत नाहीं तोंपर्यंत कर्मं दग्ध होत नाहींत. कर्मे दग्ध झाल्याशिवाय मोक्षप्राप्ति होत नाहीं. एवढ्याचसाठीं मोक्षाभिलाषी आणि संसारदुःखांनीं गांजलेल्या--भयभीत झालेल्या मुनींनीं पूर्णतः आणि गृहस्थांनीं यथाशक्ती परीग्रह जिंकणें योग्य होय. ते परीग्रह पुढीलप्रमाणें होत. १.क्षुधापरीग्रहजय—भुकेची होत असलेली असह्य वेदना सहन करणें याला क्षुधापरीषहजय म्हणतात. ज्या मुनींना भुकेची वेदना तीव्र होते त्यांनीं त्या-वेळेस चिंतावें कीं हें " जीवा ! तूं अनादिकालपासून संसारपरिभ्रमण करीत आहेस. त्याच वेळेस अनेक पदार्थांचा उपभोग घेतला आहेस. तरी तुझी अजून भूक शमत नाहीं. तूं पूर्वीं वेठलेलीं नरकादिक गतीचीं खडतर दुःखें डोळ्या-पुढें आण आणि तुझ्या स्थितीचा विचार कर. तुझ्या त्या अनादि परिभ्र-णांत सुमेरुपर्वताइतकी मोठी अन्नराशि भाक्षिलेली आहेस आणि आतां मुनी-व्रत ग्रहण करून भुकेच्या वेदनांनीं कायर बनतोस. पहा इतर मुनीलोक पक्षोपवास, मासोपवास करतात. त्यांना क्षुधा बाधत नाहीं. मग तुला काय झालें. आतां तुला अगणित वेळां भोगलेली भोजनलालसा सोडून ज्ञानामृतपानासाठीं तयार झालेंच पाहिजे. " वगैरे प्रकारें चिंतवन करून क्षुधेची व्यथा जिंकणें क्षुधापरीषहजय होय. २ तृष्णा म्हणजे तहान. तहानेची व्यथा असह्य झाली तरी तिजकडे न पाहतां जलपानादिक क्रिया न करतां, स्वस्थ चित्तानें सहन करणें तृषापरीषहजय होय. ग्रीष्मऋतूंत गिरीशिखरावर आतापना करीत असलेल्या मुनीवर्यांना उप-वासाच्या तीव्र उष्णतेनें जेव्हां तृषावेदना होते तेव्हां ते तिचें शमन पुढीलप्रमाणें करतात. "कीं हें जवि, तूं अनेक वेळा जन्म धारण करून, अनेक नरकगतींतून जात असतांना अतिशय दुःखद तृषेच्या वेदना सहन केल्यास मग या थो-ड्याशा वेदनेनें व्याकुल कां बनतोस ? मुनीधर्मांचें आचरण करून कायर होणें तुला लाजिरवाणें आहे; जगत्पूज्य अशा ह्या मुनीच्या अवस्थेंत जगद्दुर्लभ ज्ञानपीयूषाचें यथेच्छ पान कर वगैरे. " ३ थंडी सहन करणें शीतपरीषह-

